म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ११८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं. ११८

# भजनी मेळा
## अथवा
# उपयुक्त भजनसंग्रह



नं. २३९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
संग्रहालय क्रमांक ११८
लेखक गो. मो. कालेकर
सन १८
११८
पुस्तकाचें नांव भजनी मेळा अ२
उपयुक्त भजनसंग्रह

# भजनी मेळा

अथवा

# उपयुक्त भजन संग्रह.

हें पुस्तक

**गोविंद मोरोबा कालेंकर**

यांणीं तयार केलें.

तें एकंदर हक्कासह विकत घेऊन

**बाळकृष्ण लक्ष्मण पाठक यांणीं.**

मुंबईत "जगदीश्वर" छापखा० छा०

( हें पुस्तक सन १८६७ च्या २५ व्या आक्टा प्रमाणें रजिष्टर करून सर्व हक्क प्रकाशकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

शके १८१० सन १८८९

# अनुक्रमाणिका.

## प्रकरण १लें.


| | पृष्ठ |
|---|---|
| भजनी अभंग संग्रह | १ |


## प्रकरण २ रें.


| | |
|---|---|
| भजनी पदसंग्रह | ४० |
| हिंदुस्थानी भजनीपदें | ७९ |


## प्रकरण ३ रें.


| | |
|---|---|
| गारुडभारुडादिसंग्रह | ९६ |


## प्रकरण ४ थें.


| | |
|---|---|
| उत्तरभजन ( काकड आरत्यावगैरे.) | १४४ |
| विनंतीपरअभंग | १५५ |


## प्रकरण ५ वें.


| | |
|---|---|
| पदसंग्रह | १५८ |
| सौरीसंग्रह | १६६ |
| विठ्ठलाची आरती | १७० |
| भजन | १७२ |

# प्रस्तावना.

नियमित दिवशीं दहावीस मंडळी एकत्र जमून प्राचीन कवीनीं इश्वर स्तुति पर केलेली कविता गाणें, यास भजन असें ह्मणतात. व तें करणाऱ्यामंडळीस "भजनीमेळा, भजनी आखाडा" किंवा "भजनीमंडळी" असें ह्मणतात. अलीकडे वितंडवादी सुधारक ह्मणतातकीं, ही भजनी मंडळी विनाकारण टाळ कुटून घसाफोड करितात त्या पासून फायदा कांहींएक नसून उलट आसपासच्या लोकांस त्रास व निज मोडमात्र होते.

आतां पंढरपूर, आळंदि इत्यादिक्षेत्रांतून ज्या दिंड्या निघतात, त्यांबरोबर जो भजनाचा थाट असतो त्या लोकांस कडक ऊन किंवा पावसाची परवामूळींच नसून ते प्रेमळ भजनांत तल्लीन होऊन जातात. त्या त्यांच्या भक्तीकडे पाहिलें तर, आमच्या सुधारक समजांतील डोळे झांकून प्रार्थना करणारांची भक्ति कुच कामाची ठरते; कारण डोळे झांक्या भक्तांचें लक्ष आपण जी प्रार्थना करितों ती चांगली शुद्ध व्हावी अशाकडे असतें आणि त्या टाळकुट्या भक्तांचें लक्ष केवळ पांडुरंगापाशींच असतें त्यांचे तोंडून शुद्धाशुद्ध वेडे वांकडे कसेही अभंग निघोत. लोक कांहींही ह्मणोत ऊन असो किंवा पाऊस असो त्याकडे याचें लक्ष मुळींच नसून तो ईश्वर भावनेंतच निमग्न असतो.

शिवाय त्या भजनापासून दुसरा असा एक फायदा आहे कीं, अलीकडील तरुण मुलें काम धंद्यावरून आल्यावर रात्रीं विनाकारण ग-

ळींकुचींत, तमाशांत, किंवा रांडांच्या घरीं भटकत फिरण्यापेक्षां एकत्र जमून ईश्वर स्तुतीपर भजन करणें बरें. ह्या नियमानें त्यांच्या विनाकारण भटकण्यास प्रतिबंध राहून दुराचरणांत शिरण्याचा संभव नसतो.

तर अशा ह्या भजनाची जितकी अधीक प्रवृत्ति होईल तितकी चांगलीं, हें लक्षांत आणून अशा लोकांचे उपयोगास यावा या हेतूनें आह्मीं पुष्कळ दिवस मेहनत घेऊन अनेक संत, वारकरी, भजनीमंडळी व इतर भाविक लोक ह्यांचे साह्यानें हा "भजनीमेळा" तयार केला आहे.

ह्या कामीं आह्मांस श्रीक्षेत्र पंढरपूर येथील संत पेठेंतील **नरहरीबुवासं**त तसेंच मुंबईंतील आमचे मित्र **नरला बाळाराम राजन्ना, लक्षुमण महादेव घाग, गोपाळराव सकोजी विचारे**, ह्यानीं आह्मांस चांगली मदत केली त्या बद्दल आह्मीं त्यांचे फार आभार मानितों.

ह्या पुस्तकांतील कवितांच्या पाठभेदाकडे व शुद्धाशुद्धाकडे आह्मीं फारसे लक्ष्य न देतां केवळ चालू भजनी मंडळीच्या वहिवाटीस अनुसरून अभंग व पदें लिहिलीं आहेत. या बद्दल कांहीं कमजास्त सूचना कोणास करणें असल्यास त्यांनीं आह्मास लिहून कळवावें ह्मणजे योग्य वाटल्यास दुसरे आवृत्तीचे वेळीं त्याकडे लक्ष देऊं

**गोविंदमोरोबा कार्लेकर.**

ठिकाणा

नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली मुंबईत

# भजनी मेळा

अथवा

# उपयुक्त भजनसंग्रह.

## प्रकरण १ लें

## भजनी अभंगसंग्रह

### भजन.

विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल ॥

### अभंग १ ला.

रूपपाहातां लोचनीं ॥ सुखझालें हो साजणी ॥ १ ॥ तोहा विठ्ठल बरवा ॥ तोहा माधव बरवा ॥ २ ॥ बहुता सुकृताची जोडी ॥ ह्मणुनी विठ्ठल आवडी ॥ ३ ॥ सर्व सुखाचें आगर ॥ बाप रखुमादेवीवर ॥ ४ ॥

## अभंग २ रा.

वचन ऐका कमळापती ॥ माझी रंकाची विनंती ॥ १ ॥ कर जोडितों कथेकाळीं ॥ आपण असावें जवळी ॥२॥ घ्यावी घ्यावी माझीभाक ॥ जरिका-मागेन आणिक ॥ ३ ॥ तुकया बंधू ह्मणे देवा ॥ शद्ब इतुकाची राखावा ॥ ४ ॥

## अभंग ३ रा.

रंग मांडिला रंगणी ॥ उभाठाकलों कीर्तनीं ॥ ॥ १ ॥ हातीं घेऊनीया विणा ॥ कंठीं राहे नाराय-णा ॥ २ ॥ सांवळी देखिली ती मूर्त ॥ माझ्या जीवींची विश्रांत ॥ ३ ॥ तुका ह्मणे देगा देवा ॥ माझ्या कीर्तनींचा ठेवा ॥ ४ ॥

## अभंग ४ था.

येग येग विठाबाई ॥ आह्मां अनाथांचे आई ॥ १ ॥ भीमा आणि चंद्रभागा ॥ तुझ्या चरणीच्या गंगा ॥२॥ इतुक्यां सहित त्वा बा यावें ॥ माझ्या रंगणीं नाचावें ॥ ३ ॥ माझा रंग तूझ्या गुणीं ॥ ह्मणे नामयाची जनीं ॥ ४ ॥

सं. मा. ग्र. १४८



## अभंग ५ वा.

रूपीं गुंतले लोचन ॥ स्चर्णी स्थीरावलें मन ॥ ॥ १॥ देह भाव हारपला ॥ तुज पाहतां विठला ॥ ॥ २ ॥ कळूंनेदी सुख दुःख ॥ ताहानं हरपलीभूक ॥ ३ ॥ तुकाह्मणे नोहे परती ॥ तुझ्या दर्शनें मागुती ॥ ४ ॥

## अभंग ६ वा.

पाहिलें दिसतें श्रीमुख ॥ ताहान हरपली भूक ॥१॥ पहा पहा डोळेभरी ॥ मूर्ति सांवळी गोजिरी ॥२॥ रवि सहस्त्र ज्याच्या कळा ॥ तोहा मदनाचा पूतळा ॥ ॥३॥ तुका ह्मणे वर्णूं काई ॥ घेतो अलाई बलाई॥४॥

## अभंग ७ वा.

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी ॥ कर कटावरी ठेवूनीयां ॥ १ ॥ मकर कुंडलें तळपती श्रवणीं ॥ कंठीं कौस्तुभ मणी विराजीत ॥ २ ॥ गळां तुळशी हार कांसे पीतांबर ॥ आवडे निरंतर हेंची ध्यान ॥३ ॥ तुका म्हणे माझें हेंची सर्व सूख ॥ पाहीन श्रीमुख आवडीनें ॥ ४ ॥

## अभंग ८ वा.

सुंदर तें ध्यान शोभे सिंहासनीं ॥ वामांगीं नंदिनी जनकाची ॥ १ ॥ दक्षिणेसी ऊभा बंधु लक्षुमण ॥ भरत शत्रुघ्न कैकई सूत ॥ २ ॥ सन्मुख ऊभा मारुती बलभीम ॥ जपे राम नाम सर्वकाळ ॥ ३ ॥ तुका म्हणे माझ्या श्रीरामाचें ध्यान ॥ करीन पूजन विठ्ठलाचें ॥ ४ ॥

## अभंग ९ वा.

तुझें रूप वेळोवेळां ॥ पडो माझ्या दोहीं डोळां ॥ ॥१॥ रामनाम वदो वाणी॥हरी कथा पडो कानीं ॥ ॥ २ ॥ पायीं तीर्थ यात्रा घडो ॥ देह संतां घरीं पडो ॥ ३ ॥ सर्व काळ देव पूजा ॥ नमन माझें गरुडध्वजा ॥ ४ ॥ अहो तुका म्हणे देवा ॥ घडो वैष्णवाची सेवा ॥ ५ ॥

## अभंग १० वा.

मीतो समर्थाची दासी ॥ मिठी घालीन पायांसी ॥ १ ॥ ऐसा माझा दृढ भाव ॥ करीन नामाचा उत्साव ॥ २ ॥ आतां दासीस हें काम ॥ मु-

र्वी विठ्ठल हरिनाम ॥ ३ ॥ सर्व सुख पायीं लोळे ॥ विठ्ठल जनी सर्वे खेळे ॥ ४ ॥

## भजन.

॥ पांडुरंगें विठाबाई माझे आई पांडुरंगें ॥पां०॥

## अभंग ११ वा.

देवा माझी भक्ती भोळी ॥ एकविधा भावबळी ॥ ॥१॥ मीतो पडेन निराळा॥ऐसा सांडोनी सोहळा॥ ॥ २ ॥ तुका म्हणे जोडुनी पाय ॥ येथें उगा उभा राहें ॥ ३ ॥

## अभंग १२ वा.

बाप माझा दीनानाथ ॥ वाट भक्तांची पाहत ॥ १ ॥ कर ठेउनी कटेवरी ॥ उभा भिवरेच्या तीरीं ॥ २ ॥ कानीं कुंडल वनमाळा ॥ रूप सुंदर सांवळा ॥ ३ ॥ तुका म्हणे भेटावया ॥ सदा उभारिल्या बाह्या ॥ ४ ॥

## अभंग १३ वा.

विटेवरी मूर्त आली भीमातीरीं ॥ लाडका तो हरी यशवदेचा ॥ १ ॥ गोकुळांत यानें चोरी केली फार

॥ ह्मणोनी समोर उभा केला ॥ २ ॥ विटेवरी उभा कटेवरी हात ॥ लज्जेनें पाहत लोकांकडे ॥ ३ ॥ तुकाह्मणे चोर धरिला पुंडलीक ॥ चलाजाऊ कवतूक पाहावया ॥ ४ ॥

अभंग १४ वा.

मिळोनीयां संत जन ॥ करूं देवासी भांडण ॥ १ ॥ वेढावेढा पंढरपुर ॥ धरा रखुमाईचा वर ॥ २ ॥ लुटा लुटाहो पंढरी ॥ मोर्चा लावा भीमा तिरीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे हल्ला केला ॥ भार निषाणीं दाटला ॥ ४ ॥

अभंग १५ वा.

आतां राहो हेंची ध्यान ॥ डोळां ह्मणे लंपट ॥ १ ॥ कोंडुन कोंडुन धरिला जीव ॥ जीवें भावें पूजीन ॥ २ ॥ वहिलें येणें कळसा आलें ॥ स्थिरावलें अंतर ॥ ३ ॥ तुका ह्मणे गोजिरिया ॥ विठोबा पायां पडूंया ॥ ४ ॥

अभंग १६ वा.

आणिक दूसरें मज नाहीं आतां ॥ नेमिलियाचित्तापासोनियां ॥ १ ॥ पांडुरंगध्यानीं पांडुरंगमनीं ॥ जागृतीं स्वपनीं पांडुरंग ॥ २ ॥ पडिलें वळण इंद्रि-

यांसकळां ॥ भावतो निराळा नाहीं दूजा ॥ ३ ॥ तुकाह्मणे नेत्रीं केली ओळखण ॥ तटस्थहें ध्यान विटेवरी ॥ ४ ॥

## अभंग १७ वा.

सकळ देवांचें दैवत ॥ उभा असे पारंगत ॥ १ ॥ रंगलुटा माझे बापा ॥ शुद्धभावें खरें मापा ॥ २ ॥ रंग लुटीला बहुतीं ॥ ध्रुव नारदादि संतीं ॥ ३ ॥ तुका लुटीतसे रंग ॥ साह्य झाला पांडुरंग ॥ ४ ॥

## अभंग १८ वा.

झालें राम राज्य काय उणें आह्मांसी ॥ धरणीधर पीकें गायी ओळल्या ह्मसी ॥ १ ॥ राम वेळो वेळां आह्मी गाऊं ओंवीये ॥ दळीतां कांडीतां जेवितां बाईये ॥ २ ॥ स्वप्नींचेंही दुःख आह्मी न देखों डोळां ॥ नामाचा गजर पळ सुटे कळि काळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे रामे सुख दिधलें आपुलें ॥ तयागर्भवासायेणें जाणें चुकलें ॥ ४ ॥

## अभंग १९ वा.

संत नारी याती जाती ॥ शिंपल्या पोटीं जन्में मोती

॥ १ ॥ तरीते कागद कुटून करीतां ॥नांव ठेविलें भगवतगीता॥ २ ॥ ताकापासुन लोणी झालें ॥ तरीतें दोन्हींन मीळालें ॥ ३ ॥ तुका ह्मणे देगा देवा ॥ जन्म संतापोटीं व्हावा ॥ ४ ॥

अभंग २० वा-

नवखंडे सारी काशी वाराणशी ॥ ठसे त्या वस्त्राशींदिलें होते ॥ १ ॥ गंगा यमुना कृष्णा सरस्वती गोदा॥ मूर्तिमंत सदा वस्त्रावरी ॥ २ ॥ कावेरी त्रिवेणी भद्रावती जाण ॥ ठसेही देखून केली मुद्रा ॥ ३ ॥ द्रौपदी मातेचा नदिसे अंगुष्ठ ॥ ऐसेझालें स्पष्ट तुकाह्मणे ॥ ४ ॥

भजन.

राम कृष्ण हरिराम जय जयरामकृष्ण हरिराम

अभंग २१ वा.

बारे पांडुरंगा केव्हां भेटदेसी ॥ झालों मी परदेशी तुजवीण ॥ १ ॥ तुजवीण सखा मज नाहीं कोणी ॥ वाटतें चरणीं घालूं मीठी ॥ २ ॥ ओवाळावी काया याचरणावरूनी ॥ केव्हांचक्रपाणी भे-

ट देसी ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी पुरवावी आवडी ॥ वेगें घाली उडी नारायणा ॥ ४ ॥

अभंग २२ वा.

उस डोंगापरी रस नाहीं डोंगा ॥ कांरे भुललासी वरलीयासोंगा ॥ धृ० ॥ १ ॥ नदी डोंगीपरी नीर नाहीं डोंगा ॥ कांरे भुललासी० ॥ २ ॥ कमान डोंगी परी तीर नाहीं डोंगा ॥ कांरेभुलला० ॥ ३ ॥ चोखा डोंगापरी भावनाहीं डोंगा ॥ कांरेभुललासी वरलीया सोंगा ॥ ४ ॥

अभंग २३ वा.

जागृती पुसे साजणी कोण बोलली अंगणीं ॥ निराश्रीत नयनीं किं वृंदावनीं देखीयेला ॥ धृ० ॥ ह्मणूंवेदतयाचा पंढरीरायाचा ॥ १ ॥ स्वप्न पुसे सुषुप्ती धरी ममताहेचित्तीं ॥ विठ्ठल परचित्तीं मनरंजन तोराया ॥ ह्मणूं वेद तयाचा ॥ २ ॥ माझे मनीं ऐसेंझालें मन उन्मनीं मोहिलें ॥ बाप रखुमादेवीवरू चींता केली ते ऐका ॥ ह्मणूं वेद तयाचा पंढरी रा० ॥ ३ ॥

## अभंग २४ वा.

देखिले तुमचे चरण निवांत राहिलें मन ॥ कासया टाकील प्राण आपुलागे माय ॥ १ ॥ असेल धरणिवरी आंपुल्या माहेरी ॥ मगतोश्रीहरी किती गाईनगेमाय ॥ २ ॥ सकळही गोत माझें पंढरीसी-जाणा ॥ बाप रखुमा देवी विठ्ठलासी आणा ॥ ३ ॥

## अभं २५ वा.

धन्य अंजनीचा सुत ॥ त्याचें नाव हनुमंत ॥ ज्यानें सीता शुद्धी केली ॥ रामसीता भेटाविली ॥ २ ॥ द्रोणागिरी जो आणिला ॥ लक्षुमण वांचविला ॥ ३ ॥ ऐसा मारुती उपकारी ॥ तुकालोळे चरणावरी ॥ ४ ॥

## अभंग २६ वा.

धर्मरक्षावया अवतारघेसी ॥ आपुल्या पाळीसी भक्त जनां ॥ १ ॥ अंबऋषीसाठीं जन्मसोशियेले॥ दैत्यनिर्दाळीले किती एक ॥ २ ॥ धन्यकृपासिंधु तुज ह्मणताती ॥ आपुलाले बोल साचकरी ॥ ३ ॥

तुकाह्मणे तुजवर्णिंती पूराणें ॥ होसीदया घन कृपासिंधू ॥ ४ ॥

अभंग २७ वा.

अहो कांदा मुळाभाजी ॥ अवघी विठाबाई माझी ॥ १ ॥ लसूण मिरच्या कोथिंबिरी ॥ अवघा झाला माझा हरी ॥ २ ॥ ऊंस गाजर रताळू॥ अवघा भरीला गोपाळू ॥ ३ ॥ अहो नाडा आणि दोरी ॥ अवघी व्यापिली पंढरी ॥ ४ ॥ सांवता ह्मणे केला मळा ॥ विठ्ठला पायीं गोवीन ॥ ५ ॥

अभंग २८ वा.

एक प्रहर रात्र झाली ॥ फेरी विठ्ठलाची आली ॥ १ ॥ नामा ह्मणे जनी पाहे ॥ द्वारीं उभा कोण आहे ॥ २ ॥ प्रभा घरांत दाटली ॥ एक सराई लूटली ॥ ३ ॥ एक मेकां आलिंगन ॥ नामा ह्मणे जनी धन्य ॥ ४ ॥

अभंग २९ वा.

कृपाळू सज्जन तुम्हीं संतजन ॥ एवढें कृपादान तुमचें मज ॥ १ ॥ आठवण द्यावी तुम्ही

पांडुरंगा ॥ जेवीमाझी सांगा काकूळती ॥ २ ॥ अनंत अपराधी पतीतआगळा ॥ परी पायां वेगळा करूंनका ॥ ३ ॥ तुकाम्हणे तुम्ही निरविल्यावरी॥ मग मज हरी उपेक्षिल ॥ ४ ॥

अभंग ३० वा.

पती जन्मले माझे उदरीं ॥ मी झालें तयांची नारी ॥ १ ॥ पतिव्रता धर्म पहा माझा ॥ सर्व अंगींपती भोगी ओझा ॥ २ ॥ निर्गुण पती मज आवडे ॥ माया पोटीं निघालीं भावंडें ॥ ३ ॥ पतीव्रता शिरोमणी ॥ क्रिडाकरी दासीजनी ॥ ४ ॥

भजन.

येगे येगे विठाबाई माझे आई येगे येगे० ॥

अभंग ३१ वा.

आणिकाची स्तुती आम्हां ब्रम्हहत्त्या ॥ एका वांचोनीया पांडूरंगा ॥ १ ॥ आम्हां विष्णुदासा एकविधा भाव ॥ नम्हणो या देव आणीकासी॥२॥ शतखंडें माझी होईल रसना ॥ जरीया वचना पा-

लटेन ॥ ३ ॥ तुकाम्हणे मज आणिका संकल्प ॥ अवघींच पापें घडतील ॥ ४ ॥

## अभंग ३२ वा.

हनुमंत महाबळी ॥ रावणाची दाढी जाळी ॥ ॥१॥ तया माझा नमस्कार ॥ वारंवार निरंतर ॥२॥ करोनी उड्डाण ॥ केलें लंकेचें शोधन ॥ ३ ॥ जाळुनीयालंका ॥ धन्य धन्य ह्मणे तुका ॥ ४ ॥

## अभंग ३३ वा.

ज्ञानीयाचाराजा गुरुमाहाराज॥ ह्मणती ज्ञानदेव ऐसें तुह्मां ॥ १ ॥ मजपामराशीं कायथोरपण ॥ पायाचीया वाहाण पायींबरी ॥ २ ॥ ब्रह्मादिकां जेथें तुह्माओळंगणें ॥ आणीक तूळणें काय पूरे ॥ ३ ॥ तुका ह्मणे नेणे युक्तिची ते खोली ॥ ह्मणोनीठेविली पायीं डोई ॥ ४ ॥

## अभंग ३४ वा.

गोड झाली खीर ॥ परी ते साखरे आधार ॥ १ ॥ ऐसें झालें ब्रह्मज्ञान ॥ बापुडे ते भक्तिवीण

॥ २ ॥ चवीनदे अन्न ॥ आंत नसतां लवण ॥३॥ तुका ह्मणे विणा ॥ तारावीण दिसेसुना ॥ ४ ॥

अभंग ३५ वा.

आह्मीं भाग्याचे भाग्याचे ॥ आह्मी तांब्या भोपळ्याचे ॥ १ ॥ लोकां घरीं गाई ह्मैशी ॥ आह्मां घरीं उंदीरघूशी ॥ २ ॥ लोकांघरीं ताबें थाळे ॥ आह्मांघरीं परळकाळें ॥ ३ ॥ लोकांघरीं हत्ती घोडे ॥ आह्मां घरीं घोंगडीचे जोडे ॥ ४ ॥ तुकाह्मणे आह्मी सुडके ॥ आह्मां देखोन काळ धाके ॥ ५ ॥

अभंग ३६ वा.

कन्या सासुऱ्यासी जाये ॥ मागें परतोनीं पाहे ॥ १ ॥ तैसें झालें माझ्या जिवा ॥ केव्हां भेटसी केशवा ॥२॥ चुकलीया माये ॥ बाळ हुरू हुरू पाहे ॥ ३ ॥ हरणी चुकली पाडसा ॥ धुंडाळिती दाही दिशा ॥ ४ ॥ रानींहिंडोंगेलीगाय ॥ घरीं वत्स वाट पाहे ॥ ५ ॥ वार फिरते आकाशीं ॥ तिचें चित्त पिलांपाशीं ॥ ६ ॥ जिवना वेगळी मासोळी ॥ तैसा तुका तळमळी ॥ ७ ॥

## अभंग ३७ वा.

देह जावो अथवा राहो ॥ पांडुरंगीं दृढभावो॥ चरणनसोडी सर्वथा ॥ आण तुझी पंढरी नाथा ॥२॥वदनीं तुझें मंगळ नाम ॥ सदां अखंडीत प्रेम ॥ ३ ॥ नामाह्मणे केशवराजा ॥ केलानेम चालवि माझा ॥ ४ ॥

## अभंग ३८ वा.

काय करावें साधन ॥ जेणें जोडे नारायण ॥ ॥१॥ त्यासी उपायतो थोडा ॥ गर्जे विठूचा पवाडा ॥ २ ॥ प्राक्तनाची जोडी ॥ तैसेगुण देतोहरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे ऐका ॥ भजा पंढरी नायका ॥ ४॥

## अभंग ३९ वा.

कोण पुण्य कोण गाठी ॥ ज्याशीं ऐसीयाची भेटी ॥ १ ॥ जिहीं हरी धरिला मनीं ॥ दिल्हें संसाराला पाणी ॥ २ ॥ कोण भाग्याचा भाग्याचा ॥ ऐसीयासी बोले वाचा ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याचे भेटी ॥ होई संसाराची तुटी ॥ ४ ॥

## अभंग ४० वा.

कोण पुण्य फळा आलें ॥ आजमी देखिलीं पाउलें ॥ १ ॥ ऐसें नेणों नारायणा ॥ संत सांभाळावें दिना ॥ २ ॥ कोण पुण्य पर्वकाळ ॥ दीन आजीचा मंगळ ॥ ३ ॥ तुका ह्मणे झाला ॥ एवढा लाभगा विठ्ठला ॥ ४ ॥

## भजन.

रमारमण गोविंद जय जय रमारमण गोविंद ॥

## अभंग ४१ वा.

कोणपुण्य याचा होईन सेवक ॥ देही नंदादीक दुरावहे ॥ १ ॥ ऐसें वर्मज दावी नारायणा ॥ अंतरिंच्या खुणा प्रगटोनी ॥ २ ॥ बहुअवघड आहे संतभेटी ॥ परि जगजेठी करुणा केली ॥ ३ ॥ तुकाह्मणे मन नोहे वृत्तीवरी ॥ सुखाचे शेजारीं पहुडलों ॥ ४ ॥

## अभंग ४२ वा.

भाग्यवंत ह्मणो जया ॥ शरण गेले पंढरीराया ॥ १ ॥ तरले तरतील भरवसा ॥ नामधारकाचाठ-

सा ॥ २ ॥ भुक्ती मुक्तीचेंस्थळ ॥ भोळ्याभाविकां-
निर्मळ ॥ ३ ॥ व्यासवर्णिती पुराणी ॥ तुकाह्मणे
वेदवाणी ॥ ४ ॥

अभंग ४३ वा.

मुंगी उडाली आकाशीं ॥ तिनें गिळीलें सूर्या-
शीं ॥ १ ॥ विंचू पाताळाशीं जाय ॥ शेषवंदी त्या-
चे पाय ॥ २ ॥ थोर नवलाव झाला ॥ वांझे पुत्र-
प्रसवला ॥ ३ ॥ माशी व्याली घार झाली ॥ दे-
खोन मुक्ताई हासली ॥ ४ ॥

अभंग ४४ वा.

हिरा शोभला कोंदणी ॥ जडित माणिकाची
खाणी ॥ १ ॥ तैसा शोभे नारायण ॥ सुखदुःखा-
चें मंडण ॥ २ ॥ कोटी चंद्राच्या त्यानिळा ॥ पू-
र्णिमेच्या पूर्ण कळा ॥ ३ ॥ तुका ह्मणे दृष्टीराहे ॥
मागे परतोनी पाहे ॥ ४ ॥

अभंग ४५ वा.

नामगाऊं नाम घेऊं॥नाम विठोबाला वाहूं॥१॥
आह्मी दैवाचे दैवाचे ॥ दास पंढरी रायाचे॥ २॥

टाळ विणा घेऊं हातीं ॥ विठ्ठल नाम गाऊं कितीं ॥ ३ ॥ नामा ह्मणे लाखोली सदा ॥ सहस्त्रनामाच्या गोविंदा ॥ ४ ॥

## अभंग ४६ वा.

आपुलीया बळें नाहीं बोलवत ॥ सखा भगवंत वाचात्याची ॥ १ ॥ साळुंकीती कैशी बोले मंजुळवाणी ॥ शिकवीता धणी वेगळाची ॥ २ ॥ काय म्या पामरें बोलावीं उत्तरें॥ परित्या विश्वंभरें बोलवीलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे त्याची कोण जाणे कळा ॥ वागवी पांगुळा पायावीण ॥ ४ ॥

## अभंग ४७ वा.

पंढरी पंढरी ॥ विठुरायाची नगरी ॥ १ ॥ भोंवताभित्ररेचा वेढा ॥ मध्यें पंढरीचा हुडा ॥ २ ॥ गस्तफिरे चहुकोनीं ॥ टाळ मृदंगाची ध्वनी ॥ ३ ऐसेंस्थळ नाहीं कोठें ॥ तुकयाला विठ्ठल भेटे ॥ ४ ॥

## भजन.

विठा बाईमाउली जय विठाबाई माउली. ॥

## अभंग ४८ वा.

मूर्ख बैसला कीर्तनीं ॥ नकळे अर्थाची करणी ॥ १ ॥ घुबड फिरे चहूंकडे ॥ नकळे नामाचे पवाडे ॥ २ ॥ पहा हींच परनारी ॥ चित्त पर पुरुषावरी ॥ ३ ॥ तुका ह्मणे न ऐकती ॥ सांगितलें वाया जाती ॥ ४ ॥

## अभंग ४९ वा.

श्रोतीं व्हावें सावधान ॥ मना आलें तें गाईन ॥ १ ॥ टाळ जातो एकीकडे ॥ आमचें गाणें भलतीकडे ॥ २ ॥ शेंडा मुळा ते नाकळे ॥ आमचें गाणें हें मोकळें ॥ ३ ॥ रामी रामदास ह्मणे ॥ येणें गुंततील शाहणे ॥ ४ ॥

## अभंग ५० वा.

सज्जनासी काय क्रोध ॥ दुर्जनासी काय बोध ॥ १ ॥ काय गाढवासी गूळ ॥ काय कोळ्यासी प्रेमळ ॥ २ ॥ काय ज्ञानत्या बोकडा ॥ मोती घातलें माकडा ॥ ३ ॥ काय खळासी ब्रह्मज्ञान ॥ तुका ह्मणें झाले शीण ॥ ४ ॥

## अभंग ५१ वा.

शरण शरण जी हनुमंता ॥ तुज आलों रामदूता ॥ १ ॥ काय भक्तिच्या त्यावाटा ॥ मज दाव्याव्या सुभटा ॥ २ ॥ शूर आणि धिर ॥ स्वामी काजीं तूं सादर ॥ ३ ॥ तुकाह्मणे रुद्रा ॥ अंजनीच्या कूमरा ॥ ४ ॥

## अभंग ५२ वा.

आलिया भोगासी असावें सादर ॥ देवावरी भारघालूं नये ॥ १ ॥ मगतो कृपाळू निवाडी सांकडें ॥ येरते बापुडे कायरंक ॥ २ ॥ भवाचीयापोटीं दुःखाचिया राशी ॥ शरण देवासी जातां भले ॥ ३ ॥ तुकाह्मणे नव्हे काय त्या करीतां ॥ चिंतावा तो आतां विश्वंभर ॥ ४ ॥

## अभंग ५३ वा.

वेडेवांकुडें गाईन ॥ परी तुझा ह्मणवीन ॥ १ ॥ नजतारी दिनानाथा ॥ ब्रीदसाच करी आतां ॥ २ ॥ केल्याअपराधाच्या राशी ॥ ह्मणुनि आलोंतुजपा-

शीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मजतारी ॥ सोडी ब्रीद नाहींतरी ॥ ४ ॥

अभंग ५४ वा.

तुह्मी संत माय बाप कृपावंत ॥ काथमी पतीत किती वर्णू ॥ १ ॥ अवतार तुह्मा धराया कारण ॥ उद्धाराया जनजड जीवा ॥ २ ॥ वाढवाया सूख भक्तिभाव धर्म ॥ कुळाचार नाम विठोबाचें ॥ ३ ॥ तुका ह्मणेगूण चंदनाचे आंगीं ॥ तैसे तुह्मी जगीं संतजना ॥ ४ ॥

अभंग ५५ वा.

विठल टाळ विठल दिंडी ॥ विठल तोंडीं उच्चारा ॥ १ ॥ विठल अवघाभांडवळा ॥ वाचे बोला विठल ॥ २ ॥ विठल नाद विठल भेद ॥ विठल छंद उच्चारा ॥ ३ ॥ विठल सुख विठल दुःख ॥ तुका मुखीं विठल ॥ ४ ॥

अभंग ५६ वा.

भक्ता माजी अग्रगणी ॥ पुंडलीक महामुनी ॥ १ ॥ त्याच्या प्रसादें तरले ॥ साधु संत उद्धरले ॥ २ ॥

तोची प्रसाद आह्मासी ॥ विटेवरी हृषीकेशी ॥ ३ ॥
पुंडलीकें बाप माय ॥ दासी जनी वंदी पाय ॥ ४ ॥

अभंग ५७ वा.

आमची मिरास पंढरी ॥ आमचें घर भीमा तीरीं ॥ १ ॥ रुक्मा देवी आमुची माता ॥ पांडुरंग आमुचा पिता ॥ २ ॥ बंधू पुंडलिक मुनी ॥ चंद्रभागा ही बहिणी ॥ ३ ॥ तुका जुनाट मिरासी ॥ ठाव दिला पायापासीं ॥ ४ ॥

भजन.

राधारमणा सावळिया चित्तचोरट्यागोवळिया.

अभंग ५८ वा.

सकळ धर्म मज विठोबाचें नांव ॥ आणिक वें प्रेम नेणो कांहीं ॥ १ ॥ काय जाणे संत निरवीले देवा ॥ करी तया कृपा मजवरी ॥ २ ॥ तुका ह्मणे मज कोण अधिकारी ॥ तो मज विचार कळों यावा ॥ ३ ॥

अभंग ५९ वा.

गरुडा तुझेपायीं ॥ ठेविन वेळो वेळां डोई ॥

॥ १ ॥ वेगें आणावा तो हरी ॥ मजदीनातें उद्धरी ॥ २ ॥ माता लक्षुमीचे हातीं ॥ किती यावें काकूळती ॥ ४ ॥ तुका ह्मणे शेषा ॥ जागे करा हृषीकेशा ॥ ४ ॥

### अभंग ६० वा.

शेवटील विनवणी ॥ संतजनीं परिसावी ॥१॥ आता फार बोलूं काय ॥ अवघे पायां विदीत ॥ २ ॥ विसर तो न पडावा ॥ माझा देवा तुह्मासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे पडलों पाया ॥ करा छाया कृपेची ॥ ४ ॥

### अभंग ६१ वा.

हीच माझी आस ॥ जन्मोजमीं तुझा दास ॥ १ ॥ पंढरीचा वारकरी ॥ वारी चुकूंनदे हरी ॥ २ ॥ संतसंगें सर्वकाळ ॥ अखंड प्रेमाचा कल्होळ ॥ ३ ॥ चंद्रभागे स्नान ॥ तुका मागे हेंची दान ॥ ४ ॥

### अभंग ६२ वा.

देव माझा मी देवाचा ॥ सत्य हीच माझी वा-

चा ॥ १ ॥ देव पाहावयासी गेलों ॥ तेथें देवच होऊन गेलों ॥ २ ॥ देह देवाचें देऊळ ॥ आंत बाहेर निरमळ ॥ ३ ॥ तुकाह्मणे धन्य झालों ॥ आजविठ्ठला भेटलों ॥ ४ ॥

अभंग ६३ वा.

वाराणसी गया पाहिली द्वारका ॥ परी नयेस-री पंढरीची ॥ १ ॥ पंढरीसी नाहीं कोणाआभि-मान ॥ पायांपडे जन एकामेकां ॥ २ ॥ तुका ह्म-णे जाय एकवेळ पंढरी ॥ तयाचिये घरीं यमनये॥ ३॥

अभंग ६४ वा.

सकळही पापें गेलीं दिगांतरा ॥ वैकुंठ पंढरी देखिलिया ॥ १ ॥ सकळही तीर्थें घडलीं एकवेळां॥ चंद्रभागा डोळां देखिलिया ॥ २ ॥ सकळही सं-ता येक वेळ भेटी ॥ पुंडलीक दृष्टी देखिलिया॥ ३॥ तुका ह्मणे जन्माआल्याचें सार्थक ॥ विठ्ठलची ए-क देखिलिया ॥ ४ ॥

अभंग ६५ वा.

नामिला गणपती माऊली सारजा ॥ आतां

गुरुराजा दंडवत ॥ १ ॥ गुरुराया चरणीं ठेविलें मस्तक ॥ आपुल्या दासाला द्यावी मती ॥ २ ॥ गुरुराया तूज ऐसा नाहीं सखा ॥ कृपा करुनी रंका धराहातीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे गुरू मातापिता बंधू ॥ द्यावी कृपासिंधू माय बापा ॥ ४ ॥

अभंग ६६ वा.

चला बाई पांडुरंग पाहुं वाळवंटीं ॥ मांडी येला काला भवती गोपाळांची दाटी ॥ १ ॥ लुब्धल्या नरनारी आणि पशुयाती ॥ विसरल्या देहभाव शंका नाहीं चित्तीं ॥ २ ॥ हमामा हुंबरी पोंवा वाजवी मोहरी ॥ घेतलासे मधीं घालोनियां हरी ॥ ३ ॥ पुष्पांचा वर्षाव झाली आरत्यांची दाटी ॥ तुळशी गुंफोनियां घालीताती कंठीं ॥ ४ ॥ यादवांचा राणा गोपी मनोहर कान्हा ॥ तुका ह्मणे सुख वाटे धरोनियां मना ॥ ५ ॥

अभंग ६७ वा.

सत्यगुरूराया कृपामज केली ॥ परि नाहीं घडलीसेवा कांहीं ॥ १ ॥ सांपडली वाट जातां गंगे

स्नाना ॥ मस्तकींतो जाणा ठेविला कर ॥२॥ भो-जन मागती तूप पावशेर ॥ पडला विसर खाण्या-माजी ॥ ३ ॥ कांहीं केले उमजेना अंतराय ॥ ह्मणोनियां काय त्वराझाली ॥ ४ ॥ राघव चैतन्य केशव चैतन्य ॥ सांगतली खूण माळीकेची ॥ ५ ॥ बाबाजी आपुलें सांगीतलें नाव ॥ मंत्रदिधलाराम कृष्ण हरी ॥ ६ ॥ माघशुद्ध दशमी पाहोनी गुरूवार ॥ केला अंगीकार तुकाह्मणे ॥ ७ ॥

## भजन.

रघुपति राघव राजाराम ॥ पतीत पावन सीताराम-

## अभंग ६८ वा.

करोनी आरती चक्रपाणी ओंवाळीती ॥ १ ॥ आजपुरले नवस ॥ धन्यकाळ हा दीवस ॥ २ ॥ पहा पहा हो सकळा ॥ पुण्यवंत तुह्मी बाळा ॥ ३ ॥ तुका वाहे टाळी ॥ उभा सन्निध जवळी ॥ ४ ॥

## अभंग ६९ वा.

एकवीधा आह्मी नधरूं पालट॥नसांडु हे वाट सांपडली ॥ १ ॥ ह्मणोनियां केला पाहिजे सांभाळ

माझें बुद्धीबळ पाय तृझे ॥२॥ बहूतनकळे बोलतां प्रकार ॥ अंतरा अंतर साक्षअसे ॥ ३ ॥ तुका ह्मणे अगाजीवींच्या जीवना ॥ लक्ष्मी नारायणा साक्षी माझा ॥ ३ ॥

अभंग ७० वा.

देखिले तुमचे चरण निवांत राहिलें मन ॥ कासयाटाकील प्राण आपुलागे माय॥ १ ॥ असेल धरणीवरीआपुल्या माहेरी ॥ मग तो श्रीहरी किती गाईन गे माय ॥ २ ॥ सकळही गोत माझें पंढरीसीं जाणा ॥ बापरखुमादेवीवरु विठ्ठलाशी आणा ॥३॥

अभंग ७१ वा.

मनहें झालें मनहें झालें ॥ पूर्ण विठ्ठलाचें झालें ॥ अंतर बाहेर रंगून गेलें ॥ विठ्ठलाचें ॥ १ ॥ विठ्ठल ह्मणतां सरलें पाप ॥पदरीं आलें पुण्यमाप ॥ झाला दिनाचा मायबाप ॥ विठ्ठलाचे ॥ २ ॥ विठ्ठल जळीं स्थळीं भरला ॥ ठाव कोठें नाहीं उरला ॥ आजम्यां दृष्टीनें पाहिला ॥ विठ्ठलाचें ॥ ३ ॥ ऐसा भाव धरोनी मनीं॥विठ्ठल आणिला निजध्यानी ॥

अखंड वदो माझी वाणी ॥ विठ्ठलाचें ॥ ४ ॥ तोहा चंद्रभागे तिरा ॥ पुंडलिकें दिधला थारा ॥ बाप रखुमा देवी वरा ॥ विठ्ठलाचें ॥ ५ ॥

अभंग ७२ वा.

आतां कोठें जायमन ॥ तुमचे चरण देखिलीया ॥ १ ॥ भाग गेला शीण गेला ॥ अवघा झाला आनंदू ॥ २ ॥ प्रेमरसें पडली मिठी ॥ आवडी मोठी सुखासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मा जोगें ॥ विठ्ठल घोगें खरें माप ॥ ४ ॥

अभंग ७३ वा.

उजळावया आलों वाटा ॥ खराखोटा निवडावे ॥ १ ॥ बोलविल्या बोली बोल ॥ धन्य विठ्ठल सन्निध ॥ २ ॥ तरी मनीं नाहीं शंका ॥ बोले एका स्वामीचिया ॥ ३ ॥ तुका ह्मणे नये आह्मां ॥ पुढें कामा गाबाळ ॥ ४ ॥

अभंग ७४ वा.

सेवितो हा रस वाटीन आणीका ॥ घ्यारे होऊं नका रानभरी ॥ १ ॥ विटेवरी ज्याचीं पाउलें

समान ॥ जाण तोची एक शूरदाता ॥ २ ॥ मनाचा संकल्प पाववेल सिद्धी ॥ जरीराहे बुद्धी याचे पायीं ॥ ३ ॥ तुका ह्मणे मज धाडिले निरोपा ॥ मारग हा सोपा सुखरूप ॥ ४ ॥

अभंग ७५ वा.

भाग्यवंत ऐसी जोडी ॥ परवडी संतांची ॥ १ ॥ धन घरीं पांडुरंग ॥ अभंग जें सरेना ॥ २ ॥ जनाविरहीत हा लाभ ॥ टाचे नभाचे सांठवणें ॥ ३ ॥ तुका ह्मणे विष्णूदासां ॥ नाहीं आशा दूसरी ॥ ४ ॥

अभंग ७६ वा.

माझ्या मना लागो चाळा ॥ पहावयाविठ्ठल डोळां ॥ १ ॥ आणिक नाहीं चाड ॥ नलगे संसार हागोड ॥ २ ॥ तरीच फळ जन्मा आलों ॥ सरतां पांडुरंगीं झालों ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवा ॥ देईं चरणाची सेवा ॥ ४ ॥

अभंग ७७ वा.

माझे गडी कोण कोण ॥ निवडाभिन्नयांतूनी ॥ १ ॥ आप आपणामध्यें मिळों ॥ एक खेळों एकाशीं

॥ ३ ॥ घाबरीयांच्या मोडा काढ्या ॥ धाडा भाड्या वळतियां ॥ ३ ॥ तुका ह्मणे देवापाशीं ॥ विटाळेशीं नसावी ॥ ४ ॥

भजन.

विठाबाईग विठाबाई छंद लागला तुझे पायीं.

अभंग ७८ वा.

गायनाचेरंगीं ॥ शक्ती बहुत हे अंगीं ॥ १ ॥ हें तो देणें तुमचेंदेवा ॥ घ्यावी अखंडीत सेवा ॥ २ ॥ अंगीं प्रेमाचें भरतें ॥ नाहीं उतार चढते ॥ ३ ॥ तुका ह्मणे वाणी ॥ नाम अमृताची खाणी ॥ ४ ॥

अभंग ७९ वा.

बोलोनी दावूंका तुह्मी नेणाजी देवा ॥ ठेवालतें ठेवा ठांई तैसा राहेन ॥ १ ॥ पांगुळलें मन कांहीं नाठवे उपाव ॥ ह्मणुनीपाय जीवीं धरूनि राहिलों ॥ २ ॥ त्यागे भोगे दुःख काय सांडावें मांडावें ॥ ऐसी धरियेली जीवें माझ्या थोर आशंका ॥ ३ ॥ तुका ह्मणे माते बाळा चुकलिया वनीं ॥ नपवता जननी दुःखपावे विठ्ठलें ॥ ४ ॥

## अभंग ८० वा.

याती कूळ माझें गेलें हरपून ॥ श्रीरंगावांचून आणिकनेणू ॥ १ ॥ किती शिकवाल मज वेंळो वेळां ॥ मीतो गोंवळा राखलीया ॥ २ ॥ अंभोग भोगणें मज नाहीं चाड ॥ भक्ती प्रेम गोड लागली माय ॥ ३ ॥ बाप रखमा देवि वरू जिवीचा जिव्हाळा ॥ कळीकाळा वेगळा नाहेगे माय ॥ ४ ॥

## अभंग ८१ वा.

संपत्ती सोहळा नावडे मनाला ॥ करीतेंटकळा-पंढरीचा ॥ १ ॥ जावें पंढरीशीं आवडी मनाशीं ॥ कधीं एकादशी आशाढी हें ॥ २ ॥ तुका ह्मणे ऐसें अर्त ज्याचे मनीं ॥ त्याची चक्रपाणी वाट पाहे॥ ३॥

## अभंग ८२ वा.

पंढरिशीं जारे आलिया संसारा ॥ दिनाचासोयरा पांडुरंग ॥ १ ॥ वाटपाहे ऊभा भेटिची आवडी ॥ कृपाळूतातडी उतावीळ ॥ २ ॥ मागील परिहार पुढें नाहींशिण ॥ झालिया दर्शन एकवेळ

॥ ३ ॥ तुका ह्मणे नेदी आणिकांचे हातीं ॥ बैसलातो चितीं निवडेना ॥ ४ ॥

अभंग ८३ वा.

भाग्यवंताहेचीकाम ॥ मापीनाम वैखरी ॥ १ ॥ अनंदाची पुष्टी आंगीं ॥ श्रोते संगीं उद्धरती ॥ २ ॥ पिकलें तया खावें किती ॥ पंगतीस सुकाळ ॥ ३ ॥ तुका करी प्रणिपात ॥ दंडवत आचार्या ॥ ४ ॥

अभंग ८४ वा.

रूपदावी कांरे आतां ॥ सहस्त्र भुजांच्या मंडिता ॥ १ ॥ सकळीकाचें समाधान ॥ नोहे देखील्या वांचून ॥ २ ॥ शंखचक्र पद्मगदा ॥ गरुडा सहीत यागोविंदा ॥ ३ ॥ तुका ह्मणे कान्हा ॥ भूकलागली नयना ॥ ४ ॥

अभंग ८५ वा.

करूनी उचीत ॥ प्रेमघाली ह्रदयांत ॥ १ ॥ आलोंदान मागायास ॥ थोर करोनीयां आस ॥ २ ॥ चिंतन समर्थी ॥ सेवा आपुलीच देई ॥ ३ ॥ तुका या बंधूह्मणे भावा ॥ मज नीरवावें देवा ॥ ४ ॥

## अभंग ८६ वा.

मायाविरहीत झालें हो ॥ माझे गोत पंढरी राहिलें हो ॥ १ ॥ पतिव्रता ती परद्वारीहो ॥ परपुरुषांशी व्यभिचारिलीहो ॥२॥ साहाचार चवदा झाले हो ॥ शेवटीं अठरा घोकून राहिले हो ॥ ३ ॥ निवृत्ती दासास मी गोविलें हो ॥ माझाभाव विठ्ठलें न्याहाळीहो ॥ ४ ॥

## अभंग ८७ वा.

नवरीच्या हातीं विचित्र हे काठी ॥ नवरी लागे सन्याशापाठीं ॥१॥ नारायण ह्मणा नारायण ह्मणा ॥ नारायण ह्मणा नवरी ये ॥ २ ॥ विश्वरूप नवरी सन्याशा रतली ॥ तेणें आह्मांभली सोयरीक झाली ॥ ३ ॥ दिगांबर नोवरा कृपण वह्राडी ॥ वटेश्वरी सांगा वळीतो लुगडी ॥ ४ ॥

## भजन.

रामराम सिताराम ॥ सिताराम सिताराम

## अभंग ८८ वा.

नामयाचा गुरू ॥ तोहासोपान सद्गुरू ॥१॥क-

रवीरीं करुनी वस्ती ॥ ब्रह्मपुरी तिशीं ह्मणती ॥२॥
माझ्या जिवींच्या जीवना ॥ ह्रदयीं राहें तूं सोपाना
॥ ३ ॥ चित्तउद्धव ज्याची सत्ता ॥ जनी ह्मणे मा-
झ्या ताता ॥ ४ ॥

अभंग ८९ वा.

पंढरीशीं जाती ॥ अथवा जाऊं जे ह्मणती॥१॥
तया आहे संसार ॥ ऐसा बोले तो माहार ॥ २॥
असो नसो भाव ॥ जोकां देखे पंढरी राव ॥ ३ ॥चं-
द्रभागे नाहाती ॥ तुका ह्मणे भलत्या जाती ॥ ४ ॥

अभंग ९० वा.

पतिव्रतानेणो आणीकाची स्तुती ॥ सर्व भा-
वें पती ध्यानीं मनीं ॥ १ ॥ तैसें माझें मन एक-
विध झालें ॥ नावडे विठ्ठलावीण दूजें ॥ २ ॥ सूर्य-
विकासीनी नवेचंद्रकळा ॥ गाय ते कोकिळा वसं-
तासी ॥ ३ ॥ तुका ह्मणे बाळ माते पूढें नाचे ॥
बोल अनेकांचे नावडती ॥ ४ ॥

अभंग ९१ वा.

देवा त्वां कोणाचें बरें केलें ॥ तें मजपूर्ण कळीं

आलें ॥ १ ॥ हरिश्चंद्र तारा राणी ॥ वाहे डोंबा घरीं पाणी ॥ २ ॥ रुक्मांगद राजा भला ॥ त्याचा गांव ओस केला ॥ ३ ॥ पांचवर्षांचें ध्रुव बाळ ॥ नेऊन बसविलें पदीं अढळ ॥ ४ ॥ गोणाई ह्मणे बा विठला ॥ माझा नाम्या वेडा केला ॥ ५॥

अभंग ९२ वा.

रत्नजडित सिंहासन ॥ वरि बैसले आपण ॥ कुंचे ढळती दोन्ही बाहीं ॥ जवळ राही रुखमा बाई ॥२ ॥ होती नाना उपचार ॥ सिद्धी ओळंगती अपार ॥ ३ ॥ हातीं घेऊनी पादुका ॥ उभा वंदी जनी तुका ॥ ४ ॥

अभंग ९३ वा.

तुजलागीं ह्मणती कृपेचा सागर ॥ तरि कां केला धीर पांडुरंगा ॥ १ ॥ अजुनी कां नये तुज माझी दया ॥ काय देवराया पहातोसी ॥ २ ॥ प्रेमरसपान्हा पाजीं माझे आई ॥ धांवगे विठाई वरषोनि ॥ ४ ॥ तुकाह्मणे माझें कोण हरिल दुःख ॥ तुजविण एक पांडुरंगा ॥ ५ ॥

## अभंग ९४ वा.

गोकुळींच्यासुखा ॥ अंतपार नाहीं लेखा॥१॥
बाळकृष्ण नंदाघरीं ॥ आनंदल्या नरनारी ॥ २ ॥
गुढिया तोरणें ॥ करितीकथा गाती गाणें ॥ ३ ॥
तुकाह्मणे छंदें ॥ येणें वेधिलें गोविंदें ॥ ४ ॥

## अभंग ९५ वा.

चाकण चौऱ्यांशीं धन्यदेहुगांव ॥ तेथील पवित्र जन्म आह्मां ॥ १ ॥ तेरावे दिवशीं आले पहायासी ॥ पुसे बायकांसी काय झालें ॥ २ ॥ कन्या किंवा पुत्र सांगावें आह्मासीं ॥ सत्य नाव शशी शोधूं आलों॥३॥ शब्दऐकोनियां हांसे बाजेवरी ॥ घरांतील नारी नवल करिती ॥ ४ ॥ ठेवूनियां हस्त चिरंजीव होसी ॥ कुडी सहित जासी वैकुंठासी ॥ ५ ॥ तुकाह्मणे आह्मा बाळपणींभेटी ॥ आतां जगजेठी दुरावले ॥ ६ ॥

## अभंग ९६ वा.

तुज पाहतां सामोरी॥दृष्टि न फिरे माघारी॥१॥
माझें चित्त तुझ्या पायां ॥ मिठी पडली पंढरिराया

॥ २ ॥ नोहे सारीतां निराळें ॥ लवण मिळवितां जळें ॥ ३ ॥ तुकाह्मणे बळी ॥ जिव दिला पायांतळीं ॥ ४ ॥

अभंग ९७ वा.

आवडे हें रूप गोजिरें सगुण ॥ पहातां लोचन सुखावले ॥ १ ॥ आतां दृष्टिपूढें ऐसाच तूं राहीं ॥ तो मी तुज पाहिं वेळवेळां ॥ लांचावलें मन लागलीसे गोडी ॥ तें जीवें नसोडीं ऐसेंझालें ॥ ३ ॥ तुकाह्मणे आह्मी मागावें लडिवाळ ॥ पुरवावी आळ मायबापा ॥ ४ ॥

भजन.

मारुतिरायाबलभीमा ॥शरणआलोंमजद्याप्रेमा

अभंग ९८ वा.

नमो आदिरूपा ओंकार स्वरूपा ॥ विश्वाचिया रूपा पांडुरंगा ॥१॥ तुझीया सत्तेनें तुझेगुणगाऊं ॥ तेणेंसुखी राहूं सर्वकाळ ॥ २ ॥ तूंचीश्रोतावक्ता ज्ञानासी अंजन ॥ सर्व होय जाण तुझे हातीं ॥ ३ ॥

तुकाह्मणे जेथें नाहीं मी तूं पण ॥ स्तवावें हें कोण कोणालागीं ॥ ४ ॥

अभंग ९९ वा.

राजस सकुसार मदनाचा पुतळा ॥ रविशशी-कळा लोपलीया ॥ १ ॥ कस्तूरी मळवट चंदनाची-ऊटी ॥ रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥ मुगूट कुंडलें श्रीमूख शोभलें ॥ सुखाचें ओतीलें सकळ-ही ॥ ३ ॥ कांसे सोनसळा पांवरे पाटोळा ॥ घननीळ सांवळा बाईयानो ॥ ४ ॥ सकळही तुह्मी व्हावें एकीसवा ॥ तुकाह्मणे जीवा धीर नाहीं॥५॥

अभंग १०० वा.

शुद्ध बीजापोटीं ॥ फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥ मुखीं अमृताची वाणी ॥ देह वेंचावा कारणीं॥२॥ सर्वांगीं निर्मळ ॥ चित्तजैसें गंगाजळ ॥ ३ ॥ तुकाह्मणे जाती ॥ तापदर्शनें विश्रांती ॥ ४ ॥

अभंग १०१ वा.

रामकृष्ण नाम हीं दोन्ही साजीरीं॥हृदय मंदि-रींस्मरणकरा ॥१॥ आपुली आपण करा सोडवण

॥ संसारबंधन सोडा वेगीं ॥ २ ॥ ज्ञानदेव ध्यानीं रामकृष्णमाळा ॥ जिवींचा जिव्हाळा पांडुरंग ॥ ३ ॥

अभंग १०२ रा.

रघुनंदन पायीं गेला ॥ रथ कांरे तो आणिला ॥ १ ॥ सूर्यनारायणा ॥ माझा राघव जातो वना ॥ २ ॥ धरणी माय बहिणी ॥ नको रुतुं राघव चरणीं ॥ ३ ॥ सूर्यवंशीच्या दिनकरा ॥ नको तापूं रे भास्करा ॥ एका जनार्दनीं भाव ॥ परोपरी हा राघव ॥ ४ ॥

अभंग १०३ रा.

येईगा तूं येईगा तूं पंढरीच्या राया ॥ तुजवीण शीण झाली हीनमाझीकाया ॥ १ ॥ याती हीन मती हीन कर्म हीन माझें ॥ सर्व लज्जा सोडून बापाशरण आलों तूज ॥ २ ॥ दिनानाथा दीन बंधू नाम तुझ्याला साजे ॥ पतीतपावननामऐसें ब्रिदावळी गाजे ॥ ३ ॥ विटेवरी उभा कटेवरीकर ॥ तुकाह्मणे हेंचिआह्मा ध्यान निरंतर ॥ ४ ॥

भजनी अभंगसंग्रह समाप्त.

तुकाह्मणे जेथें नाहीं मी तूं पण ॥ स्तवावें हें कोण कोणालागीं ॥ ४ ॥

अभंग ९९ वा.

राजस सकुमार मदनाचा पुतळा ॥ रविशशी-कळा लोपलीया ॥ १ ॥ कस्तूरी मळवट चंदनाची-ऊटी ॥ रुळे माळ कंठीं वैजयंती ॥ २ ॥ मुगूट कुंडलें श्रीमूख शोभलें ॥ सुखाचें ओतिलें सकळ-ही ॥ ३ ॥ कांसे सोनसळा पांघरे पाटोळा ॥ घननीळ सांवळा बाईयानो ॥ ४ ॥ सकळही तुह्मी व्हावें एकीसवा ॥ तुकाह्मणे जीवा धीर नाहीं॥५॥

अभंग १०० वा.

शुद्ध बीजापोटीं ॥ फळें रसाळ गोमटीं ॥ १ ॥ मुखीं अमृताची वाणी ॥ देह वेंचावा कारणीं॥२॥ सर्वांगीं निर्मळ ॥ चित्तजैसें गंगाजळ ॥ ३ ॥ तु-काह्मणे जाती ॥ तापदर्शनें विश्रांती ॥ ४ ॥

अभंग १०१ वा.

रामकृष्ण नाम हीं दोन्ही साजीरीं॥ह्रदय मंदि-रींस्मरणकरा ॥१॥ आपुली आपण करा सोडवण

॥ संसारबंधन सोडा वेगीं ॥ २ ॥ ज्ञानदेव ध्यानीं रामकृष्णमाळा ॥ जिवींचा जिव्हाळा पांडुरंग ॥ ३ ॥

अभंग १०२ रा.

रघुनंदन पायीं गेला ॥ रथ कारे तो आणिला ॥ १ ॥ सूर्यनारायणा ॥ माझा राघव जातो वना ॥ २ ॥ धरणी माय बहिणी ॥ नको रुतुं राघव चरणीं ॥ ३ ॥ सूर्यवंशीच्या दिनकरा ॥ नको तापूं रे भास्करा ॥ एका जनार्दनीं भाव ॥ परोपरी हा राघव ॥ ४ ॥

अभंग १०३ रा.

येईगा तूं येईगा तूं पंढरीच्या राया ॥ तुजवीण शीण झाली हीनमाझीकाया ॥ १ ॥ याती हीन मती हीन कर्म हीन माझें ॥ सर्व लज्जा सोडून बापाशरण आलों तूज ॥ २ ॥ दिनानाथा दीन बंधू नाम तुह्मला साजे ॥ पतीतपावननामऐसें ब्रिदावळी गाजे ॥ ३ ॥ विटेवरी उभा कटेवरीकर ॥ तुकाह्मणे हेंचिआह्मा ध्यान निरंतर ॥ ४ ॥

भजनी अभंगसंग्रह समाप्त.

# भजनी मेळा.

## प्रकरण २ रें.

## भजनी पद संग्रह.

### पद १ लें.

दत्तात्रेय अवधूता, जनार्दन स्वामि एकनाथा ॥ गुरुदत्तात्रे० ॥ दत्तात्रेय अ० ॥ ध्रु० ॥ दत्त अवधूत, अवधूत निराकार, स्मरणीं पावे सत्वर ॥ शुद्ध अविनाश, अविनाश सुंदर, स्वरुप हें दिसे मनोहर ॥ पतितमी पापी, पापी दुर्धर, नेइ तूं भवसिंधूपार ॥ मागणें हेंचि, हेंची सत्वर, मस्तकीं ठेवि अभय कर ॥ सगुण हें रूप, रूप दावि आतां, जनार्दन स्वामि एकनाथा ॥ गुरुदत्ता० ॥ दत्ता० ॥ १ ॥ मुख्यनीवास, निवास मेरुशिखरीं, समाधिनिद्रा माहूरीं ॥ स्नान सारिलें, सारिलें गंगातीरीं, तिलक रेखिला पंढरी ॥ मध्यान्ह भिक्षा, भिक्षाकरवीरीं, भोजन केलें कावेरी ॥ सायंसंध्या,

संध्या सागरीं, मुख्य आसन केदारीं ॥ जाउनि चरणीं, चरणिं ठेवुं माथा, जनार्दन स्वामि एकनाथा ॥ गुरुद० ॥ द० ॥ २ ॥ भस्मभूषित, दिव्य कांती, माळा त्रिशूळ डमरु हातीं ॥ गळां वनमाळ, वनमाळवैजयंती, कर्णीं कुंडलें सूर्यदीप्ती ॥ माथा मुगुट, मुगुट चंद्रज्योती, पाहतां वेधली मनोवृत्ती ॥ आकर्ण नयन, नयन मदनमूर्ती, वर्णितां मौनावल्या श्रुती ॥ येथें मी पामर, काय वर्णुं आतां, जनार्दनस्वामि एकनाथा॥गुरुद०॥द० ॥३॥ अत्रि अनुसूया, अनुसूयात्मज दत्त, त्रिगुण अवतार मूर्तिमंत ॥ कटि मेखळा, मेखळा रत्नजडित, चरणीं नूपुरें रुणझुणित ॥ प्रसन्न हें वदन, वदन हर्षयुक्त, तारिले पतित असंख्यात ॥ अखंड हें नाम, नाम वदनांत, मूर्ति बिंबली हृदयांत ॥ अभय वर देईं, देईं गुरूनाथा, जनार्दनस्वामिएकनाथा ॥ गुरुदत्ता०॥ दत्ता० ॥४॥ लक्ष चौऱ्यांशीं, चौऱ्याशीं जन्म वायां, म्यां भोगिले गुरुराया ॥ भक्तवत्सला, वत्सला दत्तात्रया, करावी कृपेची छा-

या॥ मागणें हेंची,हेंचि दत्तराया, न्यावें मातें निज ठाया ॥ कृष्णात्मजातें, आत्मजातें तारिं आतां, जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरुदत्तात्रेय, दत्तात्रेय अवधूता,जनार्दनस्वामि एकनाथा॥गुरुदत्तात्रेय० ५

पद २ रें.

चाल वरील.

दत्तात्रेय अवधूताजनार्दनस्वामि एकनाथा॥गुरु दत्तात्रेय० ॥ ध्रु० ॥ जन्म दीला, दिला राव देवानें, वागविलें मातापीत्यानें ॥ कडिये खांद्यावर, खांद्यावर घेऊन, रजाचा गजराव करून ॥ नवखंड दाखवीलें, दाखविलें त्यानें, कृपेचा सागर होऊन॥ ह्मणून मी सेवा, करिन एक चित्ता, मग आठवीं रघूनाथा ॥ गुरुदत्तात्रेय० ॥ १ ॥ मायबापाचें, बापाचे उपकार, शिरावर जाहले फार ॥ पाजलीं अठरा, अठरावी धार, अवघें त्याचें शरीर ॥ ह्मणुन मी सेवा, करिन एकचित्ता, मग आठवीं रघूनाथा ॥ गुरुदत्तात्रेय० ॥ २ ॥ मायबापाचे, बापाचेकृपेनें, विठुराव आला चालून ॥ करकटीवर,

कटीवर ठेवून, उभे विटेवर राहून ॥ असा एक पुत्र, पुत्र श्रावण, कावड केली हौसेन ॥ काशिला जातो, जातो श्रावण, लागली निर्वाणी तान ॥ झारी घेऊन, जात श्रावण, बाण मारिला दशरथान ॥ श्रावण ह्मणेरे, ह्मणेरे दशरथा, पाणी घेउन पाजीं मातापीत्यां ॥ अखंड सेवा, वडो तुज एक चित्ता, मग आठवीन रघुनाथा ॥ गुरुदत्तात्रेय० ॥ ३ ॥ मायबापाचे, बापाचे कृपेनें, गुरु म्या केला सज्जन ॥ कान फुंकीले, फुंकिले गुरुनें, विद्या दिली भगवंतानें ॥ रामचंद्रनाथ, नाथ गावण, पितृभजनीं त्याचें ध्यान ॥ ह्मणुन मी सेवा, करिन एक चित्ता, मग आठवीं रघूनाथा ॥ गुरुदत्तात्रेय दत्तात्रेय अवधूता, जनार्दनस्वामि एकनाथा ॥ गुरुद० ॥ ४ ॥

## पद ३ रें.

चाल वरील.

सांवळें स्वरुप, स्वरूप विठ्ठलाचें, वदन पाहिलें अवचित त्याचें ॥ सांवळें स्व० ॥ ध्रु० ॥ चंद्रा-

ची चित्कळा, तसा हरी पंढरी वेल्हाळा ॥ देउळांत उभा, उभा विठ्ठल सांवळा, गळ्यामध्यें तुळसीच्या माळा ॥ कपाळीं बुका, बुका विठ्ठल पिंवळा, जरी कर्दळी कोंब कवळा ॥ चाल ॥ शिरीं जर चीरा ॥ त्यावरी खोविला तुरा ॥ तोड ॥ कानीं ढाळ कुंडलांचे, लोंबती घोस वर मोतीयाचे ॥ सांवळें स्व० ॥ १ ॥ लहान आकृती, आकृती रखुमाईची, नूतन कळी कोमळ जाईची ॥ पाहिली छबी, सत्यभामा राहीची, दया कर पूर्ण विठ्ठलाची ॥ शब्दमंजूळ, जशी गोडी मिठाईची, दुधामध्यें साखर राईची ॥ चाल ॥ अष्टनायका, सोळा हजार त्याच्या बायका ॥ तोड ॥ करी पाळण अवघ्यांचें, ध्यान मला जय नीळकंठाचें ॥ सांवळें स्व० ॥ २ ॥ देउळापूढें, आहे गरुडाचा पार, मिळाले संतांचे भार ॥ टाळ मृदंग, खुब उडती झणत्कार, रागरागिण्या सावकार ॥ कपाळीं बुका, गळां तुळसीचे हार नाचती संताचे भार ॥ चाल ॥ उडविली मजा ॥ हरी लुटा तुह्माला

रजा ॥ तोड ॥ होतें गायन संतांचें, घोष गर्जती हरिनामाचे ॥ सांवळें स्व० ॥ ३॥ गणेशदासाचीदासाचीमूर्ति खासी जसी काय जडावाची आरसी ॥ येती दर्शना, दर्शना पदी वरसी, विठ्ठला दया कधीं करिसी ॥ रुसुन चाललों, कधीं कमळाला धरिसी, लौकिक जनामध्यें करिसी ॥ चाल ॥ पाव विठ्ठला ॥ तुजवीण कंठ दाटला ॥ तोड ॥ करीं दिवस आनंदाचे ॥ कवन टिलु अमना नंदाचें ॥ सांवळे स्वरूप० ॥ ४ ॥

## पद ४ थें.

चाल वरील.

अरे हरी प्यालों मी प्याला, प्याला नामाचा, छंद लागला विठोबाचा ॥ करून चौरंग चौरंग देहाचा, आंत खुब जडाव रत्नाचा ॥ च्यारी माचवे, माचवे चौकी चौकोनी, केव्हांची विठ्ठल रुक्मिणी ॥ झालें मी, मग्न, मग्न हरीभजनीं, केव्हांची विठ्ठल रुक्मिणी ॥ १ ॥ झालें मी मग्न ॥ ध्रु० ॥ तनिशें साठ, साठ तुकड्यांचा, चौरंग अमोल मो-

लाचा ॥ दोर गुंफीला, गुंफीला राव सत्वाचा, आकार तिन्ही लोकांचा ॥ चारी कमळें, कमळें विश्वमोहनी, केव्हांची विठ्ठल रुक्मिणी, झालें मी मग्न० ॥ २ ॥ लाउन दरवाजा, दरवाजा कारागीर, बत्तीस शीपाई चौकीदार॥आणिक नव खिडक्या, खिडक्या चौफेर, मेरु शिखरें दशम द्वार ॥ तेंहि गुप्त, गुप्त दावोनी, केव्हांची वि० ॥ ३ ॥ गिलावा रोगण, रोगणहो करुनी, आंत तें सत्रावीचें पाणी ॥ रूप सुंदर, सुंदर नानायोनीं, तेज फांकलें त्रिभुवनीं ॥ वर शिवशक्ती, शक्ति स्थापोनी, केव्हांची वि० ॥ ४ ॥ ऐसा चौरंग चौरंग बनविला, कोंदणी हिरा बैसवीला ॥ शिवलिंग लोळे, लोळे गुरुचरणी, केव्हांची विठ्ठल रुक्मिणी॥ झालें मी मग्न, मग्न हरीभजनी, केव्हांची विठ्ठल० ॥ ५ ॥

पद ५ वें.

मी जगझोडींग जगझोडी ॥ नांव ठेविलें लाडी ॥ ध्रु० ॥ पाळ मांडिला वेशीपाशीं ॥ आला

गेला भोगितो मशीं ॥ मी जग० ॥ १ ॥ नाहीं लागत अडका रुका ॥ काम लाटा फुकाचे फुका ॥ बाय मी जग० ॥ २ ॥ एका जनार्दनीं जोडी ॥ त्याचा संग मी न सोडी ॥ बाय ॥ मी जगझोडीग० ॥ ३ ॥

## पद ६ वें.

विटेवरी उभी होविठ्ठले ॥ पहातां मन माझें रंगलें ॥ ध्रु०॥ दीनपाहूनि सुदामा ॥ दिधली कांचनपुरी धामा ॥ भक्तिमाउली विठ्ठले॥ पहातां मनमा० ॥१॥दीन पाहूनि दामाजीपंता॥परिहार झाला श्रीमंता॥अर्जलिहिले विठ्ठले ॥पहाता० ॥२॥ पचविली वाटी विषाची ॥ लज्जाराखिली जिजाबाईची ॥ स्वरूप ओळखिलें विठ्ठलें ॥ पहातां० ॥ ३ ॥ प्रश्नवाढविलाज्ञानाचा ॥ अभिमान धरलारे ज्याचा ॥ वेदबोललेत्रिवाचा ॥ सेवक झाला नाथाचा ॥ गंध उगाळिलें विठ्ठलें ॥ पहातांमन माझें रंगलें ॥ ४ ॥

## पद ७ वें.

### गौळण.

सासूबाई आत्याबाई॥ या कृष्णाला सांगा कांहीं ॥ या कान्हयाला सांगा कांहीं॥ ध्रु०॥येकटेच येऊन नकटेंच पाहातो ॥ मस्करि करितो बाई ॥ याकृष्णालासांगाकांहीं ॥ १ ॥ यमुनेचे तिरिंगे गाई चारितो ॥ निरीशीं झटतो बाई ॥ याकृष्णाला० ॥२॥ दहीदुध घेऊनि मथुरेसी जातां ॥ अडवून मागे दूधसाई ॥ याकृष्णला० ॥ ३ ॥ मध्वमुनेश्वर रमावर सुंदर ॥ हरीविणदुजा ठाव नाहीं ॥ याकृष्णला० ॥ ४ ॥

## पद ८ वें गौळण.

माझें अचडें बडडें छकुडें ग राधे रुपडे ॥ पांघरु घाली ती कुचडें ॥ ध्रु० ॥ हरी माझा गे सांवळा ॥ पाईपैंजण वाजे खुळखुळा ॥ यानें भुलविल्यागोपीबाळा ॥ माझें० ॥ १ ॥ हरिमाझा गे नेणता ॥ करी त्रिभुवनाचा धोंगटा ॥ जो का नांदे त्रिभुवनीं ॥ माझें अ० ॥ २ ॥ ऐसे देवाजीचेगडी ॥ पेंद्या सुदाम्याची जोडी ॥ बळीभद्र त्याचा गडी ॥ माझें०

॥ ३ ॥ जनी ह्मणे तूं चक्रपाणी ॥ खेळखेळ तो वृंदावनीं ॥ लुब्धझाल्या त्या गौळणी ॥ माझें अचडें० ॥ ४ ॥

पद ९ वें. गौळण.

राधे तुझा रंग पाहुनि कृष्ण दंग झाला ॥ राधे हरी दंग झाला ॥ ध्रु० ॥ वेणी फणी करुनि चांग॥ काजळ कुंकू ल्याली भांग॥अंगामध्यें चोळी तंग ॥ दावी हरिला गोरा रंग ॥ राधे तुझा रंग० ॥ १ ॥ राधे तुझा संग झोंक ॥ कृष्ण पाहुन लावी नोक ॥ जरिपातळाचा झोंक ॥ पदर सांवरीला ॥ राधेतु० ॥ २ ॥ मथुरेची गौळण थाट ॥ शिरीं गोरसाचा माठ ॥ चढून यमुनेचा घांट ॥ पालवी हरीला ॥ राधे तुझा० ॥३ ॥ मथुरेची गौळणग वेडी ॥ चालतानां डोळे मोडी ॥ गोपाळनाथ भक्तगडी ॥ चरणीं ठाव दीला ॥ राधे० ॥ ४ ॥

पद १० वें गौळण.

येश्वदेशीं गौळणी सांगती गाऱ्हाणीं ॥ नटनाटक कपटी सांभाळीं आपुलीं तान्ही ॥ किती खो-

डी याच्या सांगूं साजणी ॥ सहस्रमुख भागला॥ निवांत ठेला ॥ नेती नेती शब्द ॥ वेधू लाविला गोविंदें ॥ परमानंदें ॥ आनंदकंदें ॥ वेधू लाविला ॥ध्रु० एके दिवशीं मी गेलें यमुनातिरीं जीवना ॥ सवें गोप संगाती घेउनी आला कान्हा ॥ करी धरी पदरा न सोडी जाणा ॥ एकांत घाली मिठी ॥ न सुटे गांठी ॥ पाहिली दृष्टी ॥ नित्य आनंदू ॥२॥ वेधू लाविला गोविंदु ॥ एके दिवशीं वराशीं आले सारंगपाणी ॥ दहीं दुध भक्षिलें रिती केली दुधाणी ॥ अज्ञान मडकें टाकिलें निवटोनी ॥ पाहिला हरी ॥ पाहिला हरी ॥ घराभीतरी ॥ पळाला दुरी ॥ बाई येश्वदेचा ॥ ३ ॥ वेधू लाविला० ॥ किती खोडी याच्या सांगूं साजणी ॥ गुण लिहितां न पुरे मेदिनी ॥ रूप सुंदर पाहतां न पुरे नयनीं ॥ एका जनार्दनीं वेधल्या नारी गवळण तान्ही ॥ सारंगपाणी ॥ वेधू लाविला० ॥ ४ ॥

पद ११ वें. गौळण.

कसी जाऊं मी वृंदावना ॥ मुरली वाजवितो

काना ॥ ध्रु० ॥ पहिले तिरीं हरी वाजवी मुरली ॥ नदी भरली जमुना ॥१॥ कासेपीतांबर केशरी टीळक ॥ कुंडल शोभे काना ॥ क०॥२॥ कायकरूं बाई कोणाला सांगूं ॥ नामाची सांगड आना ॥क०॥३॥ नंदाच्या हरिनें कौतुक केलें॥ जाणे अंतरींच्या खुणा ॥ क०॥४॥ एका जनार्दनीं मनीं ह्मणा ॥ देवमहात्म कळेना कोणा ॥ कसी० ॥ ५ ॥

पद १२ वें गौळण.

वारियानें कुंडल हाले ॥ डोळे मोडित राधा चाले ॥ ध्रु० ॥ राधेला पाहुनी भुलले हरी ॥ बैल दोही तो आपुले घरीं ॥१॥ फणस गंभीरी कर्दळी दाट होती घेउनी नारंगी फाट ॥ २ ॥ हरिला पाहुनी भुलली चित्ता॥मंदिरीं घुसळी खडबडी डेरा रिता॥३॥ मन मिळालेंसे मना॥एका भुललों जनार्दना ॥ वारियानें ॥ ४ ॥

पद १३ वें. गौळण.

कां रे हरी आमुची त्वां धरियेलीवाट ॥ गौळण गोपी बाळात्यजविला हाट ॥ ध्रु० ॥ नह्मणसीले

कीसुना कर्म करिसी अचाट ॥ एकाजनार्दनीं तारी गुण नामदेवगर्जेती जैसेभाट॥१॥कांरे हरी आ० ॥

पद १४ वें. गौळण.

अनंतलीला रूपसांवळा तो बाळ ब्रह्मचारी॥ पातकें लोळती चरणावरी ॥ ध्रु० ॥ ह्मणे यशवदा बा- गोविंदा नको जाऊं पर द्वाराला ॥ किंगवळण मुख- रण जपली तुला ॥ होती एक गवळण घरची धणी- न गेली होती बाहेरी ॥ जाऊनचढला माळ्या वरी ॥ वर पहातो शिंकीं लोंबती हात चालविले चारी॥ सर्वांहातानें दहीखाई हरी ॥ खावून पिवून दिल्हे ढेकर शिंकीं आणिलीं बाहेरी ॥ टाकिलीं शेजारणीचे द्वारीं ॥ १ ॥ होती एक गवळण घरची धणीन पाहि आपल्या मंदीरीं ॥ दह्यांदुधाच्या फोडिल्या हारी॥ गेली पुसाया तियेपासी सेजारणीचे द्वारी ॥ माझीं शिंकींकांगे तुझे द्वारीं ॥ त्या रांडेनें केलें भांडण आलि माझे अंगावरी ॥ दांतखावून गाल कुसकरी ॥ २ ॥ स्त्रीपुरुष निजलेहोते समया लावून चारी॥ कृष्णदेव गेले पलंगासामोरी॥ दाढी वेणिची गांठ

मारली त्या दोघांसमोरी ॥ आपण मग पळून आला बाहेरी ॥ डचकुन उठली वेणी गुंतली झाली गौळण बावरी ॥ आतां माझी गांठ सोडा लवकरी ॥ त्या दोघांला गांठ सुटेना बोलाविला शेजारी ॥ त्यानें गडे थोढीत आणली द्वारीं ॥ अवघे नगरचे लोक मिळाले तमाशा पहाती सारीं ॥ गवळण गरगर गिरक्या मारी ॥ गवळी ह्मणे अगे गवळणी दाढी तुटली सारी ॥ किं गवळी वरवर दाढी धरी ॥ ३ ॥ घागर घेऊन गेली पाण्याला यमुनेचे तिरीं ॥ किं घागर फोडी डोईवरी ॥ गौळण ह्मणे येश्वदामाते पाहिं तुझा श्रीहरी ॥ माझे सुनेसीं मारी मंदिरीं ॥ यश्वदा माता झाली जागृत लावूनि शुभ्र दोरी ॥ पाळणा हालविते लवकरी ॥ रांगत रांगत गेला कोनारी देव होते देव्हारीं ॥ त्याणें गडेदेवगिळले सारे ॥ तुकाह्मणे आठवावा श्रीहरी ॥ ४ ॥

पद १५ वें. गौळण.

मसी बोलुंनको गिरिधारी॥मोठा धिट बालक हरिरे ॥ मसीबो० ॥ ध्रु० ॥ तुझे ऐकून मंजुळ बोला

॥ तुझे चरणीं देह अर्पण केला ॥ मसी० ॥ १ ॥
तुझी गोकुळीं गुजगुजउठली ॥ तुझी माझी संगत
तुटलीरे ॥ मसी० ॥ २ ॥ जेव्हांतेव्हांचि हा तुझा
खटला ॥ तुझे संगतीनें जिव माझा विटलारे ॥ म-
सी ॥ ३ ॥ कृष्णाकायकरूंरे दैवाला ॥ कोण्यासवतीनें
हा घातकेलारे ॥ मसीबो० ॥ ४ ॥ बोले उद्धव चि-
त्घन ऐसा॥राधा कोंदण बोलत तैसारे॥मसीबो०५

पद १६ वें. गौळण.

गौळण ह्मणती यशोदेला ॥ कोटेंगेसांवळा ॥
कांरथ शृंगागिला ॥ सांगहो मजला ॥ अक्रूरउभा
असे बाईगेसाजणी ॥ १ ॥ ह्यानंदाच्या आंगणीं ॥
मिळाल्या गौळणी ॥ बोले नंदाची पट्टराणी ॥ सद्ग
दित होउनी ॥ मथुरेसी चक्रपाणी ॥ जातोगेसाज-
णी ॥ निवळ झालें मनहें वचन ऐकोनी ॥ २ ॥
अक्रूरारे चांडाळा तुजकोणी धाडिला ॥ कांघातक-
रूं आलासी वधिसी सर्वांला ॥ अक्रुरा तुझी नामा
ऐसीच करणी ॥ ३ ॥ रथींचढला वनमाळी आकांत
गोकुळीं ॥ भूमि पडल्याव्रजबाळी कोणत्या सांभा-

ळी ॥ नयनींच्या उदकानें भिजली धरणी ॥ ४ ॥
देव बोले अक्रूरासी वेगें हाकीं रथासी ॥ ह्या गोपि-
कांच्या शोकासीं न पाहवे मजसीं ॥ एकाजनार्दनी
ह्मणे रथ गेला निघोनी ॥५॥ह्या नंदाच्या आंगणी०

## पद १७ वें. गौळण.

चाल वरील. गौळणह्मणेय०—

उद्धव आहे हा मथुरेसी, कोंणितरिगे पाठवा ॥
कोणितरिगे पाठवागे श्रीहरीला भेटवा ॥ ध्रु० ॥ ये-
क ह्मणती जाउनिसांगा श्रीहरिलाविनंती ॥ येक-
विचार करितीचित्तीं ॥ कांरुसले श्रीपती ॥ याच्या
मुरलीच्या नादानें मोहिली चित्तवृत्ती ॥ इतराजी
आह्मां वरती जावून पाठवा ॥ १ ॥ उद्धव०॥ गोकु-
ळांत अनर्थ झाला गोपाळ आणि गाई ॥ गोवत्सें
त्यागून फिरती कीं ह्मणती कान्हा नाहीं ॥ ऐशा
सकळजनांच्या वृत्तिवेधल्या हरिपायीं ॥ येक ह्मण-
ती शेषशाई व्हदयीं आठवा ॥ उद्ध०॥ २ ॥ गोपींचा
ऐकून धांवा हरि आले गोकुळांत ॥ आनंदु नरना-
रीसीं नासमवे व्हदयांत ॥ व्यासानीं वर्णनकेलें भा-

गवतीं सूमांत ॥ ह्या जीवनमूर्तिंच्यामाळा प्रेमानें गांठवा ॥उद्धव ० ॥ ३ ॥ येकवृत्तांत मधुसूदनासी उद्धवें जाणविला ॥ करुणाकर कृष्णमुरारी मनीं आपले तोषला ॥ शिव शाळिग्राम सेवेसीं शिव तुळशी कोमल्या ॥ दासाला चरणीं ठाव देईगा माधवा ॥ उद्ध० ॥ ४ ॥

पद १८ वें. गौळण.

चाल वरील.

खरी झाली दृष्ट माझ्या श्रीहरिला वाटतें ॥ उचडचकुन लेंकरूं हें तिनतिनदां उठतें ॥ भय भारी जिरेल कैचा मन फार दाटतें ॥ धिर देतें जीवाला मी मन शांती होईना ॥ १ ॥ रडतो हा हृषिकेशी हरि माझा राहिना ॥ ध्रु० ॥ रडतो हा पाळण्यांत घे उतरून खालता ॥ जाई सोडी वासुराला धरि पुच्छ चालतां ॥ गोपाळांचे संगें बारे तूं होई चालता ॥ हा मोठा धीट बाई तिळमात्र भीईना ॥ रडतो हा० ॥२॥ नको नेऊं राधे हरी दहिभात भरवुंदे ॥ फुलें तुळशी देवापाशीं हा बाळ खेळुंदे ॥

कानफाट्या आला याचा अंगारा लावुंदे ॥ हा नवसाचा जणुं बाई मला ठावुक होईना ॥ रडतो हा० ॥ ३ ॥ रडतसे राहुराहून परि टाहो घेतला ॥ उखळामुसळाला बांधोनी टाकला ॥ नित्य कळतो समाचार कंसासी वर्तला ॥ देव कांहो अझून यासी बरि बुद्धी देईना ॥ रडतो हा ऋषि० ॥ ४ ॥ धन्य भाग्य येश्वदेचें सुंदर बाळक ॥ भक्तांचा साह्यकारी वैकुंठनायक ॥ दुष्टांचा शत्रु हाची दीनाचा पालक ॥ महादेव गूण गातो मन शांती होईना ॥ रडतो हा ऋषिकेशी हरि माझा राहिना ॥ ५ ॥

पद १९ वें. गौळण.

येश्वदे घराकडे चाल मला जेऊं घाल ॥ जेऊं घाल ॥ जेऊं घाल ॥ ध्रु० ॥ साध्या गव्हांची पोळी लाटी ॥ मला पुरणपोळी करून दे मोठी ॥ नाहा आडवित गुळासाठीं ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥ १ ॥ तूप लावुन भाकर करी ॥ वांगे भाजुन भरीत करी ॥ वर कांद्याची कोशिंबिरी ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥ २ ॥ आईग खडेसाखरेचे खडे ॥ लवकर

मला करून दे वडे॥ बाळ स्फुंद स्फुंदोनि रडे॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥ ३ ॥ आई लहानच घेगे उंडा ॥ लवकर भाजुन दे मांडा ॥ लांब गेल्या गाईच्या झुंडा ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥ ४ ॥ आई मी खाईन शिळा घांटा ॥ दह्याचा करून दे मठ्ठा ॥ नाहीं माझ्या आंगीं ताठा ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥ ५ ॥ भाकरी बरिच गोड झाली ॥ भक्षुनि भूक हारपली ॥ येश्वदेनें कृपा केली॥ मला जे० ॥ये०॥६॥आई मी तुझा एकुलता एक॥ गाई राखितो नउलाख ॥ गाई राखून झिजलीं नख ॥ मला जेऊं घाल ॥ ये० ॥ ७ ॥ नामा विनवी केशवाशी ॥ गाई राखितो वनासी ॥ जावुन सांगा येश्वदेसी ॥ मला जे० ॥ येश्वदे, येश्वदे, येश्वदे, घराकडे० ॥ ८ ॥

पद २० वें. गौळण.

सासुबाई मी करु काई शिव्या कांहो देतां ॥ ध्रु० ॥ घागर घेउनि पाणियासि जातां ॥ कान्हा येतो धाईं वाईं ॥ १ ॥ दहिंदूध घेउनि मथुरेसि

जातां ॥ आडवितो ठाईं ठाईंगे ॥ २ ॥ मीराके प्रभू गिरधरनागर॥अपराध माझा नाहीं नाहीं॥३॥

पद २१ वें. गौळण.

घे गडे राधे घे गडे कृष्ण ॥ कडीवर घे गोजिरवाणा ॥ ध्रु० ॥ पाळण्यांत घालुन हालवित बसते ॥ ह्याचा डोळा लागे ना ॥ बागुलबावाचें भय दावितें ॥ त्याच्या बाला भेईना ॥ घे गडे राधे० ॥ १ ॥ दहीं वाढलें वायां गेलें ॥ ताटीं बैसुन जेवीना ॥ राधे तुझा शब्द ऐकतां॥टवकारून पाहे कान्हा ॥ घे गडे० ॥ २ ॥ ऊंस, केळें, फणस, नारळ, खारिक, खोबरें, बदाम ॥ उत्तम परिचा मेवा देतें ॥ त्याच्याकडे हा पाहींना ॥ घे गडे० ॥ ३ ॥ श्रीरंगाला श्रीरंगाला तुका ॥ रामाच्या भक्तिला ॥ राधे तुझें भाग्य मोठें, मनरंजन घे घे कान्हा ॥ घे गडे राधे० ॥ ४ ॥

पद २२ वें. गौळण.

( गुरु दत्तात्रय. या चालीवर. )

काळी घोंगडी, घोंगडी हातीं काठी ॥ लागला

धेनूचे पाठीं ॥ काळी घों०॥ ध्रु०॥ अरे हरि वृजवाकुडा, वाकुडाकीं तुजसाठीं ॥ बैसलाकीं यमुनेचे तटीं ॥ काळी घोंग० ॥ १ ॥ राधा गोरटी, गोरटी हातीं वाटी ॥ लागली कृष्णाचे पाठी ॥ काळी घोंग० ॥ २ ॥ एकाजनार्दनीं, जनार्दनीं झालि दाटी ॥ घातली पायांवर मीठी ॥ काळी घोंग० ॥ ३ ॥

पद २३ वें. गौळण.

बाई याला कोणी आणा गे ॥ कोणी आणागे पंकजपाणी ॥ पियूषाची खाणी ॥ माझी विनवणी ॥ मोतीयाचा दाणागे ॥ ध्रु० ॥ विधी ह्मणती नेती नेती ॥ परब्रह्म परात्पर जोती ॥ सखेग दिन राती॥ जिवाची विश्रांती ॥ वैकुंठीचा राणागे ॥ बाई याला० ॥ १ ॥ नेणू भुलला कुब्जेसी ॥ सखे त्याविण मी परदेशी ॥ पुसा हो गौळी यांसी ॥ होईन तुमची दासी ॥ आणा मनमोहनागे ॥ बाई याला०॥ २ ॥ बाळ नोहे हा जगजेठी ॥ विधि जन्मला याचे पोटीं ॥ लिहिलें लल्लाटीं ॥ अक्षय सुख भेटी ॥ महिपती राणागे ॥ बाई याला० ॥ ३ ॥

## पद २४ वें. गौळण.

( चाल वरील. )

माझी विनवणी, विनवणी हरिला सांगा ॥ कधीं भेटसील पांडुरंगा ॥ ध्रु० ॥ अहो हरी, संत तुह्मी दयाळ ॥दयाळ करुनि कृपा ॥ भेटवा केशव माय-बापा ॥ भवनदीं बुडतों ॥ बुडतों भवतापा ॥ कोण सोडविल देव आतां ॥ चाल ॥ काय मी करूं ॥ अरे हरी काय मी करूं ॥ कोणता मार्ग मी धरूं ॥ ॥ तोड ॥ धरूं संतसंगा ॥ कधीं भेटसील० ॥ १ ॥ अहो हरी गोपी वल्लभा ॥ वल्लभा गोपवेशा ॥ मज-दाविसी परदेशा ॥ हरी तुजविण ॥ तुजविण दाही दिशा ॥ विघ्न निवारीं हृषीकेशा ॥ चाल ॥ अहो हरी जिव बावरा ॥ भवनदी खोल भोंवरा ॥ धांवू-नि मज आंवरा ॥ तोड ॥ आंवरा अंतरंगा ॥ क-धीं भेटसील० ॥ २ ॥ अहो हरी बहिण द्रौपदी ॥ द्रौपदीच्या काजा ॥ कैसा पावलास यदुराजा ॥ व-स्त्रें पुरविलीं ॥ पुरविलीं महाराजा ॥ लज्जा राखि-ली अधोक्षजा ॥ चाल ॥ अहो हरी ऐका करुणा॥

सांवळीयाकीं नारायणा ॥ तोड ॥ सकळ दुर्जना दुरीत भंगा ॥ कधीं भेटसील पांडुरंगा ॥३॥ अहो हरी करुणा भाकीता ॥ भाकिता दिनरजनी ॥ दीनमाधवा मोक्षदानी ॥ माझे अपराध ॥ अपराध करा श्रवणीं ॥ किती आळवूं चक्रपाणी ॥ चाल ॥ अहो हरी झालों बा वेडी ॥ जिव जातां बहु तांतडी ॥ तुजविण जिवलग गडी ॥ तोड ॥ गुंडकेशवी परमानंदा ॥ कधीं भेटसील पांडुरंगा ॥ ४ ॥

पद २५ वें. गौळण.

कशी मोहनी घातली नंदाचे कान्हा ॥ ध्रु० ॥ तुझा कान्हा पाहा आहे निसंग ॥ मी न धरी तयाचा संग ॥ गोकुळांत उडवितो रंग ॥ सांवळी मुर्त पाहाना ॥१॥ गवळणी जाती यमुने तिरीं ॥ वाटेमध्यें आडवुनी धरी ॥ रंग भरून मारी पिचकारी ॥ चुंबन घेऊन सोडी ना ॥ २ ॥ भुलवून आणी गौळ्याच्या पोरी ॥ यमुनाकिनारी खेळे होरी ॥ धरून करी आमुची मस्करी ॥ करितो धिंगाणा ॥ ३ ॥ गौळणी सर्व एकत्र जमती ॥ यशोदेसीं करिती वि-

नंती ॥ आता नाहीं आमुची बरी गती ॥ दास लागे चरणाप्रती ॥ कशि मोह० ॥ ४ ॥

पद २६ वें. गौळण.

राधेतुझाकृष्णहरी ॥ गोकुळांत फंदकरी ॥ गवळणिच्या जाउनिघरीं॥दहींदुधचोरीकरी॥ १॥मिळउनी गौळणींचाथाट ॥ चढती यमुनेचा घाट ॥ आडविती आमुची वाट ॥ करितोमस्करी ॥ २ ॥ संगें घेउनियां गोपाळ ॥ हिंडतसे रानोमाळ ॥ करितो आमुचे बहुहाल ॥ सोसावे कुठवरी ॥ ३ ॥ गूण त्याचे सांगू किती ॥ सांगतां मसीं वाटेभ्रांती॥ वाईट आहे त्याची रीती ॥ असा ब्रह्मचारी ॥ ४ ॥ गौळणी होउनियांलीन ॥ जाती हारिला शरण ॥ क्षमाकरिजे मनमोहन ॥ दासचरण धरी ॥ ५ ॥

पद २७ वें. गौळण.

ह्या गौळणी मातें छळितातिफार ॥ ध्रु० ॥ सात पांच मिळुनी भंवताल्यामाझ्या ॥ आडवूनी लाविती द्वार ॥ १ ॥ मग ह्मणती थोर अससी तूं जरी ॥ होता बहु बरवा विचार ॥ मज० ॥ २ ॥

माणिक प्रभु ह्मणे गौळणीसी ॥ लीलादावी विश्वाधार ॥ मज० ॥ ३ ॥

पद २८ वें.

बारे जन्मोनी केलेंस काय ॥ घडि घडि पल पल वय हें जातें ॥ व्यर्थ श्रमविली माय ॥ १ ॥ कैसा तूं आलास कोठोनियेथें ॥ मनीं शोधुनि पाहें ॥ २ ॥ एकाजनार्दनीं शरण तूं जाईं ॥ लागसदा गुरुचे पायीं ३

पद २९ वें.

गोविंदाचे ॥ गोविंदाचे ॥ येरे येरे गोविंदा ॥ लवकर धांव तूं स्कंदा ॥ धरुन त्याचे चरण वंदा ॥ ॥ १ ॥ गोविंद दिनाचा कृपाळू ॥ संगेंगोपाळांचा मेळू ॥ गाई ह्मशी आणिल्या वळू ॥ २ ॥ कुंजवनांत वाजवीवेणू ॥ ऐकून मोहित झाल्या धेनू ॥ गाई चारितो तेथें कानू ॥ ३ ॥ धन्य गोकुळीचा धनी ॥ खेळतसे वृंदावनीं ॥ दासलागे तुझ्या चरणीं ॥ ४ ॥

पद ३० वें.

विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोंविला ॥ संतांचा मेळा गोपाळांचा डाव आरंभिला ॥ ध्रु० ॥

कौल घेतला लेहुन ॥ शंभर वरुषें जाण ॥ नागर धरिला, सत्वाचा ॥ बैलमन पवनाचा ॥ कुंडा काढिला, कर्माचा ॥ १ ॥ घेउन बुद्धिची, कुदळी ॥ खणून मायाजाळी ॥ उखळी प्रेमाची, लावीली ॥ स्वस्तगुरू जवळी ॥ २ ॥ पेला पाजिला अमृताचा ॥ बाहात्तर कोठड्या, शोधून ॥ शेत दिसे सगुण ॥ माळा घातला, पाहून ॥ उदीम केला जाण ॥ पापी केला, पुण्याचा ॥ ३ ॥ पंचतत्वांची, गोफिण ॥ क्रोध पाखरें जाण ॥ धोंडा घेतला, ज्ञानाचा ॥ करीतसे जाग्रण ॥ धडा घातला, मायेचा ॥ ४ ॥ शेतपीकलें अद्भुत ॥ माल आणिला खळ्यांत ॥ पायल्या भरूनी, मोजित ॥ बीजहें राखित ॥ गाडा भरिला, धान्याचा ॥ ५ ॥ काया शरीर, गुरुपुण्यें ॥ धुंडी निरंजन॥केशवदास ह्मणे संतांचा॥ गज० ६

पद ३१ वें.

निजलिस कायगे हो जागी तमाखूखायगे ॥ ॥ ध्रु० ॥ चंचित नाहितर बटव्यांत पाहिगे ॥ बटव्यांतनाहितर गाडग्यांत पाहिगे ॥ गाडग्यांत ना-

हिंतर फडक्यांत पाहिंगे ॥ निजलिस० ॥ १ ॥ तमाखु आणुन करतेस कायगे ॥ माझ्या कोयिंत चुनाच नाहिंगे ॥ रात्रीं मजला झोंपचि नाहिंगे ॥ निजलिस कायगे० ॥२॥ पहांटेसउठून शेतांत जाइंगे ॥ वांइसी पदरांत वेउनि येईंगे ॥ वांइसी मध्वनाथाला देइंगे ॥ निजलिसकायगे० ॥ ३ ॥

भजन

पांडुरंगे विठाबाई माझे आई पांडुरंगे.

पद ३२ वें.

उठाजिमायबाप, कशिलागलि झोंप॥ हुजूर जाउनियां, एवढीचुकवारेखेप ॥ ध्रु० ॥ रात्रंदिवस तुह्मी सावधअसा॥ तुमच्या नगरीचा आह्मा नाहीं भरवसा ॥ उजेडपडतांना, गळांपडेलफांस ॥१॥ तुमची नांदणूक, आह्मादिसनाबरी ॥ तुमच्याशेजारींहो, एकमूलवादकरी ॥ २ ॥ हिंडतांदेशांतरीं, लक्षचौऱ्याशीं जागा ॥ अजुन आठवेना, आलामुळच्या मार्गा ॥ ३ ॥ माहेराच्यातोलण्याचा, कांहींऐवज

काढा ॥ त्याचेसत्तेनें, आह्मींबोलूं घडघडां ॥ एका-
जनार्दनी, धरा बळकट मेढा ॥ ४ ॥

पद ३३ वें.

कसें बोटांनींदाखवूं तुला ॥ पह्मा अनुभव गुरु-
च्यामुला ॥ध्रु०॥ नकोसोडूं देठिच्यामुळा ॥ सोड
अंजुळी आपुल्याकुळा ॥ १ ॥ कितिपाह्माशिल प-
ह्माभोवतें ॥ येतांजातांसवेंआसतें ॥ तुझ्यापाठीपां-
वागतें ॥ तुझ्या लोचनींचमकतें ॥ २ ॥ हीरवूण त्वां
ओळखुनध्यावी ॥ गुरु त्रा जाउनपुसावी ॥ तोने-
उनतुजदाखवी ॥ ज्ञानदेवेंसांगीतली ॥ तेणें मुक्ती-
ही जोडली ॥ ३ ॥

पद ३४ वें.

सांगाबामारुती कींमजला कधींभेटेलरघुपती ॥ कीं
मजला० ॥ ध्रु० ॥ मी अपराधी वचनी निरंतर॥उर-
वित उन्मिळापती ॥ कींमजला० ॥१॥साधुसीं छ-
ळिलें मजफळ आलें ॥ राक्षसवनीं गर्जती ॥ कीं-
मजला० ॥ २ ॥ एकाजनार्दनी आसरा तुमचा ॥ दे
साधुसंगती ॥ कींमजला० ॥ ३ ॥

आवळूनकवळून ऱ्हदयींधरावें भेटावें आज लव-
लाही ॥ लक्षांजुळी तुळशीमाळा मणभर बुका स-
ईबाई ॥ अर्पणकरूनिवेळोवेळां मस्तकठेवावें
पायीं ॥ १ ॥ नाहींहामनाला धिरगबाई, भेटीसा-
ठीं जिवझुरतो ॥ शिणती डोळे अश्रु वाहती
जिवमाझा निघुंनिघुं पाहतो ॥ आषाढीचा सोह-
ळा मोठा संतमेळा कींमिळतो ॥ गरूडपारीं नाम-
तडाका, गजरमोठा गर्जतो ॥ यात्रा फार फारमि-
ळाली दाटी झाली दर्शनाची ॥ २ ॥ येकीमेकींचा
हात धरुनी प्रदक्षणेला बाई जावें ॥ लोटांगण घा-
लुनी आनंदें रंगशिळेवर नाचावें ॥ चंद्रभागेचें स्ना-
न करूनि पुंडलिकाचें दर्शन घ्यावें ॥ वाळवंटावर
उडती पताका हें कौतुक डोळ्यानें पहावें ॥ वेणु-
नाद खडकावरी घाडी घ्यावी काळ्याची ॥ ३ ॥
पंढरी वैकुंठ वसविलें भूमंडळीं ऐसें नाहीं ॥ हांके-
सरसा धांवुनयेतो, भेटे विठोबारुखमाई॥ नाथन-
रहरीह्मणे महिपती, हाभरला सर्वांठायीं ॥ अणु-
रेणू यापरताठावदुजाकोठें नाहीं ॥ प्रेमळ कीर्तन

बहूत प्रीती आवडी ज्याला भजनाची ॥ मायबहिण विठाबाई कधीं भेटेल पंढरपुरची॥ ४ ॥

पद ३९ वें.

पाहिलें स्वप्न,यास्वप्नाच्या अवसरीं,जणूं कां होतें पंढरपुरीं ॥ ध्रु०॥करुनि एकचित्त,एकचित्तसत्वर,हरुषलें मन माझें फार ॥ सोडुन प्रपंच, प्रपंच घरदार, मिळाले संत,या संतांचे भार ॥ हरुषलें मन माझें फार ॥ चाल ॥ जावें संगातीं येकमेकांचा धरून हात, टाळ मृदंग वाजती, जणूं का द्वारीं ॥ ॥ १ ॥ चंद्रभागेसी, भागेसी अला पूर ॥ संत मिळाले अपार ॥ दिंडीपताका, पताका येक्सर ॥ होतो हरिनामाचा गजर ॥ चाल ॥ उतरलों पार, पाहिलें पंढरपुर, जणूं भक्तीचें माहेर॥उभा पुंडलीकाचे द्वारीं ॥ जणूं पाहिलें० ॥ २ ॥ सहजमी गेलों, गेलों राउळांत ॥ पाहिली गरुड पारीं मात ॥ सभामंडप, मंडप न्याहाळीत ॥ ठेविले कटावरी हात ॥ चाल ॥ पाहिलीं दृष्टी, सत्यभामेच्या घेतल्या भेटी, उभे पांडुरंग जगजेठी ॥ जगजेठी

## पद ३५ वें.

विठाई विठाई माझे कृष्णाई कान्हाई ॥ रंगाये-ईहो येई ॥ध्रु०॥ वैकुंठवासिनी॥ विठाई जगत्रयजननी ॥ तुझावेधुमाझेमनीं रंगायेईहो ॥ १ ॥ कटी-कर विराजित ॥ मुगुटरत्नजडित ॥ कांसे कसिला पीतांबर ॥ तैसायेई धांवत रंगायेईहो ॥ २ ॥ विश्वरूपाविश्वंभर ॥ कमलनयन कमलाकर ॥ तुझें-ध्यान लागोबरें ॥ बापरुक्मादेवीवर ॥ रंगायेई-हो येई ॥ ३ ॥

## पद ३६ वें.

पोपटपंची हेराम, पोपटपंची ॥ बोलीबोलेहरी-नामाची ॥ पोपट० ॥ध्रु०॥लटपटपंची चतुरसुजाण ॥ करीयाश्रीरामाचें ध्यान ॥ नकोकरूं अनमान ॥ चक्कर खासी ॥ हेराम पोपटपंची॥१॥ आंबे, जांबे, द्राक्षें, केळे ॥ तुजला खायाला निर्मळ ॥ छायापाहुनियांशीतळ ॥ उडूनिजाशी ॥ हेराम पोपट पं० ॥ २ ॥ हरीनामाविण तोंड ॥ जैसेंचर्म-काचें कुंड ॥ मैना मिळाली कुळभंड ॥ कींविलया-

जासी ॥ हेराम पो०॥ ३ ॥ पूर्वजन्मींचा सोयरा ॥ कैक काळासीथरारा ॥ ओळखवत्यासी ॥ हेराम पोपटपं० ॥ ४ ॥ पक्षा मारिला भरारा ॥ धरिलापंढरपुरींथारा ॥ आत्मारामकिंकर ॥ शरणंसद्गुरुसी॥ हेराम पो० ॥ ५ ॥

पद ३७ वें.

सांगाबालवकरी कींमजला ॥ कधींभेटेल मुरारी कींमजला ॥ ध्रु० ॥ अक्रुर आला घेउनगेला ॥ बळीराम श्रीहरिकींमजला ॥ १ ॥ गाईवत्सें हांबरती ॥ विकळहोती अंतरीं ॥ कींमजला ॥ २ ॥ गोपी गोप मिळुनीसर्वही ॥ लीलावर्णिती परोपरी ॥ कींमजला ॥३॥ अन्नवस्त्रें सर्वहीत्यजुनी ॥ लोळती धरणीवरी ॥ कींमजला ॥ ४ ॥ दासाविलापें हरिलाविनवी ॥ भेटद्यावी लवकरी ॥ कींमजला ॥ ५ ॥

पद ३८ वें.

निढलावरी करठेउनी ॥ वाटपाहते केव्हांची ॥ मायबहिणविठाबाई ॥ कधींभेटेल पंढरपुरची॥ध्रु० ॥ ऐसें वाटतें माझ्याजिवा॥उठून जावें त्याठायीं ॥

कैवारी ॥ जणूं० ॥ ३ ॥ आहो हरी वाहिला बुका, बुका तुळशिमाळा॥गंधअक्षता प्रेमळा ॥ वसुदेवदेवकी, देवकीच्या बाळा ॥ नंदयेश्वदा करूं सोहळा ॥ चाल ॥ तुझें नाम घेतांसत्वासी पावन होतां ॥ तुकाराम तुला विनविता, विनविता वारंवार जणूंका पाहिली पंढरपुरीं, ॥ ४ ॥

## भजन-

॥ जयराधाकृष्णराधा ॥

पद ४१ वें.

सखेसाजणी जिवलग गडणी स्वप्न पाहिलें डोळां ॥ आकाशीं देखिला एक मेळा ॥ ध्रु०॥पहिले प्रहरीं उफराटी विहिर मोट लाविली एक ॥ खालीं नाडा वरती चाक ॥ तीनबैल आणि माळी निजला अमोलिक ॥ पिकलें पिक तिथें कोल्हा संवकलाएक ॥ चाल ॥ याकोल्ह्याला तीन मस्तकें दोन तोंडें थान एक ॥ एक आठावाहेउदक ॥ तोड ॥ नार देखणी पहाया गेलों विवशी

पडली गळा ॥ आकाशीं देखिला एक मळा ॥ १ ॥ दुसरे प्रहरीं स्वप्न देखिलें ऐका चित्त देऊन॥ केलें मडकें कुंभाराने ॥ त्या मडक्याला नऊ छिद्रें आंत भरलें जीवन ॥ त्यामध्यें एक कामिन ॥ चाल ॥ तिच्या मुखांत चवदा लोक॥जळीं असून पडला शोक ॥ गेलाकुंभार तिच्या पोटांत ॥ तोड ॥ ठाऊक असेल ह्मणून पुसतों तुला ॥ आकाशीं दे० ॥ २ ॥ तिसरे प्रहरीं गायदेखिली काय सांगु कौतुक॥तिच्या मुखांत चौदा लोक ॥ तिजला पाहतां दृष्टिठरेना कोठें तिची बैठक ॥ दोन तोंडें थान येक॥चाल॥तिचा पार कळेना कोणा ॥ वेदशास्त्रपुराणा ॥ गुरूमतींच्या खुणा ॥ तोड ॥ ठाउक असेल ह्मणून पुसतों तुला॥ आकाशीं ०॥ ३॥ चवथे प्रहरीं ब्रह्ममूर्तीं मन करुन निश्चळ॥तिथें पार्वतीची एक वेल॥ त्या वेलीची खटपट सरली पहाया बिजाचें मुळ ॥ तेथं ईश्वरगण केवळ ॥ चाल ॥ तेथें वाद्यें वाजती दहा॥सद्गुरु कृपा तरी पहा ॥ कवि नाथ

तरीच ज० ॥ ३ ॥ निजानंदेंनिज आनंदें ॥ निजानंदें निज आनंदें ॥ नारायण श्रीरंगीं रंगुनि ॥ जावें गे बाई जावेंगे ॥ तरीच जन्मा यावें ॥ तें रूप पहावें गे बाई० ॥ ४ ॥

पद ४४ वें.

नवल नेणो कोणी तु सांगा ब्रह्मज्ञानी ॥ ध्रु०॥ चहु रंगावेगळी गाय दुभते माझे घरीं ॥ मांजर बाई चोरटे मोठें टपलें लोण्यावरी ॥ नवल० ॥ १ ॥ लोण्याकडे मांजर टपलें ॥ पाहिगे उमाबाई ॥ लोण्यानें तें मांजर खादलें नवल सांगूं काई नवल० ॥ २ ॥ आकाशीं करुनी कुमार तिघे पुत्र व्याली ॥ पुत्राचें तें लग्न नाहीं॥आपण बाइल झाली ॥ नवल० ॥ ३ ॥ बायको कशी दादल्या सकट पांच पुत्र व्याली ॥ तेथुनियां ओस करुनी मुळचे घरीं आली ॥ नवलनेणो० ॥ ४ ॥ दासकरी आस तुझी मिथ्या सकल माया॥ केशवाची कृपा झाली नढळे अमर काया ॥ नवल नेणो० ॥ ५ ॥

## पद ४५ वें.

भक्तांसाठीं तो जगजेठी बसोनि माळ्यावर॥पांखरें उडवी सारंगधर ॥ ध्रु० ॥ भक्तांमध्यें भक्ति पहा त्या बोधल्यानें केली ॥ थोंट ताटाना कणसें आलीं ॥ ऐसा तो देव अनंत विठ्ठल अनंतरूपें ख्याली ॥ कशी देवभक्तांची माउली ॥ त्याचे चरणापाशीं विनंति जोडुनिकर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥ १ ॥ नामदेवासी म्हणती ब्राह्मण जात तुझी ओंगळ ॥ नीघ बाहेर करिशि विटाळ ॥ तेव्हां तो गेला देउळामागें केले दगडाचे टाळ ॥ हरिनें फिरविलें देउळ ॥ अगाध लीला त्याची द्वारका एके खांबावर ॥ पाखरें उडवीसारंग० ॥ २ ॥ जनाबाईच्या घरीं भरिल्या देवें घागरी॥चहूं हातानीं रांजण भरी॥ दळण कांडण धुणें धुवोनी पांटीडोईवरी ॥ गंवऱ्या वेंचुन आणी घरीं ॥ प्रल्हादाला तेव्हां तारिलें जळत अग्नीवर ॥ पांखरें उडवी सारंगधर ॥ ३ ॥ चोख्यामेळ्याचे घरीं देवानें सोडिली द्वादशी ॥ तेव्हां तें श्रुत झालें रायासी ॥ नेलें पाचारुनि रायें तेव्हां

निरंजन महा ॥ तोंड ॥ जिकडे तिकडे व्यापक अवघा हाची घन दाटला ॥ आकाशीं० ॥ ४ ॥

पद ४२ वें.

धुतांच मोतीं जळीं हरपलें सखोल मोठें पाणीं ॥ चला पाहुं सात चार अठरा जणी ॥ ध्रु० ॥ प्रपंचधोंडामृगजळ पाणी आपटीत होतें चोळी ॥ विसरलें सुख वसरलें तळीं ॥ सखे मायेनें मोतीं दडविलें भवसिंधूच्या जळीं ॥ होती गडे भ्रांती बहिण जवळी ॥ तिणेंच मजला गोष्टी विनाविल्या चित्त गेलें भुलोनी ॥ चलापा० ॥ १ ॥ आठजणीनीं मोतीं दडविलें वर ठेविला धोंडा ॥ अशाच पहाती अवघ्या रांडा॥ बारा सोळा तळीं उतरल्यां त्यानीं धरिला दांडा॥ठाउक सत्रावीला झेंडा॥त्यामध्यें मी गर्क झालें येकलीच बाई वनीं ॥ चला पा० ॥ २ ॥ चवघीजणी सत्वर मिळोनी डोळीं अंजन घाला ॥ माझ्या मोत्याला प्रेमें न्याहाळा॥ ज्ञान बोधाची लावुन दिवटी बरवी वात उजळा ॥ माझे मोत्याला सर्व कळा ॥ प्रपंच पडदा फा-

डुन गुरुपदीं लावागे ठिकाणीं ॥ चलापा० ॥ ३ ॥ चौघीजणी मोक्ष नाइका मजला धरा हातीं ॥ उतरा सागर पैलपंथीं॥ या मोत्याच्या साठीं मजला जाणें आहे सती ॥ ह्मणून मी येतें काकूळती ॥ ज्ञानदेव ह्मणे चिन्मय मोतीं नमिळे गुरुवांचुनी ॥ चलापा० ॥ ४ ॥

## पद ४३ वें.

कटावासारीखी चाल.

तें रूपपहावें गे बाई पहावेंगे ॥ तरींच जन्मा यावें ॥ ध्रु० ॥ चिंतिती हरिहर तें रुप नारद ॥ चिंतिती हरिहरतें रुप नारद ॥ अलक्ष अगोचर तेथें मन हें न्यावें गे बाई न्यावेंगे ॥ तें रुप पहा० ॥ १ ॥ उलटपलटकर त्रिकुटशिखरपर ॥ उलटपलटकर त्रिकुटशिखरपर ॥ अमृत झरझर वाहे निरंतर ॥ योगबळानें प्यावें गे बाई प्यावेंगे ॥ तरीच ज० ॥ २ ॥ झांझांझंगड वाजे अववड ॥ झांझांझंगड वाजे अवघड ॥ नाद भडाभडहोति कडाकड ॥ अनुहात त्याचें नांव गे बाई नांवगे ॥

शिक्षा दिधली त्यासी ॥ देवा तूं मार त्याचा खासी ॥ अगाध तूझी माव कळेना तुका जोडुनि कर ॥ पाखरें उडवी सारंगधर ॥ ४ ॥

पद ४६ वें.

पुरे येकचि पुत्र माय पोटीं॥हरि स्मरणें उद्धरि कुळें कोटी॥१॥धन्यवंशीं जन्मलाभागीरथ॥ गंगाआणोनिपूर्वजकेलेमुक्त ॥ २ ॥ गौतमानें आणिली गोदावरी॥आपणतरोनी दुजयासतारी ॥ ३ ॥ पांचवर्षांचें ध्रुवबाळ तान्हें ॥ अढळपदीं स्थापिलें बहुमानें ॥४॥ तेजःपुंज सीतल सौख्यदानी ॥ एकचंद्रप्रकाश त्रिभुवनीं ॥५॥ पहा कैसातो पुंडलीक धीट॥उभा केला वैकुंठनायक ॥ ६ ॥ रामरूपीं जन्मला कीर्तिवंत ॥ अंजनीचे उदरीं हनुमंत॥ ७ ॥ तुका ह्मणे हरिसी विन्मुख॥गांधारीचे उदरीं शतमूर्ख ॥ ८ ॥ पुरेयकचिपुत्र० ॥

पद ४७ वें.

येथें कोणाचें काय बा गेलें॥ज्याचें त्याणेंच अनहित केलें ॥ ध्रु० ॥ संतीं सांगितलें ऐकेना ॥ स्वता बु-

ष्टीही असेना ॥ वृत्ती निबरली पिकेना ॥ मूढ को-
णाचें ऐकेना ॥ येथें० ॥ १ ॥ अन्य यातीचे संगती
लागे ॥ साधूजनामध्यें न वागे ॥ केल्यावीण परा-
क्रम सांगे ॥ जेथेंचि सांगे तेथें भीक मागे ॥ येथें
को० ॥ २ ॥ नीत टाकुन अनीत चाले ॥ भडभड
भलतेंच बोले ॥ मंद होउनी उन्मत्त डोले॥ अखेर-
फार वाइट झालें ॥ येथें को० ॥३॥ तुका ह्मणे कां-
हीं नेम॥ चित्तींनधरी अधम॥सांग पडलासे भ्रम॥
अंतीं कुटील त्यासी यम ॥ येथें कोणाचें काय
गेलें ॥ ४ ॥

---

# हिंदुस्थानीभजनीपदें.

## पद ४८ वें.

कन्हैयामेरोप्राण, श्रीब्रिंदाबनवासी ॥कन्हैया०
॥ ध्रु० ॥ सांवलीसुरतपरमनवारी॥कोयकरेजगहां-
सी ॥ कन्हैया० ॥ १ ॥ राधावरकेनिकटबसतहै ॥
कोणजातमेरोकाशी ॥ कन्हैया० ॥ २ ॥ मीराके

प्रभु गिरिधर नागर॥चरण कमलकी दासी॥कन्हैया मेरो० ॥ ३ ॥

पद ४९ वें.

हमसे न बोलो महाराज॥तुम तो कुब्जासे मन राजी॥ ध्रु०॥हमेकहे शृंगार उतारो॥दृग अंजन दो ढुंडारो ॥माथे तिलक चढायो॥ वेरावा लोचन महाराज ॥ हमसेनबो० ॥ १ ॥ हमारे कहे तुमे भीक लागी ॥ लोकलाजेसबहीयेमत्यागी ॥ खानापीना उनयेसंग॥हमसेंनबोलना० ॥ २ ॥ बृंदावनकेकुंज गलीमो ॥ बन्सीमोकछुआछोरसगायो॥मीठीतारन सुनायो ॥ बोलीयेबोलनामहाराज ॥ हमसेंनबोलनामहाराज ॥ ३ ॥ तुह्मारोकहेसेहमेभिकलागी ॥ तुमारीजायेबोवनरसचाखी ॥ मीराकेप्रभुगिरिधरबनबनयेडोलनामहाराज ॥ हमसेंनबोलनामहाराज

पद ५० वें.

मिराभक्तिकरेपरघटकी ॥ करेपरघटकीनाआटतुमजानतहोसबघटकी०॥ ध्रु ॥राममंदिरमोमिराबाईनाचे ॥ तालतंबुराबाजेचिटकी ॥ मिराभक्तिक०

॥ १ ॥ पावमेघुंगुरआवाजसुनावे ॥ रामरसायनघुटकी ॥ मिरा० ॥ २ ॥ राणाजीकहेप्यालापिलयो ॥ साधुसंगमिराहटकी ॥ मिरा०॥३॥ शंबदंडपरमीरानाचे॥सिरपरघागरमटकी॥मिराभक्तिकरेपरा॥४॥

## भजन

॥ सीतापतेसीतारामसीतारामसीताराम ॥

### पद ५१ वें.

जमुनाजीकोतीर ॥ चलोमनजमुनाजीकोतीर ॥ घ्रु० ॥ कान्हाजीगावतबन्सरीबजावत ॥ संगलीयोबलभीम ॥ चलोमन० ॥ १ ॥ जमुनाजीकोनिरमलपाणी ॥ शीतलभयोशरीर ॥ चलोमन० ॥२॥ मिराकेप्रभूगिरीधरनागर चरणकमल बलहारी ॥ चलो०॥ ३ ॥

### पद ५२. वें.

मैयामोरेभागजागे ॥ साधुआयापावणा ॥ चुवाचंदन घासलियो ॥ आंगकुलगावना ॥ घ्रु० ॥ मथुरामे कंसमारा ॥ लंकापतीरावणा॥१॥राजाबलीदवारेठहहरी ॥ रूपलियाभावना ॥ २ ॥ गोकुलमे

जाकेठयरी ॥ द्वारका वसावना ॥ ३ ॥ मिराबाई
हरिकी दासी ॥ पगकुलगावनाजी ॥ मैया० ॥ ४ ॥

पद ५३ वें.

कुबजेनेजादुडारा॥उन्नेमोहाश्यामहमारा ॥ध्रु०
जादुकीपुडीयापडपडमारे ॥ जाणेकांभेदविचारा॥
॥ १ ॥ रात्रअंधारीबिजलीचमके ॥ देखेचंद्रबिच-
कोरा ॥ २ ॥ आवमोरेसांवरीयाचवसरखेळूं ॥ तु-
मजितामैहारा ॥ ३ ॥ मिराकेप्रभूगिरिधरनागर ॥
संतसमागमन्यारा ॥ ४ ॥

पद ५४ वें.

मनमोहनादिलकाप्यारा ॥ माताजसोदापाल-
नाहलावे ॥ हातमेलेकेदोरा ॥ ध्रु० ॥ मनमो०॥१॥
कबसेआंगनमोखडीहैराधा ॥ देखेकिसनकाचेहरा
॥ मनमोह० ॥ २ ॥ मोरमुगुटपीतांबरशोभे ॥
गळामोतनकागजरा ॥ मनमोहन० ॥३॥ मिराके-
प्रभूगिरिधरनागरचरणकमलबलहारा ॥मनमो० ४

पद ५५ वें.

जमुनाजीकोतीरदधीबेचनजावूं ॥ ध्रु० ॥ एक-

तोघागरासिरपरभारी ॥ दुजासागरदूर ॥ कैसीदधी-
बेचनजावूं ॥ १ ॥ येकतोकन्हैयाहटेला ॥ दुजामा-
खनचोर ॥ कै० ॥ २ ॥ येकतोननंदहैहटेली ॥ दु
जासासरानादान ॥ कैसी० ॥ ३ ॥ हेमिरादरसन-
सुप्यासी ॥ दरसनदिजोरेमहाराज ॥ कैसी० ॥ ४ ॥

पद ५६ वें.

कानातोरी घुंगरीयापहरी ॥ होरीखेलेकिसनगि-
रिधारी ॥ ध्रु० ॥ जमुनाकेनिरतिर धेनुचरावत ॥
खेलतराधाप्यारी ॥ कानातोरी० ॥१॥ आणीकोरे-
गंगा ओरीकोरे जमुना ॥ बिचमेंराधाप्यारी ॥ का
नातोरी०॥ २ ॥ मोरमुकुटपितांबर शोभे ॥ कुंडल
कीछबन्यारी ॥ कानातोरी०॥३॥मिराकेप्रभु गिरध
रनागर, चरण कमलबलहारी ॥ कानातोरी० ॥४॥

पद ५७ वें.

दिजोमारी नवरंगचुनडी ॥ कानालागुतारो पा
य ॥ ध्रु०॥ गोरस लेके तोचलीमथुरा ॥ सिरपरघा
गर फूटी ॥ १ ॥ आलीकोरगोकुलपेलीकोर जमु-
ना ॥ बिचमेंजमुनाकाघाट ॥ २ ॥ त्रीभंगीआसन

गोवर्धन धरलियो ॥ त्रीभंगीमुरलीयेक ॥ ३ ॥ मी राकेप्रभु गिरिधरनागर चरनकमल बलहारी॥ ४ ॥

पद ५८ वें.

चोरीमोरीगेंदयामैकैसी जावूं पानीयां ॥ ध्रु०॥ ठारोकिसनजीजमुनाकिनारे॥ ग्वालबालसब संगलि यो ॥ न्यारे न्यारे खेलखेलके ॥ बनसी बजावे तट वाला ॥ १ ॥ सबग्वालिनिके मनकुंभावे ॥ मुरली केखुबतालसुनावे ॥ गोपीघरकाधंदाछोडके ॥ मलपटजावे ॥ २ ॥ सूरदासप्रभुतुमारेचरणकुं ॥ नेमप्रेमसेभजतहै ॥ दयाकरकेदरसनदेना ॥ दीना नाथतुमारोरे ॥ ३ ॥

पद ५९ वें.

सुमन आयो बदरा शामाबिना ॥ ध्रु० ॥ सोव तसपनोमें देखतशामकुं ॥ भरआयोनयननिकलग यो कचरा ॥ १ ॥ मथुरानगरकीचतुरामालण ॥ शामकुहार हमकुबी गंजरा ॥ २ ॥ मिराकेप्रभु गि रिधरनागर ॥ समजगयोपिछे मिटगया झगरा॥३॥

पद ६० वें.

देखो देखोरे जसवदामैय्या तेरा लालना ॥ तेरालालनामैय्या झुलेपालना ॥ ध्रु० ॥ बाहारदेखेतो बारारे बरसकुं ॥ भितरदेखे तोमैय्यां झुलेपालना ॥ १ ॥ जमुनाजल राधा भरनेकुनिकली ॥ पकरत जोबन मैय्यां तेरा लालना ॥ २ ॥ मिराकेप्रभु गिरिधरनागर हरिकाभजन नितकरना मैय्यां तेरालालना ॥ देखो० ॥ ३ ॥

## भजन.

॥ भक्तराजकैवारि सांवळ्यायेरे वनमाळी ॥

पद ६१ वें.

जसवदामैया नितसतावे कनैय्यां ॥ वाकुं भुरकत क्याकहूं मैय्यां ॥ ध्रु०॥ बैललावे भीतरबांधे ॥ छोरदेत सबगैय्या ॥ जसवदा० ॥ १ ॥ सोते बालक आनजगावे ॥ ऐसा धीटकनैय्यां ॥ जसवदामै० ॥२॥ मीराकेप्रभु गिरिधरनागर हरिलागूं तोरीपैया ॥ जसवदामैय्यां ॥ ३ ॥

### पद ६२ वें.

कानाचालो माराघेर कामछे ॥ मारा घेर काम छे ॥ सुंदर तारूं नामछे ॥ ध्रु० ॥ मारा आंगणमो तुलसीनुंझाडछे ॥ राधागौळण मारूं नामछे ॥ काना चालो० ॥ १ ॥ आगला मंदिरमो ससरासुते लोछे ॥ पाछला मंदिर सूमसामछे ॥ कानाचालो०॥ २ ॥ मोरमुकुट पितांबर शोभे ॥ गलामोतनमाल छे ॥ काना० ॥३॥ मिराकेप्रभु गिरिधरनागर चरन कमल चितजायछे ॥ काना चालो० ॥ ४ ॥

### पद ६३ वें.

हममतछेडो कनयां लागुं तेरे पैय्यां ॥ध्रु० ॥ मनमोहन येधेनु चराये गळा वैजयंती माळ ॥ वृंदावनमें धूममचाये गोपी कामतवाला ॥ १ ॥ सबसखियनमिल पानियाभरनगई ॥ व्हांको मिले गिरिधारी ॥ परनारीके पालवपकडे ॥ क्याकरेमनवा बीचारी ॥ २ ॥ आसपास गोपालखडेहै ॥ बीचठाढे गिरिधारी ॥ मधुबनमें जाके किसनजी ॥ छेडे गवालनसारी ॥ ३ ॥ तुलसीदासप्रभु अबक्या

जैये॥आनामिली ब्रजनारी ॥गोकुलकाहै बालनहारा ॥ देखो मदनमुरारी ॥ ४ ॥

पद ६४ वें.

किसनजी पैरेमोतनका तुरा ॥ ध्रु० ॥ भक्तवत्सल तुम करुणासागरहो ॥ कृपाकरे मज पैयाथारा ॥ मैहुजुरातेरा ॥ तुंप्रभुमेरा ॥ १ ॥ अंबऋषीका गर्व जोधारा ॥ देवकीसुखकीनोदैत्यसंहारा ॥ दुर्जन मारा भक्तनतारा ॥ २ ॥ लंकानाथजोप्रौढजा भयाहा ॥ राम अवतारले रावणमारा ॥ अहिल्यातारा बिभीषणतुरा ॥ ३ ॥ गोकुलम्याने गजबजउठलेहो ॥ किसनाविंध्यो कंस चाणूरा ॥ द्रौपदीकैवारा ॥ कुब्जाउद्धारा ॥ ४ ॥ पंढरीनाथका दास लागे पैयाहा ॥ कृपाकरेतुज मैयाथारा ॥ मैतेरा छोरा ॥ लेव मेरा मुजरा ॥ ५ ॥

पद ६५ वें-

लछिमन धीरे चलो मैतोहारी ॥ ध्रु० ॥धूप लगति मोहेप्यास लगतिहै ॥ तुंतो पवनाहारी ॥ १ ॥ कोन राजकी तुमहोकन्या ॥ कोन पुरुषकी नारी ॥

२ ॥ राजा जनककी हमहैकन्या ॥ अनाथनाथ की नारी ॥ ३ ॥ तुलसिदास आसरघुवरकी ॥ चरण कमल बलिहारी ॥ लक्षुमन० ॥ ४ ॥

पद ६६ वें.

श्रीकिसनने मुरलिबजाई ॥ ग्वालबाल सब मोही ॥ ध्रु० ॥ मथुरानगरमे ग्वालन मिलके ॥ गोरस बेचनआई ॥ कृष्णजीयेई, गोरसखाई ॥ थट्टा करुनी जाई ॥ श्रीकृष्ण० ॥ १ ॥ गवालन उठके धुंडे गोकुल, कांहीं पत्ता लागतनाहीं ॥ जाउनसांगे, यशोदेपाशीं ॥ आतां त्या समयीं ॥ श्रीकृष्ण० ॥ २ मिराकेप्रभु गिरिधरनागर, प्रभुकेचरण चितठाई ॥ लगतारखना भावभक्तिसे ॥ इसमे धन्यताहोई ॥ श्रीकृष्ण० ॥ ३ ॥

पद ६७ वें.

कनयांसामळो मारीवात ॥ ध्रु० ॥ नंदका छोरा दधिदुधखावत ॥ मटकीलेकरहात ॥ कन० ॥ १ ॥ गोधन चारत गोधन धूवत ॥ मुरली लेकर हात ॥ कन० ॥ २ ॥ मोरमुकुट पितांबर शोभे ॥ हमसे

करतनाच ॥ कन० ॥ ३ ॥ कहे तुकाराम नंदका-
छोरा बांसरि बाजे दिनरात ॥ कन० ॥ ४ ॥

पद ६८ वें.

कानाबनसरी बजाय गिरिधारी ॥ तोरिबन्सरी लागी मोको प्यारी ॥ध्रु० ॥ दहिंदुधबेचने, जाती जमुना ॥ कानाने घागर फोरी ॥ काना०॥१॥शिर परघडा, घडेपर झारी ॥ उस्कुं उतार मुरारि ॥ काना० ॥ २ ॥ सासबुरीनें, ननंद हठेली ॥ देवरदेवे मोको गारी ॥ काना० ॥ ३ ॥ मिराकेप्रभु गिरिधर नागर ॥ चरण कमल बलहारी ॥ काना० ॥ ४ ॥

पद ६९ वें.

दिजोहो चुनरियां हमारी ॥ किसनजी मै कन्याकुमारी ॥ ध्रु० ॥ गौळण सबमिल, पानियाभरनजाती ॥ व्हांको करत बलजोरी ॥ दिजो० ॥ १ ॥ परनारिको पल्लो पकडे ॥ क्याकरे मनवा बिचार ॥ २ ॥ ब्रिंदाजीवनके, कुंजवनमो ॥ माररंगकी पिचकारि ॥ ३ ॥ जाके कहती हुं, यशोदामैय्यां ॥

होगी फजीती तुह्मारी ॥ मिराकेप्रभु गिरिधरनागर भक्तनके है लहरी ॥ दीजो हो चुनरीयां ॥ ४ ॥

पद ७० वें.

खेलनेन जाऊंमैय्यां, ग्वालनी खिजावे मोहे ॥ पीतवस्त्र गुंजमाला, लेतीहै छुडायके ॥ खेलनेन० ॥ ध्रु० ॥ कोई तेरा नामुलेके, लागीगारीमोकुदेण ॥ मै भीवाकुं गारीदेके आयहुंपलायके ॥ खेलनेन० ॥ १ ॥

कोई मेरा मुखचुंबे, भवनबुलायकेरी ॥ कांचली उतारलेती, देतीहै नचायके ॥ खेलनेन० ॥ २ ॥ सुरप्रभुतो तलात, मैय्यां सुकहतुबात ॥ हांसेउठू मैय्यां लेती ॥ कंठलगायके खेलनेन० ॥ ३ ॥

## भजन

॥ ज्ञानदेव माउली जयजय ज्ञानदेव माउली ॥

पद ७१ वें.

मै नाहीं दुध खायो मेरी मैय्यां, नाहीं दुध खायो ॥ ध्रु० ॥ प्रातह्मोत उठे गवनुपाछे, मधुबनमोहें पठायो ॥ सारादिन बनसी बनभटक्यो, संध्या भई घर आयो ॥ मै नाहींदुध० ॥ १ ॥ मैढोतो पा

वनको छोटो छीकाके बिदपाये ॥ ग्वाल बालमोरे पाछे पडेहै ॥ ऐसेहीझुट लगायो ॥ मैय्या मोरे मे नाहीं दुध खायो ॥ २ ॥ चंद्रसखी भज, बालकृष्ण छब ॥ प्रभुचरणमन छायो ॥ सारो बृज मे आनंदभयोरी जसोमतही बलजायो ॥ मैयाभेरी मैनाहीं० ॥ ३ ॥

पद ७२ वें.

बंदेहुशाररहनाबे ॥ साहेब राजी रखनाबे॥ध्रु० ॥ गांजा दारु मत पीयारो अक्कल गुंग होती ॥ अपने पल्लेका दामखरचकर मुखमे मखिया जाती ॥ बंदेहु० ॥१ ॥ जुवेबाजी मतकर यारो अक्कलगुंग होती ॥ अपने पल्लेका दाम खरचकर शिरपर जुतिया पडती ॥ बंदेहु० ॥ २ ॥ रंडीबाजी मतकर यारो, अक्कलगुंग होती ॥ अपने पल्लेका दाम जाकर, हातमे चवरी आती ॥ बंदेहु० ॥ ३ ॥ एकाजनार्दनकाबंदा, अक्कल तुझकुं देता दिलचाहेसो सिकलेप्यारे, नाहिं तो जागूखाता ॥ बंदे हु० ॥४॥

पद ७३ वें.

जिन्ने तुझकूं पैदाकिया, कर उसका संदेसारे ॥ इंद्र जाल तव प्रपंचसारा सुतवंध्येचा जैसारे ॥ ध्रु० ॥ तनजोबन आसकहुआक्या पायाआरामरे ॥ इंद्रिय जन्य सुखातें भाळुनिननेणसी आत्मारामरे॥ जिन्ने तुजकूं पैदाकिया० ॥ १ ॥ क्यौंगफलतमें गाफल हुवा, किस लालचपरप्यारे ॥ किरण न जाणुनि श्रमती हरणें, जैसीं उदकाभासारे ॥ जिन्हे० ॥ ॥ २ ॥ क्या आसनहीं किये कुफरसें, क्यौं करहि हुवा दिवानारे ॥ आत्मातूं अविनाशहोउनी मानिसिजन्मा मरणारे ॥ जिन्ने तु० ॥ ३ ॥ तनकीयेमे एकजनार्दन, लाख खडावे पर्वारे ॥ ऽयंबक पणहें त्यालाअर्पुनि, भोगिसुखाचा ठेवारे ॥ जिन्ने०॥ ४॥

पद ७४ वें

आज लहुं निरवान ॥ गुरुजी० ॥ ध्रु०॥तुमारे चरनपर हुरखराखूं ॥ सीसकरूंकुरबान ॥ गुरुजी०॥१॥ पांच पचीस हत्तीसवारूं ॥ उपरलालनिशान ॥ गुरुजी० ॥ २ ॥ एकबीस हजारसब घोडे ॥ हाथ-

लिये नवबान ॥ गुरुजी० ॥ ३ ॥ च्यारो महाल-में धूममचाई॥किया मुलुख मैदान॥गुरुजी० ॥४॥ दास तुका कहे सल्लाहमारा ॥ लगाउन्मनीध्यान ॥ गु० ॥ ५ ॥

पद ७५ वें.

बंदे क्यौंभूला क्यौं भूला ॥ आखर खावेगा झोला ॥ बंदे० ॥ ध्रु० ॥ कवडी कवडी माया जोडी ॥ आखर जावेगा खुला ॥ बंदे० ॥ १ ॥ भाई बहीन जोरु लरके कोनकिसी कासाला ॥ बंदे० ॥२॥ शिवराम कहे समालबंदे ॥ करसाहेबकोंसल्ला ॥ बंदा-क्यौं भूला० ॥ ३ ॥

पद ७६ वें.

है कोय ऐसा मुर्शदमौला ॥ घरमें खुदाबतावेगा ॥ है० ॥ ध्रु० ॥ पंचतनके दर्गाभीतर ॥ दीलतक्या बिछावेगा ॥ मनमुकामें मुजे बिठाकर ॥ बिस्मिल्ला कलमा पडावेगा ॥ हैकोय० ॥ १ ॥ अरष कुरष दीधारजो राम ॥ हरममेरा दिखावेगा ॥ चवदा तबकके अंदर सुलाके, मेरेतैंय झुल झुलावेगा ॥ है-

को० ॥ २ ॥ बावन हरफके मायने बताकर, भेद भरमकु मिटावेगा ॥ उसके अंदर मुजले जाके, किताबके बयान शिकावेगा ॥ है कोय० ॥ ३ ॥ कहे कमाल कबीरका बालक, मन किताब सुनावेगा ॥ मेरा चेरा मुजे बताके नरनाबि मिलावेगा ॥ है कोय० ॥ ४ ॥

पद ७७ वें.

भजोरे भया रामगोविंदहरी ॥ भजो० ॥ ध्रु० ॥ जपतप साधन कछुनहिंलागत ॥ खरचतनाहिं गठरी ॥ भ० ॥ १ ॥ संतत संपत सुखके कारन ॥ जासे भूल परी ॥ भ० ॥ २ ॥ कहत कबीरा जाके राम मुखनहीं ॥ ओमुख धूलपरी ॥ भ० ॥ ३ ॥

पद ७८ वें.

नजर न आवे आतमजोती ॥ ध्रु० ॥ तेलनबत्तीबुजनहिंजाती ॥ नाहिंजागत नाहिं सोती ॥ नजरन० ॥ १ ॥ झिलमिल झिलमिलनिसिदिनिझमके ॥ जैसानिर्मलमोतीं ॥ न० ॥ २ ॥ कहत कबीरा सुनभयसाधू । घर घर बांचत पोथी ॥ न० ॥ ३ ॥

## पद ७९ वें.

मनरे आगम तीरथकूं चलना ॥ ध्रु०॥गाजनवीज-पवनना ॥ पाणी बिन वादलका झरना ॥ म० ॥ ॥ १ ॥ जाहां नाहीं ताल अखंडहीधार ॥ उससरो-वरना झुलना ॥ म० ॥ २ ॥ कहत कबीरा सुनभय-साधू ॥ काहेकूं भ्रमभटकेमरना ॥ ३ ॥

## पद ८० वें.

वाहवा साहेबजी ॥ खुबख्याल तुमाराजी॥ध्रु० ॥ गगनलेकर बाजउडावे कबातीर चलावे ॥ जद बकरीने वाघको पकडा ॥ उस्कूं कोन छुडावे॥ वाह-वा० ॥१ ॥ जद चुवेने बिल्ली पकडी ॥ मुरगी घर घर रोवे ॥ बंदरकेधर धुंम मचीहै ॥ उठाबिसनीपद गावे ॥ वाहवा० ॥ २ ॥ मुंगा भैरा बात चलावे ॥ अंधा कुरान बांचे ॥ जब थोटेने मृदंग बजाया ॥ लंगडा क्या खुबनाचे ॥ वहवा० ॥ ३ ॥ कहत क-बीरा उलटी बानी ॥ बिरलाकोयकजाने ॥ सोही गुरूका पुरा होयगा ओहीबात पछाने॥ वाहवा ०४

प्रकरण ३ रें.

# भजनी गारुड भारुड संग्रह.

## भजन

रघुपति राघव राजाराम ॥ पतीत पावन सीता राम॥

### १ अर्जदास्त.

अर्जदास्त ॥ अर्जदार ॥ बंदगी बंदेनवाज ॥ अलेकंसलाम ॥ साहेबाचे शेवेशीं॥ बंदेशरीराकार॥ जिवाजी शेखदार ॥ बुधाजी कारकून ॥ प्रगणे शरीराबाद ॥ किल्ले कायापुरी ॥ सरकार साहेबांची आज्ञा घेऊन स्वारझालोंतो ॥ प्रगणे मजकुरी येऊन सरकार काम सुरू करावयास लागलोंतों प्रगणे मजकुरचे जमेदार ॥ दंभाजीशेट व कामाजी महाजन व मनीराम देशमुख व ममताई देशपांडी व क्रोधाजी नाईकवाडी ॥ ऐसे हरामजादे फार आहेत ॥ सरकार कामाचा कयासा चालुदेत नाहींत ॥ दंभाजीशेट्या कचेरीस येऊन जोम धरून बसतो ॥ मनीराम देशमुख आपलें परभारें काम

करून घेतो ममताई देशपांडीण इणें तमाम परग णा जरदस्त केला क्रोधाजी नाईकवाडी याणें तमामतफरकाकेला तो साहेबा पासून जरासंध चोपदार आला त्यानें खबरकेली कीं, मागून यमा जीपंताची तलब होणार त्यासत्याधास्तीनें तमाम परगणा वोस झाला ॥ वितपशील ॥ कमल ॥ डो- ळसवाडीसमात्र कांहीं रुईझुई वस्ती राहिली का नगांवतो बंद झाले दोन्हीं वेशीचीं कवाडें लागलीं नाकापुरास वाहाव सुटले तोंडापूरतो तफरका झा- लें दंताळवाडी वोस पडली दिवेलागणी देखील रा- हिली नाहीं. केंसगांवचीं पांढर झाली. शिरापुरचे लोक दरोबस्तथरांथरां कांपतात हातगांव कसल्यानें जर्जर झाले त्यांच्यानें आतां कांहीं लावणी होत नाहीं. पायगांवचीं मेटें बसलीं. ढोंपरीपूरीचीं राहि- लीं ॥ चरणगांव चाली सरली. गांडापूर वाहूं लाग- ले. लिंगस्थान भ्रष्ट झालें. उठूं पळूं लागलें धीर- धरवेना ऐसी परगण्यांत कीर्ति बुडाली. यावर स- रकार काम सुरू करीत होतों. तों यमाजिपंताची

को० ॥ २ ॥ बावन हरफके मायने बताकर, भेद भरमकु मिटावेगा ॥ उसके अंदर मुजले जाके, किताबके बयान शिकावेगा ॥ है कोय० ॥ ३ ॥ कहे कमाल कबीरका बालक, मन किताब सुनावेगा ॥ मेरा चेरा मुजे बताके नरनाबि मिलावेगा ॥ है कोय० ॥ ४ ॥

पद ७७ वें.

भजोरे भया रामगोविंदहरी ॥ भजो० ॥ ध्रु० ॥ जपतप साधन कछुनहिंलागत ॥ खरचतनाहिं गठरी ॥ भ० ॥ १ ॥ संतत संपत सुखके कारन ॥ जासे भूल परी ॥ भ० ॥ २ ॥ कहत कबीरा जाके राम मुखनहीं ॥ ओमुखधूलपरी ॥ भ० ॥ ३ ॥

पद ७८ वें.

नजर न आवे आतमजोती ॥ ध्रु० ॥ तेलनबत्तीबुजनहिंजाती ॥ नहिंजागत नाहिं सोती ॥ नजरन० ॥ १ ॥ झिलमिल झिलमिलनिसिदिनिझमके ॥ जैसानिर्मलमोतीं ॥ न० ॥ २ ॥ कहत कबीरा सुनभयसाधू । घर घर बांचत पोथी ॥ न० ॥ ३ ॥

पद ७९ वें.

मनरे आगम तीरथकूं चलना ॥ ध्रु०॥गाजनवीज-
पवनना ॥ पाणी बिन वादलका झरना ॥ म० ॥
॥ १ ॥ जाहां नाहीं ताल अखंडहीधार ॥ उससरो-
वरना झुलना ॥ म० ॥ २ ॥ कहत कबीरा सुनभय-
साधू ॥ काहेकूं भ्रमभटकेमरना ॥ ३ ॥

पद ८० वें.

वाहवा साहेबजी ॥ खुबख्याल तुमाराजी॥ध्रु०
॥ गगनलेकर बाजउडावे कबातीर चलावे ॥ जद
बकरीने वाघको पकडा ॥ उस्कूं कोन छुडावे॥ वाह-
वा० ॥१ ॥ जद चुवेने बिल्ली पकडी ॥ मुरगी घर
घर रोवे ॥ बंदरकेधर धुंम मचीहै ॥ उठाबिसनीपद
गावे ॥ वाहवा० ॥ २ ॥ मुंगा भैरा बात चलावे ॥
अंधा कुरान बांचे ॥ जब थोटेने मृदंग बजाया ॥
लंगडा क्या खुबनाचे ॥ वहवा० ॥ ३ ॥ कहत क-
बीरा उलटी बानी ॥ बिरलाकोयकजाने ॥ सोही
गुरूका पुरा होयगा ओहीबात पछाने॥ वाहवा ०४

परवानगी आली कीं, हुजूरयेणें. आपणास साहेबाचा आश्रय आहे. एकाजनार्दनकाबंदा. बंदगी रोशन होय. हे अर्जदास्त ॥ १ ॥

तारकीदपत्र २

ताकीद पत्र समस्त राजकार्य धुरंधर प्रगणें शरीराबाद. सुंमातैन लोली प्रवाहे. ताकीदपत्र दिलेंकीं, कायापुरास जीवाजीनामें गृहस्थ कऊल देऊन देह गांवची वस्ती रक्षावयानिमित्त पाठविले आहेत. हर एक विशीं साहित्य करावें. मनाजीरावसुभेदार, बुधाजीपंत फडणीस, व चित्ताजीपंत चिटणीस, हे पदरीं थोरमनुष्य असतां, अहंकारपंत सबनीस याचे हवालीं सर्व देहगांवचा कारभार केला. त्याचे धन्याचे घरचे मुत्सदी वरीं बसून नवीन मुत्सद्दी व कामगार उभे केले, तेहे चांगले नव्हेत ॥ विकल्पाजी महाजन व मोहाजी शेटे व कामाजी कोतवाल क्रोधाजी नायक वाडी. द्वेषाजी जमेदार. अधिकारजासूद लोभाजी पोतनीस. विकारपंत जकातदार मत्सरजी मेहेतऱ्या. कुतर्काजी गस्तवान. उन्मत्तजी

पाटील. कुबुद्धिपंत कुळकर्णी, भ्रमाजी शिपाई. मदाची देशपांड्या. दंभाजी देशमूख. प्रपंचपंत मुजूमदार. मूर्खाजी हुजरे. स्वार्थाजी खिजमतगार. अविवेक पुराणीक. अज्ञान मशालजी: हे नवीन कामगार उभे केले. व घरांतील पहिल्या दासी उभ्या केल्या त्या, आशा, मनशा, तृष्णा, कल्पना, ममता, काया, प्रीति, भुली, भ्रांती, इच्छा, वासना, भ्रमणा, कुबुद्धी, निंदा, अहंता, चिंता, निद्रा, मोहनी, ह्या कर्मकर्त्या वादी अहंकारपंत सबनीस यानें उभ्याकेल्या ॥त्यानें दरोबस्त प्रगणा बुडविला. आणि यमाजीपंत कमाविसदार यांचे घरीं एकांत स्थळ स्थापन केलें त्यावरून हें ताकीदपत्र सादर केलें तें मुत्सदी व कामगार त्यागावे आणि सरकार हुजूरचे मुत्सदी कामगार आहेत तर त्यांचे हातें काम घ्यावे. मुत्सदी तपशील. शुद्ध सत्वभाव, वैराग्य, विवेक, बोध, परमार्थ, आनंद, समाधान, निर्वैर, स्वानुभव, धैर्य, सत्य, भजन, पूजन हे कारभारी ॥ आणि कार्यकर्त्या सुशीला,

सुबुद्धी, उन्मनी, प्रतिष्ठा, नवविधा, मर्यादा, शांति, क्षमा, दया, नम्रता, समाधी, ह्या कार्यकर्त्या. हे मुत्सद्दी यांचे हातीं काम घ्यावें याजविषयीं सरकारांतून ताकीद झाली आहे. तर लिहिल्याप्रमाणें वहिवाट करावी. सबनीस मजकूर ॥ यांचे कामगार मुत्सद्दी ॥ दरम्यान या कामांत आल्यास पारिपत्य केलें जाईल. हें स्पष्ट समजावें. सरकार कामगार उभे करावे. या प्रमाणें वहिवाट करावी- एकाजनार्दनीं शरण हे आशिर्वाद. हें ताकीदपत्र

गारूडी २

आदिपुरुष निर्गुणनिराकारकी यादकर ॥ मेरे गुरु परवर दिगारकीयादकर ॥ जिन्नेमाया अजब्ब नाई उसवस्तादकी याद कर ॥ गैबीखजीना हमणा दिया उस साहेबकी यादकर ॥ संतमहंतकी यादकर ॥ गुणीगुणवंतकी यादकर ॥ श्रीभगवंतकी यादकर ॥ जोगजूगनका बांधा तोडा शमदमका सिरपरसंब लाछोडा ॥ समतासोही सुहावेतुरागुरुगारुडीबीर पुरा ॥ नैवंचीरकी पैह्रीमुद्रा ॥ कानफाडकेखाये

निद्रा ॥ अनुहातधुनुकुमुरव बजावे ॥ नागसूर धनु गर्जेंचलचलनिचलरंजनजलजंगलकी जिवडे ॥खेल नाहोंयसो उलटदृष्टी सोखेल ॥ आबीकरूंगाफैल तेरी मुंढी काटूंगा ॥ साफसेभूले बिछूकिडे प्रपंच कोटिपरमो आनकरपडे ॥ बडेबडे जनावर पालेहा रे ॥ लाले, जरदे, उजले, काले, पीले भलाबेभला ॥ अभिमानजी बडे झूटमूट विणचूलटे नहीं ॥ कूहूतोब्रह्मांडकाटने दोर ॥ देखो मियांहायहाय ॥ डंखडंखवेडंखमारा॥सो बडेबडे सो नहीं उतारा॥ जदगुरु ग्यानका लगाया मोहोरा ॥ जहर उतारा मीयाबाजेगारी विद्याखेले॥ हंडीबाग बडा अलबे-ला ॥ हात हलावे पाय हलावे ॥ भाले भोले लोक भुलावे ॥ आबे हंडबाग बापबडाक्या बेटा बडा॥ बेटे आगेबापखडा ॥ गुरुबडाक्या चेलाबडा ॥ चे-ले आगे गुरुखडा ॥ चेला तो प्रेममहेलपरचढा ॥ धनी बडा क्या चाकरबडा ॥ चाकर आगे धनी खडा॥सास बडी क्या वहु बडीबहु आगे सासखडी ॥ बीबी बडी क्या बांदी बडी ॥ बांदी आगे बिबी

खडी ॥ निरधारकीलेके छडी ॥ बिबीखसमके छाती-
पर चढी ॥ तै बडा क्या में बडा ॥ मेरे आगे तै ख-
डा ॥ तै नहीं अलम छायही ॥ ग्यानीकूग्यानल-
गाउ॥ लोभेकुं अंधेकुं उडावूं ॥ फूक मारूं तो जा-
जाजा ॥ बोधके पहाडपर जावेजा ॥ हां आनानहीं
जानानहीं ताहांजा ॥ मेरे सद्गुरुदाताकी इत्तीसीलक
री॥मूलमंतर हातमोपकर ॥ जिदरदवरा उदरदवरी
फेरदेखि तो मेरो मेरे सात॥अबी करूंगा खबुतरका
तमासा ॥ बिन पर उडताहै खासा ॥ देखे तो अ-
बिद्येके खलीतेमें घुसा तो बाहेर कैसा आवेगा ॥
आवबे आवबाहेर आव ॥ जिसे नहीं हात न पाव
॥ जिसे नवहि गावना ठाव ॥ जिसे नहीं रूप रे-
खाना भाव ॥ नाकछुनहीं ॥ धींरिधींरितरीबी मंतर
खोल ॥ लिंगदेहकीगांठखोलएकबार ऐसा खेल
खेलूं॥ सोमे बडे बडखेलेथे ॥ हातो येक. एकके दो
न, दोके तीन, तीनके चार, चारके पांच, पांचे
पचीस पचीसकेछत्तीस,छत्तीसका येक येक बीनहो
हां एकाजनार्दनदेख ॥ १ ॥

## ४ दिवटा.

जागे जागे या वाडिया मध्यें जागे ॥ या बाडिया बाहेर जागे ॥ किती एक तळमळकरीत गेले ॥ हें-चि रिंवडाराचें रिंवडार ॥ कोण्या गृहस्थाच्या पोटा॥ कोणास दैवांच्या वांडा ॥ लौकरिकाढा बैसावयास घोडा ॥ करीयाशब्दाचा आडामोडा ॥ तरीच लें-कुराचा खेळकीं राया ॥ १ ॥ पैललंकेचा चोहटा ॥ मींवाईक बोलिलों दिवटा॥तो रांडेचा रावण मेला॥ ह्मणे हा दिवटा खोटा॥राक्षसावानीच बोले तेंव्हां॥ राम अवतरला येकचि खांडें ॥ दहा शिरांचीं मुंडें ॥ विसांभुजांचीं खांडें ॥ त्या लंके पुढें घोष माडिले ॥ है लगे गांढ्याळीचे द्वारीं ॥ दांत इचकु-नशानें कुथाईली ॥ २ ॥ आनखीन त्या बायकोन-च्याछंदें ॥ त्या हिरण्यकशिपाला फुटला फांटा ॥ तो ह्मणे हा दिवटा खोटा ॥ इतक्यामध्यें नरसोबा ह्मनअवतरला ॥ डोळेफिरवी गरगरां दांत खाय करकरां कोंभाचीकचकावला॥रौसाचकचकावला हा लगे गांढ्याळीचे द्वारीं ॥ दे दानमज दिवट्याला ॥

नाहीं तरी नागवसी या बोलाला ॥ आनखीन दान दे गांविच्या जोशाला ॥ ३ ॥ तेणें विघ्न टळेल मन पाचक नकीचा दिवा मध्यमन पाक घृतसोळा हात पाटावाचा पासोडा ॥ दीडतोळा सोन्याचा माकोडा ॥ ऐसें द्यावया दान एक दाता जनार्दन ॥ इतर लंडी काय देउं जाणे ॥ ज्याला आळु कृपण विषयाचे ॥ एकाजनार्दनाचा दिवटा ॥ भक्तीच्यावसविल्या पेटा ॥ सायुज्यताची नरदेहीं ॥

## ५ जोहार.

आजिमायबाप करितों मीं जोहार ॥ आलों एसकर सांगावया ॥ १ ॥ आजी मायबाप तुह्मीं बाकी झाडानाहीं तरी खोडा वालूं ह्मणती ॥ २ ॥ फांकूं नका कोणी रुजू झालि थावांचुनीं ॥ सांगाकीं जी चला घरधन्या ॥ ३ ॥ तुका ह्मणे तुह्मीं करूं नका बोली ॥ आखेरचे सालीं झाडा घेती ॥ ४ ॥

## ६ जोहार.

जोहार पाटीलबाजी ॥ चावडी चलानाका जी ॥ ऐसें सांगत आलों आजी ॥ बाकीनकाथकवूंकीं जी

॥ मायबाप ॥ १ ॥ कोपटामाजी तळपतीगाय ॥ हाडाची बेडी पडेल पाय ॥ तोंड चुकवीत जाय ॥ मगवांचुनी काय कीजे मायबाप ॥ काढितां गांवचींगुरें॥ कांबुजवितां गांवचीं द्वारें॥गस्त पाठवावी सत्वरें ॥ कांहीं उणें पुरें करूं नका की॥जी मायबाप ॥ ३ ॥ अंवदां आली देवाची पाळी ॥ तेव्हां तोंडच करतां काळीं ॥ चावडी चला हेच वेळीं ॥ शिव्यागाळी कांहीं घेऊं नकाजी॥मायबाप ॥ ४ ॥ कुळकर्णी आपुले स्वाधीन करा ॥ आडखर्चाचा ताळा धरा ॥ चित्त हरिनामींधरा॥येईल मजुरा आसत्वकी॥जी मायबाप ॥५॥ विठूपाटलाचा महार ॥ चोखामेळियाचाजोहार ॥ सकळ संतांचा कारभार ॥ मज नफराचे शिरीकीं ॥ जी मायबाप ॥ ६ ॥

### ७ जोहार

जोहारमायबाप जोहार ॥ तूं कोणगांवींचामहार ॥ पुसाल जरी साचार॥तरी सादर परिसाकीजी॥मायबाप ॥ १ ॥ माझा निराकार मुळींचा ठिकाणा ॥ भक्तांसाठीं सोडिला जाणा ॥ वस्ती करूंकायापुरीं-

च्याखुणा ॥ सांगेनकीं जी ॥ मायबाप ॥२॥ आणि जोहारजी मायबाप जोहार ॥ मी पार्वतीचे गळ्यांतीलहार ॥ ईश्वराचापूर्णभार ॥ त्याचाकरितों कारभार ॥ मज नफराचे शिरींकीजी ॥ मायबाप ॥३॥ अखंड द्वारीं पडिला असतों ॥ प्रेमाचा तुकडा मागुन खातों ॥ धन्याला दुवा देतों कींजी॥मायबाप॥ ॥ ४ ॥ तुह्मीं मुळींचा ठाव सोडूं नका ॥ विसरल्यास पावालधक्का ॥ अंतकाळींकींजी॥ मायबाप ॥५॥ वस्तीभरूं आह्मींसाचे ॥ समस्त कुळवाडी नगरींचें ॥ पैसे टाका धन्याचे॥बाकी थकवूंनका कींजी॥मायबाप॥६॥असामीवारादिधली ॥शेवटीं द्वाईविझाली ॥ ज्ञानदेवीं आज्ञा केली कींजी ॥मायबाप॥७॥

## ८ जोहार

जोहार मायबाप जोहार ॥ तुमच्या महाराचा मी महार ॥ भूक भकेलों हार मी धालों ॥ तुमच्या उष्टयासाठीं मी आलों ॥ तुमच्या उष्ट्याची मज आस ॥ तुमच्या दासाचा मी दास ॥ चोखा ह्मणे आणिली मी पांटी ॥ देवा तुझ्या उष्ट्यासाठीं ॥१॥

## ९ जोहार

जोहार मायबाप जोहार॥ मी अविद्यानगरींचा महार ॥ साचार माझें नोहें नगर ॥ आकारास आलें कीजी ॥ मायबाप ॥१॥ म्यां सहा चाकरु ठेविले ॥ ते माझे बळें वर्तती वहिले ॥ मला गांजिती बळें ॥ अन्याय नसतां कीजी ॥ मायबाप ॥२॥ तुह्मीं अवघे एकत्र झालां ॥ माझें घर मोडावयाचा मनसुबा केला ॥ जरी माझें अगत्य असेल धन्याला॥तरीच मजला ठेवील कीजी॥मायबाप॥३॥तुह्मीं अवघे संतसज्जन ॥ रूपींमिळालापरिपूर्ण ॥ ह्मणून माझें हेळण करितां कीजी ॥मायबाप ॥४॥ एका जनार्दनी ह्मणे देवा॥अविद्येचा संग मज नसावा ॥ जन्ममरणाचा ठेवा ॥ चुकवा कींजी॥मायबाप ॥ ५ ॥

### भजन.

येगेमाय विठाई ॥ तुजविणनगमे करुं मी कायी ॥

## १० जमाखर्च

ऐका जमाखर्जाची खंडणी ॥ नरदेह जमेसीं धरूनीं ॥ बाकी साल हल्लीं उगवणी ॥ शून्यधारी सं-

सारा ॥१॥ संसारलक्ष चौऱ्यासी योनी ॥ बाकी व-
व्याज तेरीज मिळूनी ॥ सावधान गुरुचरणीं ॥ व-
सूल केला नरदेह ॥ २ ॥ नरदेह सालमजकुर ॥ रु-
जूसाल गुदस्त पूर्वसंसार ॥ सदरगुरु कृपानिर्विकार ॥
सालें भरलीं उगवलाजी ॥ ३ ॥ संचित क्रियमाण
विचार ॥ पुण्यपाप स्वर्ग नरकद्वार ॥ वेद शास्त्र पु-
राण निर्धार ॥ स्वहित सारदेखिलेंची ॥ ४ ॥ अहं-
भाव बाकी ठेविली ॥ तीसद्बुद्धीनें नाहिंशी केली ॥
विवेक विचारानें पाहिली ॥ वसूल केला नरदेह ॥ ५ ॥
मुख मुफश्री व्यवहार ॥ हातवस्वस्तीचा शृंगार ॥
प्रेम हुजुरसुंदराक्षर ॥ सरस्वतीवर जालाकींजी ॥ ६ ॥
चातक जन्ममूर्ख ते केले ॥ सुख दुःख इच्छा एक-
लेने नेले ॥ तें गुह्यमुखीं मुश्रिफी आले ॥ शिलक
सुटली ब्रह्मादिकांची ॥ ७ ॥ स्वधर्म खर्च केला ॥
तो फळ रुजू पाहिला ॥ ब्रह्मार्पण मुजरा केला ॥
फांटा ओढिला शून्याचा ॥ ८ ॥ विचारसुरानित्यने-
माचें ॥ सावधान एकचित्ताचें ॥ वर्म मुखें केलें
सद्गुरूचें ॥ नांव अविद्येचें त्यजिलेंजी ॥ ९ ॥ विवेक

आप्तवर्ग स्वामीचा ॥ वडीलबंधू सत्वजीचा ॥ झाडा पाहिला प्रवृत्तीचा ॥ अंतर्यामीं हरी हरी ॥ १० ॥ ज्ञानचक्षुनें अति सुरेख ॥ नित्यस्वरूप पाहिलें आलेख ॥ देखोनि नरदेह देखणा झाला ॥ नरदेह जन्मासि आला ॥११॥ अज्ञान बाकी झाडा झाला ॥ पुढें शिलकेसीं चुकविला ॥ जमाखर्च स्वानंदाचा झाला ॥ जमाखर्च संसार वाहो ॥ १२ ॥ नाहीं बंधन मोक्षसंदेहो ॥ गुरुकृपास्वानुभवों ॥ देखोनि नरदेहीं संदेहो ॥ अनुभव जमाखर्च जनार्दनी ॥ १३ ॥

## ११ पत्र.

माझें पत्र धन्याला ॥ वैकुंठवासीं नांदतो त्याला ॥ असा धनी माझा भला ॥ माझ्या पूर्वजांचा उद्धार केला ॥ १ ॥ भक्त संकटीं रक्षिला ॥ मजवर फार उपकार केला ॥ तडी तांतडी धांऊन आला ॥ पत्राचा मजकूर त्यानें पाहिला ॥ २ ॥ संकट पाहुनी भला बोध केला ॥ चार खाणी नऊ दरवाजे त्याला ॥ दश इंद्रियें हाच बोध केला ॥ ३ ॥ भक्ति मुक्ती

सारा ॥१॥ संसारलक्ष चौऱ्यासी योनी ॥ बाकी व-
व्याज तेरीज मिळूनी ॥ सावधान गुरुचरणीं ॥ व-
सूल केला नरदेह ॥ २ ॥ नरदेह सालमजकुर ॥ रु-
जूसाल गुदस्त पूर्वसंसार ॥ सदरगुरु कृपानिर्विकार॥
सालें भरलीं उगवलाजी ॥ ३ ॥ संचित क्रियमाण
विचार ॥ पुण्यपाप स्वर्ग नरकद्वार ॥ वेद शास्त्र पु-
राण निर्धार ॥ स्वहित सारदेखिलेंची ॥ ४॥ अहं-
भाव बाकी ठेविली ॥ तीसद्बुद्धीनें नाहिंशी केली॥
विवेक विचारानें पाहिली ॥ वसूल केला नरदेह॥५॥
मुख मुफश्री व्यवहार ॥ हातवस्वस्तीचा शृंगार ॥
प्रेम हुजुरसुंदराक्षर ॥ सरस्वतीवर जालाकींजी ॥६॥
चातक जन्ममूर्ख ते केले ॥ सुख दुःख इच्छा एक-
लेने नेले ॥ तें गुह्यमुखीं मुश्रिफी आले ॥ शिलक
सुटली ब्रह्मादिकांची ॥ ७ ॥ स्वधर्म खर्च केला ॥
तो फळ रुजू पाहिला ॥ ब्रह्मार्पण मुजरा केला ॥
फांटा ओढिला शून्याचा ॥८॥ विचारसुरानित्यने-
माचें ॥ सावधान एकचित्ताचें ॥ वर्म मुखें केलें
सद्गुरूचें ॥ नांव अविद्येचें त्यजिलेंजी ॥ ९ ॥ विवेक

आप्तवर्ग स्वामीचा ॥ वडीलबंधू सत्वजीचा ॥ झाडा पाहिला प्रवृत्तीचा ॥ अंतर्यामीं हरी हरी ॥ १० ॥ ज्ञानचक्षुनें अति सुरेख ॥ नित्यस्वरूप पाहिलें आलेख ॥ देखोनि नरदेह देखणा झाला ॥ नरदेह जन्मासि आला ॥ ११ ॥ अज्ञान बाकी झाडा झाला ॥ पुढें शिलकेसीं चुकविला ॥ जमाखर्च स्वानंदाचा झाला ॥ जमाखर्च संसार वाहो ॥ १२ ॥ नाहीं बंधन मोक्षसंदेहो ॥ गुरुकृपास्वानुभवों ॥ देखोनि नरदेहीं संदेहो ॥ अनुभव जमाखर्च जनार्दनीं ॥ १३ ॥

## ११ पत्र.

माझें पत्र धन्याला ॥ वैकुंठवासीं नांदतो त्याला ॥ असा धनी माझा भला ॥ माझ्या पूर्वजांचा उद्धार केला ॥ १ ॥ भक्त संकटीं रक्षिला ॥ मजवर फार उपकार केला ॥ तडी तांतडी धांऊन आला ॥ पत्राचा मजकूर त्यानें पाहिला ॥ २ ॥ संकट पाहुनी भला बोध केला ॥ चार खाणी नऊ दरवाजे त्याला ॥ दश इंद्रियें हाच बोध केला ॥ ३ ॥ भक्ति भुक्ती

शक्ती मजपाशीं ठेविल्या ॥ ऐसे चारी वेदवाणी ॥ तुकागर्जतो पुराणीं ॥ ४ ॥

## १२ हुषारी.

हुषियार बंदे हुषियार ॥ तेरा तन खबरदार ॥ तुझे खिलावन एकनार ॥ बतां देवसतरावी धर पाइ है ॥ १ ॥ बडे बडे साधुसंत ॥ उनसें करले एकांत ॥ बता देव सिद्धांत ॥ आदि अंत उनोका ॥ २ ॥ बडी तो सबसी बडी ॥ जाडी तो धरतरीसें जाडी ॥ एकवीस खन्नकी माडी॥गगन बीचमें खडी हैं ॥३ दसवेंद्वारझुरोका ॥ देख ले दिदार उनोका ॥ नैन दीन लगावे ॥ ४ ॥ ब्रह्माविष्णुबडेदेव ॥ अजब गुरुग्यानी महादेव ॥ पाहिये उनोकि ठेव ॥ बैठके जग झुलाई है ॥ ५ ॥ अलख पुरुषको धुनी ॥ तुर्याचेत रही उन्मनी ॥ नहीं आदि अंत पुरानीं ॥ यन्नीं महाकल्याणरूपुहय ॥ ६ ॥ अहंनाद निःशब्दमों ॥ सोसलगायीयेचष्ममो ॥ चुनक है मसूरमों ॥ झक झक झकाकत है ॥ ७ ॥ लख लखाट हिरेकी खान ॥ चकचकाटकोटीभान ॥ निशिदिनि

करतना ध्यान ॥ ग्यान बहोत आयेगे ॥ ८ ॥ दिलरिझे तो करले धंदा ॥ भट गोपाल उनोका बंदा॥ चूपसोने सो बताई हय ॥ ९ ॥

१३ धाम धुम.

धाम धूम बार उडविला ॥ ऐसा कोण गलीम आला ॥ कायेतून किल्ला वेढिला ॥ काम क्रोध तो पालविला ॥ १ ॥ स्वकर्म राजा राज्य करी ॥ आवाज पडिला कानावरी ॥ द्वारपाळहोते द्वारीं ॥ काय गलबला आहे द्वारिंगा॥२॥ किल्ला वेढिला गलिमानें ॥ अवघी रयत गेलीपळून ॥ घाबरा राजा जाण ॥ अंतकालीं दिलें टाकुन ॥ बावा हे तुमचे कोणगा ॥ ३ ॥ प्रधान अवघी रयत मिळून ॥ सामिल वयऱ्यास अवघे जण ॥ राजापाहे विलोकुन॥ नाहीं रस्ता जावया पळूनगा ॥ ४ ॥ हातचें गेलें पदरचें गेलें ॥ आत्मराजाशीं संकट आलें ॥ काय निर्वाण कम ठेलें ॥ वैऱ्यानें बांधोन नेलेंगा ॥ ५ ॥ प्राणायाम पडल्यावरी ॥ नांसेल माझेंकाय उरीं ॥ नेहले यमानें बांधून ॥ हात बेड्या घालुनगा ॥ ६ ॥

तप्त भुईचालवुन ॥ सहस्र विंचू अंगा लाउन ॥ लोहांगेला तापवून ॥ माझ्या मुखीं टोंचतीगा ॥ ७ ॥ नरककुंडामाजी घालून ॥ मजला करविती ताडण ॥ आतां सरलें जन्ममरण ॥ एकाजनार्दनीं नाहीं स्वाधीनगा ॥ ८ ॥

## १४ मानभाव.

मानभाव बाई ॥ आह्मां भिक्षा वाढा कांहीं ॥धु०॥ काम आणि क्रोध आतां दंभूनियां पायीं ॥ लोभ आणि अहंकार आह्मीं अवरिला बाई ॥ १ ॥ आशा मनशा तृष्णा केली सर्व पाय मोडी ॥ कल्पना आणि भ्रांतीच्या पाईं घातलीसे बेडी ॥ २ ॥ महादेवाच्याखुणा आह्मीं सांगुनियां देऊं ॥ सोन्या रुप्याचे देव आह्मीं ठेंचुनियां खाऊं ॥ ३ ॥ भक्ति आणि भावार्थाचा गडबड गुंडा केला ॥ एकाजनार्दनीं बाई मानभावझाला ॥ ४ ॥

## १५ पांगुळ.

मृत्युलोकीं एकनगर ॥ त्याचें नांव पंढरपूर ॥ तेथिल मोकाशी तो हा विटेवर ॥ पुंडलीक भक्तराज

शोभे चंद्रभागेतीर ॥ बोलती साधुसंत ॥ जीवावाटे
दुर दूर ॥ तुह्मीं संतमायबाप येवढे उपकार करा ॥
न्या मज तेथवरी दाखवा ॥ दिनाचासोइरा ॥ १ ॥
मज नाहीं हातपाय ॥ डोळां पडली झांपड ॥ क-
र्ण बधिर झाले ॥वाचा बोले बोबड ॥ नाक मुख ग-
ळूं लागले ॥ लाळ आलि शेंबुड ॥ श्वानापरी गती
झाली ॥ अवघे करिती हड हड ॥ तुह्मीं संत०॥२॥
साधूसंत मायबाप॥ जे कां दयेचे सागर ॥ भावाचें
मुख्यस्थान ॥ भक्तीचें माहेर ॥ त्यानें मज दिलें कृ-
पादान ॥ मस्तकींठेविलाकर ॥ मायामोह निरसलीं
शुद्ध झालें कलेवर ॥ तुह्मींसंत० ॥ ३ ॥ भाव दिला
मजसंगें ॥ मार्ग दाविला नीट ॥ भ्रांति निरसली ॥
दिसूं लागली वाट ॥ नाचत प्रेमाछंदें॥चालूं लागलों
सपाट ॥ एकाजनार्दनीं पावलों पंढरी पेंठ ॥ तुह्मीं-
संत० ॥ ४ ॥

## १६ बाळसंतोष.

बाळसंतोष बाबा बाळसंतोष ॥ ध्रु० ॥ आह्मीं परा-
त्पर देशीं बाळसंतोष ॥ कोणी नोळखती ॥ अह्मां-

सीं॥बा० ॥ टाकुन आलों संतांपाशीं॥बा०॥१॥जी-
र्णस्वरूपाचा शेला ॥ बा० ॥ विषयभोगितां विटला
॥ बा० ॥ तो मज द्यावा दातें वहिला ॥ बा० ॥ २ ॥
ऐक्यत्वाचें बिरडें जोडी ॥ बा० ॥ त्रिगुणाची कस-
णी फेडी ॥ बा० ॥ जुनी कांचोळी रोकडी ॥ बा०॥
॥ ३ ॥ पूर्ण त्याची पुरणपोळी ॥ बा० ॥ स्नेहा व-
रील तेलवरी ॥ बा० ॥ प्रबोध लाडू तयावरी ॥बा०
॥ ४ ॥ एकाजनार्दनीं मागतां दान ॥ बा० ॥ जि-
ताचिजाणें जीवपण ॥ बा० ॥ शेखिदिलें शिवपण
॥ बा० ॥ ५ ॥

## १७ गारुडी.

संकासुरानें तप करुन ॥ केलें ब्रह्मयाचें आराधन ॥
तेथें वेद मूर्तिमंतजाण ॥ संकासुरास नव्हतें मरण॥
आकाशीं जळीं काष्ठीं जाण ॥ असा वर दिधला
होता महान परमेष्ठीनें ॥१॥अरेरे वेद नेलेचोरून ॥
संकासुराचा वध करून॥चारी वेद आला घेऊन॥
गर गर चक्राकार भवंडी ॥२॥अघोर दैत्य मातले
जाण॥धरा रसा तळास नेऊन ॥ कूर्म रूप घेतलें

विष्णूने।। मेरु मांदार टाकिले घुसळून।। वासुकीची बराडी करून।।चवदा रत्नें काढिली कोण कोण।। अ-ललल त्यांचीं नांवें भिन्न भिन्न ॥ ३ ॥ वराह रूप घेउनी हरी ॥ क्षिती घेतली दाढे वरी ॥ महाबला-ढ्य वराह हरी ॥ दैत्य दानवांचा संहार करी ॥४॥ गुरगुर धरा तारिली कीं यानें ॥ हिरण्यकश्यप मा-तले जाण ॥ देशबांधून त्रिविध तापानें ॥ त्यासि नाहीं जन्ममरण ॥ घरींदारीं मृत्युनाहीं ह्मणून ॥ जळीं काष्टीं पाषाणीं जाण ॥ प्रल्हाद पोटीं आला जाण ॥ भूभार हरावया ॥ स्तंभीं प्रकटला नाराय-ण ॥ अरे रे रे रे उदर टाकिलें चिरून ॥ ५ ॥ पांचवा अवतार जाण ब्रह्मचारी ॥ उभा राहिला बळिच्या द्वारीं ॥ दान मागे श्रीहरी ॥ बळी पाता-ळीं घातला द्वापारीं ॥ बाण मारून वामनेत्र छेदि-ला ॥ तर तर र र रा माझा गारुडी वीरपुरा ॥ ६ ॥ साहवा अवतार झाला परशुराम ॥ एक विसवेळा निक्षत्रि धराजाण ॥ केली माझ्या स्वामीनें ॥ शी-र मातेचें उडवून ॥ साच केलें पितृवचन ॥ काम

धेनूसीं आला घेऊन ॥ पहा पहा कीर्तिनें भरलें त्रिभुवन ॥ ७ ॥ सातवा अवतार अजनंद ॥ त्याचा पुत्र रघुपतीजाण ॥ केलें अहिल्येचें उद्धरण ॥ उदकावरी पाषाण तारून ॥ कुंभकर्ण इंद्रजितजाण ॥ अततततता घेतलाप्राण ॥ ८ ॥ आठवा वसुदेवाचानंदन ॥ त्याला कंसाचें बंधन ॥ सातगर्भ वधिले त्याणें ॥ मोह माया आठवी जाण ॥ यशोदेचे उदरीं घालून ॥ बंदीं उपजले आपणजाण ॥ द्वादश कळा छेदून ॥ केलें नंदाचें मोचन ॥ गोकुळीं घालवा नेऊन ॥ तेथील माया आगिली उचलून ॥ अष्टवर्षेंनिवांत जाण ॥ तुह्मीं आतां सुखी रहाणें ॥ कंस चाणूर मारीन ॥ शिशुपाळाचा घेईन प्राण ॥ मग ठेविन धनुष्यबाण ॥ देवकी तुझ्या गळ्याची आण ॥ आजपासून पांच वर्षानें ॥ एकदां भेटी देईल जाण ॥ तोंवरी स्थीर करामन ॥ आतां करतों तुमचें ध्यान ॥ ९ ॥ नववा उभा विटेवरी ॥ कायवर्णावी त्याची थोरी ॥ मौन रूप धरून हरी॥ दोन्ही करकटावरी ॥ दृष्टी नासाग्री ठेविली सारी ॥

भक्त जनास कृपाकरी ॥ १० ॥ दहावा कलंकी होणार ॥ अश्वगमन करील सार ॥ चंद्र सूर्य बुडेल आकार ॥ मग कैंचा चराचर ॥ जनार्दन ह्मणे कोण पहाणार ॥ ११ ॥

## १८ फकीर.

भला संतनको संग, खावे निज बोधन की भंग ॥ सदा नंदनमो दंग, ऐसे मलंग फकीर है ॥ १ ॥ लियो संतनकी दुमाला ॥ मेरा तूटे भव जंजाला ॥ कहे जनार्दन कंगाला ॥ फकीर हो रहै है ॥ २ ॥

## १९ मंगलफकीर.

संतनके संग ॥ खावे निजबोधनकी भंग ॥ सदाआनंदमोदंग ॥ ऐसी मंगल फकीर ॥ १ ॥ ग्यानके मैदान खडे ॥ समदमसे आनलढे ॥ वहोतांके तखत चढे ॥ ऐसा मंगल फकीर ॥ २ ॥ किया संतनका धुमाल ॥ तेरा पिताबहु जंजाल ॥ ऐसा एकनाथ कंगाल ॥ ऐसा मंगल फकीर ॥ ३ ॥

## २० महार.

कांरे महारा मदमस्ता ॥ कांहो ब्राह्मण बावा भल-

तेंच भलतेंच बोलता ॥ तुझे बापाचें भय काय ॥ मायबाप तुमचे आमचे एकचहै ॥ एक ऐसें बोलूं नको ॥ निर्गुणा पासून अवघे झालों ॥ निर्गुण तुला काय ठावें ॥ आत्मस्वरूपीं शोधून पहावें ॥ आत्मस्वरूप आह्मा कळेना ॥ नाहीं तरी संतासी शरण जाना ॥ संताशीं शरण गेल्यानें काय होतें ॥ चौऱ्याशींचा फेरा चुकतो ॥ हें ज्ञानतुला कोठ पासून प्राप्तझालें ॥ ज्ञान देव ह्मणें निवृत्ति प्रसादें कळूं आलें ॥

भजन.

नारायण विधि अत्री नाथ ॥ दत्तजनार्दन एकनाथ

२१ महारीण.

महारणीचे बोल ऐका ॥ पायांपडते महारीण आली ॥ गांव वसाड पाडूं नका ॥ इकनाइक बसेल धका ॥ इतुके तुह्मीं मनीं तरका ॥ १ ॥ पाया० ॥ ब्रह्माविष्णु दोन्ही बाळ ॥ महाकाळाचेही काळ ॥ मज देखतां गोपाळ ॥ ते मज महारणी पासोनी ॥ पाया० ॥ २ ॥ एका जनार्दना महारीण झालें ॥

सद्गुरूला शरण गेलें ॥ त्यानें आपुलें स्वहीत केलें ॥ जन्ममरण विसरलें ॥ ३ ॥ पाया० ॥

## २२ महारीण.

पायां पडते महारीण आली ॥ महारीण गेली वरघ्या आळीं ॥ महारणीनें दिली हारळी ॥ जवळ आली काळाची फेरी ॥ १ ॥ माझे महरणीचें ऐका ॥ जागे असा निजूंनका ॥ काळ करीतसे खेपागा ॥ २ ॥ एका जनार्दनीं महारीण ॥ करा चंद्रभागेस्नान ॥ घ्यावें पुंडलीक दर्शन ॥ पाहावे विठ्ठल चरणगा॥ पायांपडत्ये महारीण ॥ ॥ ३ ॥

## २३ भटीण.

मी भटीण आलें रे भटा ॥ नकोकरूं रिकाम्या चेष्टा ॥ काय बोललासी चावटा ॥ उगीच कां करितोसी थट्टा ॥ मी भटीण० ॥ ध्रु० ॥ म्या भटणीनें तुज पाळिलें ॥ पाळिल्याचे बरेच उपकार फेडिले ॥ गाझें मज आणून देतां त्यांत तुझें काय गेलें रे भटा ॥ १ मज पासूनि वेद किरे झाले ॥ ते म्यां तुझ्या हातीं दीधलें ॥ संकासुरानें चोरुन नेले

॥माझ्या भयाने ते परत आणिले रे भटा॥मीभ०॥२
त्याच्याच आधाराने मी बोलत आहें ॥ बहुमस्ती
आली तुला मला ठाऊक आहे ॥ आपलें अंतर
शोधून पाहें रे भटा ॥ मी भटीण ०॥ ३ ॥ लहाना
चा थोर तुला म्यांचरे केला ॥ नवअवताराच्या हा-
तीं भला ॥ दहावा कलंकी राहिला ॥ तोही जाईल
विलयालारे भटा ॥ मी भटीण० ॥ ४ ॥ एका ज-
नार्दनी मी शरण ॥ भटाचें हरपलें मीपण ॥ उगा-
च गेला मौन धरून ॥ चैतन्य रूप पाहिलें रे भटा
॥ मीभटीण० ॥५ ॥

२४ कंजारीण.

हो होरी होहोरी हो ॥ लेवरे रसी ॥ हो होरी हो ॥
लेने वाला हैपर ॥ देणें वाला नहीं ॥हो० ॥ देणें
वालाहै पर ॥ लेणेंवालानहीं ॥ हो० ॥ ध्रु० ॥ नी
संग आडती ॥ केतन तोडा ॥ आपकारी पाडवा॥
आतां सान जोडा ॥ हो० ॥ १ ॥ तेलंगी वाडवा ॥
फुलना फुलवा ॥ साधन करवा ॥ मन आशा फे-
डवा ॥ हो० ॥२॥ फुलवान नवरा ॥ अडाी न तं-

गी ॥ नीतंग कोडता ॥ तंगीन अडी ॥ हो० ॥ ३ ॥ जनार्दन पडवा ॥ कंजारी लढवा ॥ कोकणी करवा ॥ दातारु बरवा ॥ हो० ॥ ४ ॥ ॥

## कांडण.

विवेक कांडणीं कांडित्यें साळी ॥ निजबोध स्मरणीं फिरतसे ॥ १ ॥ देह हें उखळ मन हें मूसळ ॥ कांडीले तांदूळ विवेकाचे ॥ २ ॥ एका जनार्दनीं कांडण कांडितां ॥ ब्रह्म सायोज्यता प्राप्तझाली ॥ ३

## २६ गौळणपंचरंगी.

आल्यापांचगौळणी-पांच रंगाचे शृंगार करूनी ॥ धृ० ॥ पहिली गौळण रंग सफेत ॥ जशी चंद्राची जोत ॥ गगनीं चांदणीं लखलखित ॥ ऐका तिची मात ॥ मंथन करीत होती दारांत ॥ धरुन कृष्णाचा हात ॥ ऐशा नटून आल्या पांच गौळणी ॥ ॥ १ ॥ दुसरी गौळण भाळी भोळी ॥ रंग हळदी हुन पींवळी ॥ पिंवळा पिंतांबर नेसुन आली ॥ अंगीं बुटेदार चोळी ॥ एक लहान तनू उमरकवळी ॥ जशी चफ्या कळी ॥ ऐशा आल्या पांच

॥माझ्या भयाने ते परत आणिले रे भटा॥मीभ०॥२ त्याच्याच आधाराने मी बोलत आहें ॥ बहुमस्ती आली तुला मला ठाऊक आहे ॥ आपलें अंतर शोधून पाहें रे भटा ॥ मी भटीण ०॥ ३ ॥ लहाना चा थोर तुला म्यांचरे केला ॥ नवअवताराच्या ह्या- तीं भला ॥ दहावा कलंकी राहिला ॥ तोही जाईल विलयालारे भटा ॥ मी भटीण० ॥ ४ ॥ एका ज- नार्दनी मी शरण ॥ भटाचें हरपलें मीपण ॥ उगा- च गेला मौन धरून ॥ चैतन्य रूप पाहिलें रे भटा ॥ मीभटीण० ॥५ ॥

## २४ कंजारीण.

हो होरी होहोरी हो ॥ लेवरे रसी ॥ हो होरी हो ॥ लेने वाला हैपर ॥ देणें वाला नहीं ॥हो० ॥ देणें वालाहै पर ॥ लेणेंवालानहीं ॥ हो० ॥ ध्रु० ॥ नी संग आडती ॥ केतन तोडा ॥ आपकारी पाडवा॥ आतां सान जोडा ॥ हो० ॥ १ ॥ तेलंगी वाडवा ॥ फुलना फुलवा ॥ साधन करवा ॥ मन आशा फे- डवा ॥ हो० ॥२॥ फुलवान नवरा ॥ अडगी न तं-

गी ॥ नीतंग कोडता ॥ तंगीन अडी ॥ हो० ॥ ३ ॥ जनार्दन पडवा ॥ कंजारी लढवा ॥ कोकणी करवा ॥ दातारु बरवा ॥ हो० ॥ ४ ॥ ॥

कांडण.

विवेक कांडणीं कांडित्यें साळी ॥ निजबोध स्मरणीं फिरतसे ॥ १ ॥ देह हें उखळ मन हें मूसळ ॥ कांडीले तांदूळ विवेकाचे ॥ २ ॥ एका जनार्दनीं कांडण कांडितां ॥ ब्रह्म सायोज्यता प्राप्तझाली ॥ ३

२६ गौळणपंचरंगी.

आल्यापांचगौळणी-पांच रंगाचे शृंगार करूनी ॥ ध्रु० ॥ पहिली गौळण रंग सफेत ॥ जशी चंद्राची जोत ॥ गगनीं चांदणीं लखलखित ॥ ऐका तिची मात ॥ मंथन करीत होती दारांत ॥ धरुन कृष्णाचा हात ॥ ऐशा नटून आल्या पांच गौळणी ॥ ॥ १ ॥ दुसरी गौळण भाळी भोळी ॥ रंग हळदी हुन पींवळी ॥ पिंवळा पिंतांबर नेसुन आली ॥ अंगीं बुटेदार चोळी ॥ एक लहान तनू उमरकवळी ॥ जशी चफ्या कळी ॥ ऐशा आल्या पांच

गौळणी ॥ २ ॥ तिसरी गौळण रंगकाळा ॥ नेसून-चंद्रकळा ॥ काळें काजळ लेउन डोळां ॥ रंग तिचा सांवळा ॥ काळी गरसोळी लेउन गळां ॥ आली राजस बाळा ॥ ऐशा आ० ॥ ३ ॥ चौथी गौळण रंगलाल॥लाल लाल ही लाल ॥ कपाळीं कुंकु चिरीं लाल ॥ भांगीं भरून गुलाल ॥ मुखीं विडा रंग लाल ॥ जसें डाळिंबीचें फूल ॥ ऐशा आ०॥ ४ ॥ पांचवी गौळण हिरवारंग ॥ अवघ्या झाल्या दंग ॥ हिरव्या कांकणाचा पहारंग ॥ आरशींत जडलेंभिं-ग ॥ फुगडी खेळती कृष्णा संग ॥ एकनाथ आ-भंग॥ऐशा आल्या त्या नटोनी ॥ आल्या पांचगौ-ळणी ॥ ५ ॥

२७ पंच भाषेची गौळण.

गौळणी ठकविल्या ॥ गौळणी ठकविल्या ॥ एक एक संगतीनें ॥ मराठी कानडिया ॥ एक मुसल्-मानी ॥ कोंकणी गुजरणीं ॥ अशापांचिजणी ॥ गौळणी ठकविल्या ॥ ध्रु० ॥ गौळणी सुंदरी ॥ गौ ळणी सु० ॥ गेल्या यमुनेतिरीं ॥ वस्त्रें फेडुनियां

॥स्नानकरिती नारी॥गोविंदानें वस्त्रें नेलीं ॥ कळंबा-
वरी ॥ स्नान करोनीया॥त्या आल्या बाहेरी ॥ गौ-
ळणी ठकविल्या ॥ गो० ॥१॥ लडोबा गोविंदा ॥
लडो० ॥ नीरबाणी आज ॥ आडच्याल्लोपडच्या-
ल्लो ॥ शीर फोड्यान फोडो ॥ मारी कन्हैया पानी
खेळ्यान खेळो ॥ गौ० ॥ २ ॥ देखरे कन्हैया ॥
दे० ॥ मैं इज्यत कीबडी ॥ कदम पकडुंगी ॥ मैं-
या कुटोजडी मेरी चुनरीदे, मेरीले दुल्लडी ॥ गोळ-
णीठ० ॥ ३ ॥ देवकी नंदना ॥दे० ॥तूं एकश्रीपती
॥ उघडी हिंवाची ॥ तुजविनवूंकिर्ती ॥ पायां पड
तें बा ॥ मीयेतें काकुलती ॥ माझी साडी दे ॥ घे
नाकाचें मोतीं ॥गौळणीठ० ॥ ४ ॥ पावगा दाता-
ला ॥ पावगा दाताला ॥ तूं नंदाचो झीलो ॥ माकां
फडकोदी ॥ मीं हिवान मेलों ॥ घे माझे कोयतो
॥ देवा पायां पडलों ॥ गौळण० ॥ ५ ॥ ज्यो रे
माधवजी ॥ ज्योरे० ॥ मे शरण थई ॥ तनका
काकैपी ॥ बाप दयाळ तूंही ॥ मारी साडी आपो॥
हातनो ले कंगणी ॥गौळणीठ० ६ ॥

इतुके ऐकुनी ॥ देव बोले हासुनी ॥ सूर्या दंडवत ॥ कराकर जोडुनी ॥ नामा विनवितो ॥ ह्मणे सारंग पाणी ॥ गौळ्या ऐकतूं ॥ धन्य तुझी करणी ॥ गौळणी ठकविल्या ० ॥ ७ ॥

## २८ सौरी.

सौरी झालें बाई आतां करुंगत काई, करूं गत काई ॥ ध्रु० ॥ अटवें परतें निटवें झालें दिवा मागें सारा ॥ हातापायां टिपरी लागे भुंगळ घेती वारा, भुंगळ घेती वारा ॥ १ ॥ भात्रार्थाचें झालें गेलें गेलें संतांपाशीं ॥ज्ञानडोर घेउन हातीं लिंग देह जोशी, लिंग देह जोशी ॥२॥ पांच गाथ तीन माचे त्यावर निजलें होतें ॥ त्यावर निजलें होतें ॥ फट फटीत उजडलें खाटलें पडले रितें॥ खाटलें पडलें रितें॥३॥ कर्म नेणों धर्म नेणो नेणो आह्मीं कांहीं ॥ नेणो आह्मीं कांहीं ॥ ज्ञानदेव ह्मणे आह्मा जाणें येणें नाहीं ॥ जाणें येणें नाहीं ॥ चाल माझ्या विठ्ठ आतां तुह्मीं आह्मीं भेटूं॥ तुह्मीं आह्मीं भेटूं ॥ ४ ॥

## २९ सौरी.

सहा दादुले केले परिम्यां ऐसा नाहीं देखिला दादूला ॥ काया वाचा रमलें त्यासीं ऐसा नाहीं देखिला दादूला॥सौरी झालें सखे बाई झालें त्याची नवरी ॥ ध्रु० ॥ १ ॥ नग्न होउनी भोगिला पुरुष म्यां ऐसा नाहीं देखिला दादूला ॥ देतो गोड गोड खाया परिम्यां ऐसा नाहीं देखिला दादूला ॥ सौरी झालें सौरी सखे बाई झालें त्याची नवरी ॥२॥ केला संसार गोड परिम्यां ऐसा नाहीं देखिला दादूला ॥ सौरी झालें सौरी सखे बाई झालें त्याची नवरी ॥ ३ ॥ ऐसी नवरी झालें परिम्यां ऐसा नाहीं देखिला दादूला ॥ एका जनार्दनी नमिलो पायीं ऐसा नाहीं देखिला दादूला ॥ सौरी झालें सौरी सखे बाई झालें त्याची नवरी ॥ ४ ॥

## ३० ठकडी.

शामसुंदर सांवळी ॥ उभी जणूं असे राउळीं ॥ ती आकाश ब्रह्मांड गिळी ॥ दादानों ठकडी बायको आली ॥ भल्याभल्याशीं ठकवुन गेली ॥

दादानोठ० ॥ ध्रु० ॥ चारी शून्याचे वरती ॥ ज्ञान दृष्टीनें न्याहाळिती ॥ चारी सूत्रें तिचें हातीं ॥दादा-नोठं० ॥ १ ॥ बायको नव्हे पुरुष नव्हे ॥ दावी नानारंग नटभाव ॥जैसी आकाशीं वीज बा लवे॥ दादानो० ॥ २ जेजे पाहूं गेले तिसीं ॥ तिनें झो-डपिलें तयासीं॥तुकाराम शरण तिशीं॥ दादा०॥३

भजन.

राधा रमणा सांवळिया ॥ चित्त चोरट्या गोंव-ळिया ॥

## ३१ टिटवी.

टिटवी यमाची तराळीन ॥ ध्रु० ॥ एका गांवावर नाहून ॥ एका नदींत विहिर पाहून ॥ तेथें टिटवी करी शयन ॥ दोन्ही पायांत खडा धरून गा ॥१॥ मरे चौगुल्याची सून ॥ पाटलाचे चौवेजण ॥ कुळकर्ण्याची लाडकी सून ॥ आतां गांवांत राहि-ले कोणगा ॥ २ ॥ देशमुख देशपांडे चौधरी ॥ त्याची गणना कोण करी ॥ शेलकी देशमुखाची पोरी ॥ आतां गांवांत नाहीं थोरीगा ॥ ३ ॥को-

णी कोणासीं नाहीं जाण ॥ आतां नाहीं कोणाचें कोण ॥ शेवटीं नेऊन मारीन ॥ माझें संगें एक कामीन ॥ एका जनार्दनी थोरपण गा ॥ टि० ॥४॥

## ३२ पिंगळा.

पिंगळा महाद्वारीं ॥ बोली बोलतो देखा ॥ डौर फिरवी तो डुगडुग ऐका ॥ ध्रु० ॥ वरल्या आळीला तुह्मीं सावध रहावें ॥ पाटील बुवाला मग लावून सवें ॥ चिटी येइल बा ॥ मग पडेल ठावें ॥ १ ॥ मधल्या आळीला ॥ एक बायको फिरे ॥ तिजला तुह्मीं साधा ॥ मग पडेल पुरें ॥ नाहीं तरी पाटलोबा तिचें पळतील गुरें ॥ २ ॥ आणिक एक बारे ॥ सुटेल तांतडी ॥ पाटील बुवाची मग पडेल मांडी ॥ तिचीं पांच पोरें ॥ लागतील देशो धडी ॥ ३ ॥ आणिक एक ऐका ॥ कैचें नवल झालें ॥ गांवच्या पांड्यांनीं पाटलास नागविलें ॥ साऱ्या कागदाचें शून्य एकच केलें ॥ ४ ॥ हिंडतां फिरतांना एक शकुन सांगे ॥ त्याच्या सत्तेनें ॥ ह्या आळीस वागे ॥ संतां घरचा बा एक तुकडा मागे ॥ हें जरी न ऐ-

दादानोठ० ॥ ध्रु० ॥ चारी शून्याचे वरती ॥ ज्ञान दृष्टीने न्याहाळिती ॥ चारी सूत्रें तिचें हातीं ॥दादा- नोठ० ॥ १ ॥ बायको नव्हे पुरुष नव्हे ॥ दावी नानारंग नटभाव ॥जैसी आकाशीं वीज बा लवे॥ दादानो० ॥ २ जेजे पाहूं गेले तिसीं ॥ तिनें झो- डपिलें तयासीं॥तुकाराम शरण तिशीं॥ दादा०॥३

भजन.

राधा रमणा सांवळिया ॥ चित्त चोरट्या गोंव- ळिया ॥

## ३१ टिटवी.

टिटवी यमाची तराळीन ॥ ध्रु० ॥ एका गांवावर नाहून ॥ एका नदींत विहिर पाहून ॥ तेथें टिटवी करी शयन ॥ दोन्ही पायांत खडा धरून गा ॥१॥ मरे चौगुल्याची सून ॥ पाटलाचे चौवेजण ॥ कुळकर्ण्याची लाडकी सून ॥ आतां गांवांत राहि- ले कोणगा ॥ २ ॥ देशमुख देशपांडे चौधरीं ॥ त्याची गणना कोण करी ॥ शेलकी देशमुखाची पोरी ॥ आतां गांवांत नाहीं थोरीगा ॥ ३ ॥ को-

णी कोणासीं नाहीं जाण ॥ आतां नाहीं कोणाचें कोण ॥ शेवटीं नेऊन मारीन ॥ माझें संगें एक कामीन ॥ एका जनार्दनी थोरपण गा ॥ टि० ॥४॥

## ३२ पिंगळा.

पिंगळा महाद्वारीं ॥ बोली बोलतो देखा ॥ डौर फिरवी तो डुगडुग ऐका ॥ ध्रु० ॥ वरल्या आळीला तुह्मीं सावध रहावें ॥ पाटील बुवाला मग लावून सर्वें ॥ चिटी येइल बा ॥ मग पडेल ठावें ॥ १ ॥ मधल्या आळीला ॥ एक बायको फिरे ॥ तिजला तुह्मीं साधा ॥ मग पडेल पुरें ॥ नाहीं तरी पाटलोबा तिचें पळतील गुरें ॥ २ ॥ आणिक एक बारे ॥ सुटेल तांतडी ॥ पाटील बुवाची मग पडेल मांडी ॥ तिचीं पांच पोरें ॥ लागतील देशो धडी ॥ ३ ॥ आणिक एक ऐका ॥ कैचें नवल झालें ॥ गांवच्या पांड्यांनीं पाटलास नागविलें ॥ साऱ्या कागदाचें शून्य एकच केलें ॥ ४ ॥ हिंडतां फिरतांना एक शकुन सांगे ॥ त्याच्या सत्तेनें ॥ ह्या आळीस वागे ॥ संतां घरचा बा एक तुकडा मागे ॥ हें जरी न ऐ-

ळ कोंबडा उतारा ॥ त्या भूतानें धरिला थारा ॥ भूत० ॥ ३ ॥ भूत लागलें नारदाला ॥ साठ पोरें झालीं त्याला ॥ भूत० ॥ ४ ॥ भूत लागलें ध्रुव बाळाला ॥ उभा अरण्यांत ठेला ॥ भूत० ॥ ५ ॥ एका जनार्दनीं भूत ॥ सर्वठायीं सदोदीत ॥ भूतजबर० ॥ ६ ॥ ॥ ॥ ॥

## ४२ विटीदांडू.

हबक बुबक तिबक पोरा त्रिगुण खेळू मांडू॥खेळूं विटीदांडू ॥ ध्रु० ॥ सत्वविटी धरूनि हातीं धीर धरी दांडू ॥ भावबळें टोला मारी भिऊं नको गांडू ॥ १ ॥ ब्रिद गळ खेळ खेळूं लक्ष लावी तिशीं ॥ मूर्खापाशीं युक्ती नाहीं उडूनि गेली उशी ॥ २ ॥ ओकड लंड मुंड नाल पुढें आणि लेंका॥ भक्तीबळें खेळू खेळ जनार्दनी एका ॥ ३ ॥ खेळवि० ॥

## चेंडूफळी १ ली.

झेलारे भाईनो झेलारे॥गुरुवचनें तुह्मीं झेलारे॥ ध्रु० ॥ सहज चेंडू सामान फळी॥खेळू जाणे तो खेळिया बळी ॥१॥झेलारे० ॥ अभिमानाचा चढे तो

खालता पडे ॥ हातचा चेंडू जाय मग चरफडे ॥ २ ॥ झे० ॥ एका जनार्दनी एकची बोली ॥ गुरुपुत्र होय तोची झेली ॥ झेलारे० ॥

चेंडूफळी २ री.

झेलारे झेला वरचेवर झेला ॥ हातचें गमावितां पाठी खाई टोला ॥ ध्रु० ॥ त्रिगुणाचा चेंडू हातीं झुगारी निराळा ॥ वहिलिया सनमुख लावी तेथें डोळा ॥ १ ॥ अमळा होउनियां धरी वरचेवरी ॥ चपळतेची जिंकी गड्या टाकी येरझारी ॥ २ ॥ हातीं सांपडल्यावरी बसूं न देती कोणी ॥ खारीमागें स्वारी घेती वणवे करूनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुख पाहे तयाचें आगळें ॥ हरीसीं जिंकी तरी कोणे एके खेळ ॥ ४ ॥

हुतुतु.

हुतुतुतुतु गड्या॥खेळ हुतुतुतु गड्या ॥ध्रु०॥ रामकृष्णगोविंद हरिनारायण ॥ नित्य त्याचें भजन करारे ॥ १ ॥ हिरण्यकश्यप प्रल्हाद पुत्र ॥ खेळतां आला हातघाईरे ॥ स्तंभ फोडोनी बाहेर नि-

घाला ॥ पित्या दिधली ह्वाहीरे ॥ २ ॥ राम रावण सन्मुख भिडतां ॥ बरवा खेळ मांडिलारे ॥ कुंभकर्ण इंद्रजित आखिया ॥ त्यांनीं दिधली घ्याईरे ॥ ३ ॥ कौरव पांडव समरंगणीं ॥ खेळिया चक्रपाणीरे ॥ काम क्रोध जिवेमारा ॥ त्यांनीं दिधली घाईरे ॥ ४ ॥ एका जनार्दनी हुतुतु खेळतां ॥ समरंगणी पाहीरे ॥ एकसे हुतुतु त्यांनीं बांधिले ॥ पूर्व दिधलें घ्याईरे ॥ हुतुतु० ॥ ५ ॥

## भोंवरा.

खेळ भोंवरा ग बाई भोंवरा ॥ राधीकेचा नवरा ॥ धु० ॥ माझ्या भोंवऱ्याची अशी ॥ सप्तपाताळ त्यावरी ॥ फिरे गरगरा ॥ राधीकेचा नवरा ॥खेळ० ॥१॥ भोंवरा बनला निर्गुणीं ॥ त्यावर चंद्रसूर्य दोन्ही॥ जाळी शंकर गवरा ॥राधिकेचा नवरा॥खेळ० ॥ २ ॥ एका जनार्दनीं खेळिया ॥ भोंवरा खेळून पाहे चेलिया ॥ नाद देतो हरीहरा ॥ राधीकेचा नवरा ॥ खेळ भोंवरा ग बाई० ॥ ३ ॥

## एकीबेकी.

ए की बेकी पोरा सांग झडकरी ॥ एकी ह्मणतां जिंकिसी बेकी ह्मणतां हारी ॥ ध्रु० ॥ नव्हे कांहीं बाई तेथें झालें एक शून्य ॥ त्यांसीं फांटा फुटतां मग लेखा आलें जाण ॥ दहापासुनी सहस्रावरि एक झाला पूर्ण ॥ एकीबेकी० ॥ २ ॥ एक पूर्ण ब्रह्म तेथें फांट झाली माया ॥ एका जनार्दनी नित्य लक्ष लावी पायां ॥ एकीबेकी० ॥ ३

## फुगडी.

फुगडी फूं फुगडी घालि उघडा राहे ॥ लाज सोडूनी एका एकीकडे पाहे ॥ १ ॥फुगडीच अवघे मोडीरे ॥ तरीच गोडी संसार तोडीरे ॥ २ ॥ मागें जैसी केलीस होती पोटी ॥ ते उच्चारोनी आउच्चारी होटी ॥ ३ ॥ त्रिगुणाची वेणी तुझे उडतें पाठी ॥ सांवरोनी धरी घाली मूळ बंदी गाठी ॥४॥ आगळे पाऊल जिंकी एकाएक ॥ पावसी मान हे मानवती तिन्ही लोक ॥ ५ ॥ तुका ह्मणे तुजम-

काल तरी दुसरा येईल ॥ सरते शेवटीं बा ॥ काळ बांधून नेईल ॥ काळा ह्मणे बा आमचें काय जाईल ॥ ६ ॥

३३ वट वाघूळ.

पूर्वीं पंगतीस केला भेद ॥ नाहीं अंतःकरण शुद्ध ॥ झाले वट वाघूळ प्रसिद्ध ॥ १ वट वाघूळ झाले बाई ॥ करावे काई ॥ उपाय नाहीं ॥ वट वाघूळ० ॥ १ ॥ ध्रु० ॥ वट वागळीचा जन्म घेउन ॥ घेतलें उपराटें टांगुन ॥ तोंडीं नरक भरला जाण ॥ वट-वाघूळ० ॥ २ ॥ वट वाघळीची यातना मोठी ॥ भोगिल्या लक्ष चौऱ्याशी कोटी ॥ जन्ममरणाच्या तुटल्या गांठी ॥ वट० ॥ ३ ॥ एका जनार्दनीं वट-वाघुळ झालें ॥ सद्गुरूला शरण गेले ॥ जन्ममरण चुकविलें ॥ वट वाघूळ झालें बाई० ॥ ४ ॥

३४ काऊ.

पैल तो काऊ कोकतसे ॥ शकुनग माय सांगतसे ॥ ध्रु० ॥ उड उडरे काऊ ॥ तुझें सोन्यानें मढवीन पाऊ ॥ पाहुणे पंढरिराऊ ॥ घरीं कैयेती ॥ १ ॥

दहीं भाताची उंडी ॥ लावीन तुझ्या तोंडीं ॥ जीवा पडी वच्याची गोडी ॥ सांग वेगीं ॥ २ ॥ दुधा भरून वाटी ॥ लावीन तूझे ओंठीं ॥ प्रत्यक्ष सांग गोष्टी ॥ विठू येईल कै ॥ ३ ॥ आंबीया डाहाळी॥ फळें चोखी रस आंवळी ॥ आजिचेरे काळीं ॥ शकुन सांगे ॥ ४ ॥ ज्ञानदेव ह्मणें ॥ जाणिजे येणें खुणे ॥ भेटूं पंढरीराणें ॥ शकून सांगे ॥ ५ ॥

## ३५ मैना.

तोती मैना राधे कृष्ण तोती मैना राधे कृष्ण ॥ राधे कृष्ण बोल तोती राधे कृष्ण बोल ॥ ध्रु० ॥ एकही तोती धुंडत आई ॥ लाकटकीवानी मोल ॥ तोती मै० ॥१॥ दाना खावे तोती पानी पीवे ॥ पिंजेरमें करित कल्लोळ ॥ तोती० ॥२॥ मीराके प्रभु गिरधरनागर॥हरिके चरण चितडोल॥तो० ३

## ३६ पोपट.

पढो माझ्या आत्मारामा ॥ राधाकृष्णाचें हें ध्यान ॥ पिंजऱ्यामध्यें गुंतलासी ॥ तुज सोडवील कोण॥ पढो० ॥ ध्रु० ॥ चौऱ्याशीं लक्षयोनी ॥ वनीं तूं नरी

हिंडशी ॥ प्रमदा विषफळीं ॥ अतित्वरें धांव घेसी ॥ येउनियां दोनी पक्षी ॥ पहाती तुज न्यावयासी॥ पढोमा० ॥ १ ॥ पिंजरा घडविला ॥ पंच भूतांचा कूसरी ॥ नवद्वारें सोळा सांधे ॥ प्रभा पडली भीतरी ॥ लाविली प्राचीनाची दोरी ॥ बांधिला निज मंदीरीं ॥ पढो० ॥ २ ॥ हिरवा तुझा रंग ॥ गुंज वर्ण दोनी डोळे ॥ चोंच आहे तुझी लाल ॥ बोल तुझा हा मंजूळ ॥ राघवा तूं बोल माझ्या ॥ सख्या अमोलिक मोल ॥ पढो० ॥ ३ ॥ अचल तूं चंचल मोठा॥हिंडे तीनही ताळ॥तुला जपला काळ॥बोका ॥केव्हां घालील गळ ॥ जरी जाशी उडोनीयां॥पूर्व सुकृताचें फळ ॥ पढो० ॥ ४ ॥ सत्यगुरु दत्तदाता ॥ तारक मंत्र तूज देई॥तोच तुला सोडवील॥यम करी लकायी ॥ पावशील चिंतामणी ॥ स्वामी तुकोबाचे पायीं ॥ पढोमा० ॥ ५ ॥

## ३७ पांखरू.

कृष्ण एक पांखरूं आहे॥तें मुखावीण-चारा खायरे ॥ डोळे नाहीं परितें पाहे ॥ वाचेवीण सोय

गायरे ॥ १ ॥ सख्या त्याचें नांव कान्होबा॥कृष्ण ह्मणती सबरे ॥ त्याचें वास्तव्य कोठें आहे॥पर नाहीं तरि तें उडेंरे ॥ २॥ तिहीं लोकीं हिंडतें॥त्रिभुवन त्याला थोडेंरे ॥ त्याचे नखांत आकाश बुडे ॥ तो सन्मुख चहूंकडेरे ॥ ३ ॥ अहो त्याला मायबाप॥दोन्ही नाहींरे ॥ एक पणेविण पहाती॥जनार्दनाचे पायरे ॥ ४ ॥

## ३८ कुत्रें.

येरे कुत्तु ये ॥ आह्मां विटाळ करूं नको ॥ आपली भाकर घे ॥ दे रे धन्या दे ॥ विटाळ राहिला तुजखालीं ॥ आवरून आपला घे ॥ आतां हे कुत्रे मातलें ॥ मीच ह्मणूनी गुंतलें ॥ फार गांड मोठी केली ॥ जीवा तुझी खोटी झाली ॥ उपाशीं मरतो पाहे बरें ॥ अमृताचें अंग सारें ॥ धर एक सकाळ काय खाशी ॥ तूंच मुद्दल कोठें रहासी ॥ एवढें ज्ञान झालें कोठें ॥ सद्गुरूचें देणें मोठें ॥ सद्गुरुतुला आहे कारे ॥ सर्वांघटीं तोचकींरे ॥ आह्मीं तरह्मणतों कुत्रा तुला ॥ अविद्येनें धतोरा दिला ॥

ब्राह्मणाशीं अविद्या ह्मणशी ॥ देह ब्राह्मण कैसा होशी ॥ श्रेष्ठ जन्म वेद बोलती ॥ येवढें भलें तरी-का मरती ॥ हरी भक्त अमर होती ॥ अमर होती ते कळे कैसें ॥ आपण व्हावें तैसें ॥ तैसा होई नासी कांरे ॥ जात गोत पाहिनाशीं कांरे ॥ हेंज्ञान तुला कशानें झालें ॥ ज्ञानदेव ह्मणे निवृत्ति कृपें कळों आलें ॥ १ ॥ ॥ ॥ ॥

## ३९ विंचू.

विंचू चावला वृश्चिक चावला ॥ कामक्रोध विंचू-चावला ॥ तम घाम आंगासीं आला ॥ ध्रु० ॥ पंचप्राण व्याकुळ झाला ॥ त्याणें माझा प्राण चालिला ॥ सर्वांगाचा दाहझाला ॥ विंचूचा० ॥ १ ॥ मनुष्य इंगळी अती दारुण ॥ मज नांगा मारला तिनें॥सर्वांगीं वेदना जाण॥त्या इंगळीची॥विंचूचा०॥२॥ ह्या विंचवाला उतारा ॥तमोगुण मागें सारा ॥ सत्वगुण लावा आंगारा ॥ विंचू इंगळी उतरे झरझरा ॥ विंचू० ॥ ३ ॥ सत्य उत्ताऱ्या येउ-

न ॥ अवघा सारिला तमोगुण ॥ किंचित राहिली फुणफुण ॥ शांतकेली जनार्दनें ॥ ४ ॥

४० येडका.

येडका मदन तो केवळ पंचानन ॥ येड० ॥ ध्रु०॥ धडक मारिली नारदा ॥ केला रावणाचा चेंदा ॥ दुर्योधना मारिली गदा ॥ घेतला प्राण ॥ तोकेवळ० ॥१॥ धडक मारिली शंकरा ॥ केला ब्रह्मयाचा मातेरा ॥ इंद्र चंद्रासी भेदरा ॥ लाविलाजेणें ॥ तोकेव० ॥ २ ॥ भस्मासूर मुकला प्राणासी ॥ तेचि गती झाली वाळीसी ॥ विश्वामित्रा सारिखा ऋषी ॥ नाडिला जेणें ॥ तो केवळ पंचा० ॥ ३ ॥ शुकदेवानीं ध्यान धरोनी ॥ येडका आणिला आकळोनी ॥ एकाजनार्दनाचे चरणीं ॥ लाविलाज्याणे ॥ तोकेवळ० ॥ येडका० ॥ ४ ॥

४१ भूत.

भूत जबर मोठें गबाई ॥ झाली झडपण करुं गत काई ॥ भूत० ॥ ध्रु० ॥ सुपचाटुचे केले देव ऋषी ॥ याभूतानें धरिली केशी ॥ भुत० ॥ २ ॥ लिंबू नार-

ळ कोंबडा उतारा ॥ त्या भूतानें धरिला थारा ॥ भूत० ॥ ३ ॥ भूत लागलें नारदाला ॥ साठ पोरें झालीं त्याला ॥ भूत० ॥ ४ ॥ भूत लागलें ध्रुव बाळाला ॥ उभा अरण्यांत ठेला ॥ भूत० ॥ ५ ॥ एका जनार्दनीं भूत ॥ सर्वठायीं सदोदीत ॥ भूतजबर० ॥ ६ ॥ ॥ ॥ ॥

## ४२ विटीदांडू.

हबक बुबक तिबक पोरा त्रिगुण खेळू मांडू॥खेळूं विटीदांडू ॥ध्रु० ॥ सत्वविटी धरूनि हातीं धीर धरी दांडू ॥ भावबळें टोला मारी भिऊं नको गांडू ॥ १ ॥ ब्रिद गळ खेळ खेळूं लक्ष लावी तिशीं ॥ मूर्खापाशीं युक्ती नाहीं उडूनि गेली उशी ॥ २ ॥ ओकड लंड मुंड नाल पुढें आणि लेंका॥ भक्तीबळें खेळूं खेळ जनार्दनी एका ॥ ३ ॥ खेळवि० ॥

## चेंडूफळी १ ली.

झेलारे भाईनो झेलारे॥गुरुवचनें तुह्मीं झेलारे॥ध्रु० ॥ सहज चेंडू सामान फळी॥खेळूं जाणे तो खेळिया बळी ॥१॥झेलारे० ॥ अभिमानाचा चढे तो

खालता पडे ॥ हातचा चेंडू जाय मग चरफडे ॥ २ ॥ झे० ॥ एका जनार्दनी एकची बोली ॥ गुरु-पुत्र होय तोची झेली ॥ झेलारे० ॥

## चेंडूफळी २ री.

झेलारे झेला वरचेवर झेला ॥ हातचें गमावितां पाठी खाई टोला ॥ ध्रु० ॥ त्रिगुणाचा चेंडू हातीं झुगारी निराळा ॥ वहिलिया सनमुख लावी तेथें डोळा ॥ १ ॥ अमळा होउनियां धरी वरचेवरी ॥ चपळतेची जिंकी गड्या टाकी येरझारी ॥ २ ॥ हातीं सांपडल्यावरी बसूं न देती कोणी ॥ खारीमागें खारी घेती वणवे करूनी ॥ ३ ॥ तुका ह्मणे सुख पाहे तयाचें आगळें ॥ हरीसीं जिंकी तरी कोणे एके खेळ ॥ ४ ॥

## हुतुतु.

हुतुतुतुतु गड्या॥खेळ हुतुतुतु गड्या ॥ध्रु०॥ रामकृष्णगोविंद हरिनारायण ॥ नित्य त्याचें भजन करारे ॥ १ ॥ हिरण्यकश्यप प्रल्हाद पुत्र ॥ खेळतां आला हातघाईरे ॥ स्तंभ फोडोनी बाहेर नि-

ध्यें एक भाव सम तुकें ॥ भार घेऊं पावों उंच ठाव ॥ ६ ॥

## हमामा.

हमामा पोरा हमामा ॥ घुंबरी वाजे घमामा ॥ ध्रु० ॥ हमाम्याचे नादानीं घुंमरी वाजली रानीं ॥ १ ॥ हमाम्याची शीतळ शाई ॥ पोरा मेली तुझी माझीआई ॥२॥ काम क्रोध पोरा नाहीं ॥ अहंकार बोचा वासी ॥ ३ ॥ बाप रखमादेवी वराशीं ॥ पोरा वहिल्या गांवा जाशी ॥ ४ ॥

## डुगडुग्या.

डुग डुग डुग डुग डुग ॥ डुगडुगोनी गेलें चारियुग ॥ काम क्रोधाचेनी लाग वेग ॥ या मनामागें धांवत ॥ डुग० ॥ १ ॥ हीत नोहेगा सर्वथा ॥ गेलें हरपोनी पाहतां ॥ भुलले मायेनें सर्वथा ॥ यमपंथासी जाती ॥ डुग० ॥ २ ॥ जातां यमपुरीच्या वाटें ॥ जीवासी अघात आहेत मोठे ॥ संचित क्रिया नामाचें साठें ॥ तया वाटेसीं जाऊं पाहे ॥ डुग० ॥ ३ ॥ जे भले सात्विक संत ॥ आ-

हेत निशिदिनीं गुरुचे भक्त॥ त्यासीं माझा नमस्का
र येत ॥ गुरुशीं शरण जा वेगीं ॥ डुग० ॥ ४ ॥
गुरुसि गेलिया शरण ॥ काय करील जन्ममरण ॥
स्वरुपीं लागेल अनुसंधान ॥ निजनिधान प्रगट
होय ॥ डुग० ॥ ५ ॥ आणिक एक सांगतों शकुन
मोठा ॥ तुज लागला एका बायकोचा चपेटा ॥
तिच्या चांगुलपणाला सुभटा ॥ भुलूं नको सर्वथा॥
डुग० ॥ ६ ॥ आणिक एक तिची करणी ॥ वि-
ष्णूस लाविलें वृंदेच्या स्मशानीं ॥ नारदाची नार-
दी करुनी ॥ साठ पुत्र जन्मविलें ॥ डुग० ॥ ७ ॥
यालागीं तिचा पदरू नाहीं बरा ॥ अंतीं दगा देईल
सारा ॥ अजून तरी हित विचारा ॥ दान करा पी-
डा टळे ॥ डुग० ॥ ८ ॥ तिनें बहुतांशीं दिधला
दगा ॥ ईश्वरासारिखा भुलविला ॥ ब्रह्मयांशी वेध
लाविला ॥ रत झाला कन्येसी ॥ डुग० ॥ ९ ॥
नवा ठायीं फाटला झगा ॥ तो नये तुझे उपयोगा॥
विषय भोगीत आंगा ॥ तो मज दान पिंगळीया ॥
डुग० ॥ १० ॥ काळा मींच काळीं चिरगुटें ॥ प-

दरीं बांधून मी तूंपणाचें मीठ ॥ त्रिवर्ग करोनी रोकडे नीट ॥ ओंवाळून टाकी आतां ॥ डुग० ॥ ११ ॥ तेणें टळेल तुझी पीडा ॥ चुकेल मीतूंपणाचा झगडा ॥ स्वरूपीं होईल आनंद गाढा ॥ श्री जनार्दन प्रसादें ॥ डुग० ॥ १२ ॥ एका जनार्दनीं प्रेमबोध ॥ प्रगट होय संवाद ॥ पिंगळा भाकीतसे प्रबोध ॥ परोपकार जाणेगा राया ॥ डुग० ॥ १३ ॥

## थट्टा.

असे हीथट्टा ॥ भलभल्यासी लाविला बट्टा ॥ ध्रु० ॥ थट्टा गेली शंभो पाशीं ॥ कलंक लाविला चंद्रासी ॥ भगें पडिलीं इंद्रासीं ॥ बरी नव्हे थट्टा ॥ भलभल्यासि लाविला बट्टा ॥ १ ॥ थट्टेने मेला दुर्योधन ॥ भस्मासुर गेला भस्म होउन ॥ वाळीहि मुकला आपुल्या प्राणा ॥ असीहीथट्टा ॥ भ० ॥ २ ॥ थट्टा रावणाने केली ॥ नगरी सोन्याची बुडविली ॥ थट्टाज्याची त्यास भोंविली ॥ बरी नव्हे थट्टा ॥ भ० ॥ ३ ॥ अरण्यांत होता भृगु ऋषी ॥ थट्टा गेली त्याचे पाशीं ॥

भुलवूनि आणिला अयोध्येशी ॥ बरी नव्हे थट्टा ॥
॥ भ० ॥ ४ ॥ विराट राजाचा मेहुणा ॥ नाम त-
याचें कीचक जाणा ॥ त्याणें घेतले बहुतांचे प्राणां॥
बरीनव्हे० ॥ ५ ॥ थट्टेपासुन सुटले चौघेजण ॥ शु-
क भीष्म आणि हनुमान ॥ चौथा कार्तिक स्वामी
जाण ॥ त्यानां नाहीं बट्टा॥अशी ही थट्टा० ॥भ०॥
॥ ६ ॥ गोसावी नंदन ह्मणे सर्वांला ॥ थट्टेने भिऊन
तुह्मीं चाला ॥ नाहींतर नेइल नरक कुंडाला ॥ अ-
शीही थट्टा ॥ भलभल्यासी लाविला बट्टा ॥ ७ ॥

## प्रारब्ध.

ऐका प्रारब्धांची ठेव ॥ भिक्षुक झाले पांडव ॥ धन
घोडे भाग्य सर्व ॥ सांडिला ठाव प्रारब्धें ॥ १ ॥ श-
रीर संचिता धीन ॥ धर्मराज हिंडे वनोवन ॥ कर्में
बुडाला रावण ॥ दुर्योधन प्रारब्धें ॥ २ ॥ अभिमा-
नी शिशुपाळ ॥ ईश्वरा हातीं झाला काळ ॥ याद-
व बुडाले सकळ ॥ त्यासीं दुःखप्रारब्धें ॥ ३ ॥ क
र्मबुद्धीचें तें सुख ॥ अतिमानितातीं मूर्ख ॥ चंद्रा-
सीं कळंक ॥ त्यासीं दुःख प्रारब्धें ॥ ४ ॥ कर्म रेखारे

टळेना ॥ बाण लागला जगज्जीवना ॥ कृष्णें सांडी-
ल्या गोपांगना ॥ नारायणा प्रारब्धें ॥ ५ ॥ हरिश्चं-
द्र तारामती ॥ घोर जन्मांतर भोगिती ॥ नळ रा-
जा तो पुरुषार्थी ॥ त्यासीं दुःख प्रारब्धें ॥ ६ ॥ प-
तिव्रता सुशील॥दमयंती पायपोळ ॥ असे अनीवा-
र कपाळ ॥ तिशीं दुःख प्रारब्धें ॥ ७ ॥ राज्य सो-
डिलें रघुवीरें ॥ सर्व मिळोनियां वानरें ॥ पायीं फिरे
देशांतरें ॥ त्यासीं दुःख प्रारब्धें ॥ ८ ॥ तें फिरतां
काय झालें ॥ पुढें प्रारब्ध ओढवलें ॥ जानकीसीं
राक्षसें नेलें ॥ तिशीं दुःख प्रारब्धें ॥ ९ ॥ कर्मा आ-
धीन शरीर ॥ परब्रह्म रामचंद्र ॥ रघुपति विष्णूचा
अवतार ॥ जन्मांतर ह्मणे नामा ॥ १० ॥ ॥ ॥

## नगर.

एक मीं देखिलें नगर ॥ एक० ॥ नव दरवाजे दश-
वेंद्वार ॥ नवद० ॥ तेथें राजा रघुवीर ॥ एक सख-
या ॥ ध्रु० ॥ परापश्यंति मध्यमा ॥ परा० ॥ चौथी
वैखरी ती जाणा ॥ चौ० ॥ तेथें वाजे रुण झुणा ॥

साक्षपैरा ॥ एक० ॥ १ ॥ सहस्त्र दळ औटपीठ ॥ ॥ सह० ॥ अवघा भरलासे दाट ॥ अ० ॥ तेथें मूळ मायेचें पीठ ॥ श्रीरामाचें ॥ एक० ॥ २ ॥ अखंड झालासे उबारा ॥ अखंड० ॥ निरंजनीं त्यासीं थारा ॥ नि० ॥ गोपाळ नाथ निज माहेरा ॥ ॥सखया० ए० ॥ ३ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

## फुगडी.

खेळग फुगडी ॥ नको जाऊं तूं रडी ॥ ध्रु० ॥ फुगडी खेळग तूं पिंगा ॥ आलीस माझ्या संगा ॥ फुगडी खेळरे श्रीरंगा ॥ सोडुन धांगडधिंगा ॥ खेळ० ॥ १ ॥ फुगडी खेळगे फेराची ॥ हो बाईल दीराची ॥ लज्जा सांडगे मनाची ॥ गांवच्या लोकांची ॥२॥खे० फुगडी खेळग लाखोटा॥धर माझा आंगोठा ॥ बळकट घालगे कांसोठा ॥ सोडून चारी वाटा ॥ खेळ० ॥ ३ ॥ फुगडी खेळगे शिवशक्ति ॥ हरिनामाची भक्ती ॥ तुकया स्वानंदे गर्जती ॥ द्रौपदीच्या कीर्ती ॥ खेळग फुगडी० ॥ ४ ॥

भजन.

ज्ञानदेव तुकाराम ॥ ज्ञानदेव तुकाराम ॥ तुकारा-
म ॥ तुकाराम ॥ तुकाराम ॥ ॥ ध्रु ॥ ॥

# प्रकरण ४ थें.

## उत्तर भजन.

जाहलें भजन आह्मीं नमितों तवचरणा ॥ वा-
रूनीयांविघ्नें देवा रक्षावेंदीना ॥ ध्रु० ॥ दास तुझे
आह्मीं देवा तुलाची घ्यातो ॥ प्रेमें करुनीदेवा गु-
ण तूझे गातो ॥१॥ तरीन्यावी सिद्धिदेवा हेचीवा-
सना ॥ रक्षूनीयां सर्वां द्यावी आह्मांसी आज्ञा ॥
२ ॥ मागणेतें देवा आतां एकचि आहे ॥ तारूनि-
यां सकळा आह्मां कृपादृष्टीं पाहे ॥ ३ ॥ जेव्हां आ-
ह्मीं मिळूं ऐशायाठायां ॥ प्रेमानंदें लागूं तुझी
कीर्तीवर्णाया ॥ ४ ॥ सदाऐशी भक्ती राहो आमु-
च्या मनीं ॥ हेचिदेवा तुह्मां असे नित्य विनवणी
॥ ५ ॥ निर्दाळुनी अरिष्टें आतां आमुचीं सारीं ॥
कृपेचि साउली देवा दीनावरी करी ॥ ६ ॥ निरंतर

आमुची चिंता तुह्मां असावी ॥ आह्मां सर्वांची लज्जा देवा तुह्मीं रक्षावी ॥ ७ ॥

## आरती विठ्ठलाची.

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा ॥ वामांगें रखुमाई दिसेदिव्य शोभा ॥ पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले-गा ॥ चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा ॥ १ ॥ जय देव जयदेव जय पांडुरंगा ॥ रखुमाई वल्लभा पावें जिवलगा ॥ ध्रु० ॥ तुळशी माळा गळां कर ठेवुनि कटीं ॥ कांसे पीतांबर कस्तुरि ल्लाटीं ॥ देवसुरवर नित्ययेती भेटी ॥ गरुड हनूमंत पुढें उभे राहती ॥ २ ॥ धन्यवेणूनाद अनुक्षेत्रपाळा ॥ सुवर्णाचीं क-मळें पद्माळा गळा ॥ राई रखुमाबाई राणीयास-कळा ॥ ओंवाळीती राजा विठोबा सांवळा ॥ ३ ॥ ओंवाळूं आरत्या कुरवंड्या येती ॥ चंद्र भागेमध्यें सोडुनियां देती ॥ दिंडी पताका वैष्णव नाचती ॥ पंढरीचा महिमा वर्णावा किती ॥ ४ ॥ आषाढी कार्ती-की भक्त जनयेती ॥ चंद्रभागे माजी स्नानें जे करि-

ती ॥ दर्शन हेळा मात्रें तयां होय मुक्ती ॥ केशवासीं
नामदेव भावें ओंवाळिती ॥ ५ ॥ जयदेव० ॥

## आरती ज्ञानदेवाची.

आरती ज्ञानराजा ॥ माहा कैवल्य तेजा ॥ सेविती
साधुसंत ॥ मनुवेधला माझा ॥ ध्रु० ॥ लोपलें ज्ञा-
न जगीं ॥ हितनेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग ॥
नाम ठेविलें ज्ञानीं ॥ १ ॥ कनकाचें ताटकरीं ॥ उ-
भ्या गोपिकानारी ॥ नारद तुंबर हो ॥ साम गा-
यन करी ॥ २ ॥ प्रगटगुह्यबोले ॥ विश्व ब्रह्मची के-
लें ॥ रामाजनार्दनीं ॥ पायींटकची ठेले ॥३॥ आ०

## तुकारामाची आरती.

आरती तुकारामा ॥ स्वामी सद्गुरु धामा ॥
सच्चिदानंद मूर्ती ॥ पाय दाखवीं आह्मां ॥ ध्रु० ॥
आ० ॥१॥ राघवें सागरांत ॥ उदकीं पाषाण तारी-
ले ॥ कवतुक तुकोबाचें ॥ अभंग रचियेले ॥ आर०
॥ २ ॥ सच्चिना तूळणेसीं ॥ प्रेमसुखाशीं आलें ॥
ह्मणूनि रामेश्वरीं ॥ चरणीं मस्तक ठेविलें ॥
आरती० ॥ ३ ॥

## आरती ज्ञानदेवाची.

इंद्रायणिचे तटीं धरिला रहिवास ॥ विश्व तारावया लक्ष्मी नीवास ॥ ज्ञानेश्वररूपें धरिला निजवेश ॥ वर्म जाणे तया सद्गुरु उपदेश ॥ जयदेव जयदेव जय ज्ञानदेवा ॥ जीवा शीवा आदी परब्रह्मठेवा ॥ ध्रु० ॥ कृष्ण एकादशी कार्तिकमासीं ॥ आपण पंढरिनाथ सनकादीकांसी ॥ यात्रेशीं येतां स्वानंदराशी ॥ दर्शन घडे तयां निजमुक्ती देसी ॥ २ ॥ महिषीपुत्र केला वाचक वेदाचा ॥ प्रतिष्ठानीं गर्व हरिला विप्रांचा ॥ विशेष अर्थ केला भगवद्गीतेचा ॥ अजान वृक्ष शोभे पिंपळ कनकाचा ॥ ३ ॥ सकळ सिद्ध गणामाजी तूं श्रेष्ठ ॥ ज्ञानदेव अनुभवी ज्ञानावरिष्ठ ॥ अनुताप ज्याचा विश्व ब्रह्म घनदाट ॥ मुक्तेश्वरीं न धरवे प्रेमाचा लोट ॥ ४ ॥

## आरती एकनाथाची.

आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था ॥ त्रिभुवनीं तूंचि थोर ॥ जगद्गुरु जगन्नाथा ॥ ध्रु० ॥

एकनाथ नाम सार ॥ वेदशास्त्रांचें गूज ॥ संसार दुःखनासे ॥ महा मंत्राचें बीज ॥ आरती० ॥ १ ॥ एकनाथ नाम घेतां ॥ सुख वाटलें चित्ता ॥ अनंत गोपाळदास ॥ धणीनपुरे गातां ॥ आरती० ॥ २ ॥

## आरती विठ्ठलाची.

येईं येईं हो विठ्ठले माझे माऊलीये ॥ निढळा वरी कर ठेउनी वाटमीं पाहें ॥ध्रु०॥ आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप ॥ पंढरपुरीं आहे माझा माय बाप ॥ १ ॥ पिंवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ॥ गरुडावरी बैसोनी माझा कैवारी आला ॥ २ ॥ विठोबाचें राज्य आह्मां दसरा दिपवाळी ॥ विष्णुदास नामा जीवें भावें ओंवाळी ॥ येईं येईं हो विठ्ठले० ॥ ३ ॥

## आरती श्रीहरीची.

हरि चला मंदिरा ऐशा ह्मणती गोपिका ॥ ऐसी ह्मणती राधिका ॥ भावें ओंवाळिती यादव कुळ टीळका ॥ध्रु०॥ एकीकडे राई एकीकडे रखुमाई ॥भावें ओंवाळितां हरि झाले दो ठायीं ॥ १ ॥ अष्टाधिक

सोळा सहस्र ज्याच्या सुंदरा॥ज्या जांनीं प्रार्थिलें गेले तयांच्या घरा ॥२॥ एका जनार्दनीं हरि तूं लाघवी होसी॥इतुक्याही भोगुनी ब्रह्मचारी ह्मणविसी॥३॥

## विडा.

विडा घ्याहो नारायणा ॥कृष्णाजगत्रजीवना ॥ विनविते रखुमाई ॥ दासी होईनमीं कान्हा ॥ध्रु०॥ वासना फोडुनीयां ॥ चूर्ण केली सुपारी ॥ भावार्थ कापुरानें ॥ घोळियेली निर्धारी ॥ १ ॥ शांतिहे नागवेली ॥ पान घेऊनियां करीं ॥ मींपण जाळुनीयां ॥ चुना लावियेला वरी ॥ वि०॥ २ ॥ विवेकहा कातरंग ॥ रंगिं रंगला सुरंग ॥ वैराग्य जायफळ ॥ मेळविले सकळ ॥वि०॥३॥दया हे जायपत्री॥ क्षमा लवंगा आणिल्या ॥ सुबुद्धि वेलदोडे ॥ शिवरामीं अर्पिले वि० ॥ ४ ॥

## कांकड्याची आरती.

अनुपम्र नगर पंढरपुर ॥ भीमा मनोहर संतांचे माहेर ॥ अव्यक्त आदि मूर्तिपरब्रह्म साकार ॥ विटे वरी नीट उभा ॥ कटि ठेउनी कर ॥ १ ॥ जयदेवा

पांडुरंगा जय आनंदकंदा ॥आरती ओवाळीन॥पुं-
डरीक वरदा ॥ जयदेवा पांडुरंगा ॥ ध्रु० ॥ गोमती
गोदावरी यमुना सरस्वती कृष्णा तुंगभद्रा ॥ नर्मदा
भागिरथी सकळीक माध्यान्हीं चंद्रभागेसी येती ॥
कनकपात्र आरतीया विठोबा ओंवाळिती ॥ ज० ॥२
॥ धन्यहा वेणुनाद क्रीडा करी गोविंद ॥ पश्चिमे प-
द्मतीर्थ ॥ क्षेत्रपाळ प्रसिद्ध ॥ नारद तुंबर हो ॥ गा
ती ध्रुव प्रल्हाद ॥ प्रेमें आनंद भरीत करिताती
आनंद ॥ ज० ॥ ३ ॥ तीर्थक्षेत्रांचिया ऐशा मि-
ळती कोटी ॥ पांडुरंग एकसरी न एकची घडी ॥
वामांगीं रखुमाई वेद बोलती प्रौढी ॥ जय जयका
र करिती देव तेहेतीसकोटी ॥ ज० ॥ ४ ॥ ऐसा दे-
वाधिदेव विठ्ठ पंढरी राहो ॥ भक्त जन कुटुंबिया दे-
वी रखुमाई नाहो ॥ पुरवील मनकामना कैवल्य
उपावो ॥ कान्होया हरिदास मागे प्रेम पासावो ॥

## धुपारती.

जयदेव जयदेव जय पंढरिराया ॥ धूपअर्पितसें मीं

भावें तव पायां ॥ ध्रु० ॥ सोज्वळ अग्नीरूपा निज-
तेजोराशी ॥ अहंभाव धूप कृपें जाळीसी ॥ त्याचा
आनंद माझे मानसीं ॥ तव दर्शन मोदें सुख हें
सर्वांसी ॥ १ ॥ पूर्णानंददेवा तूं सच्चिदानंदा ॥ पर-
मात्मा तूं असती आनंद कंदा ॥ पूर्ण करी तूंची
भक्तांच्या छंदा॥अंगीकारुन धूपा दे ब्रह्मानंदा॥२॥

दीपारती.

जयदेव जयदेव जय पांडुरंगा ॥ एकार्ती ओंवाळूं
तुजला जिवलगा ॥ ध्रु ॥ स्वयंप्रकाशा तुझी सर्व-
ही दीप्ती ॥ पूर्णानंद प्राप्त करितां तव भक्ति ॥ देहत्र
य वाती पाजळोनी प्रीती ॥ ओंवाळीतों प्रेमें देवा
तुजप्रती ॥ १ ॥ देवा तुज पावतो येतो प्रेमपूर ॥ ना-
म निरंतरगातां होतो भवपार ॥ वाटे तव भक्तीही
मोठी प्रियकर ॥ विष्णुदासादेई अखंड हा भर॥२॥

नैवेद्यारती.

जयदेव जयदेव जय वीठाबाई ॥ पक्वान्नादिसि-
द्धि अर्पी तुजठांई ॥ ध्रु०॥ षड्रसपक्वानें हीं अर्पित
तुजमाई ॥ कृपाकरुनी तीं तूं मान्य करुन घेई ॥

देह समयीं लाविली दीप्ती ॥ वैराग्य कुंचा हाच हा-
तीं ॥शेज झाडियेली प्रीती ॥ आता कृपावंता ॥३॥
सुंदर सडाशोभे भारी ॥ सु प्रेम निरधारी ॥ दासा-
चा कैवारी॥होसी माझ्या पतीता ॥ ४ ॥ त्रैगुण पर-
ब्रह्म ॥ दीनानाथ हें नाम ॥ घेतां चरणी धाम ॥
देसी तूं भक्तां ॥ ५ ॥ भावार्थ मंचकावर ॥ शयन
करी सर्वेश्वर ॥ बाळ विनवी किंकर ॥ स्वानंद भ-
रिता ॥ ६ ॥ निराकार निर्गुण ॥ भक्तां साठीं तूं
सगुण॥द्वैत कपाट बुजवून ॥ टाकीयेली तुझी सत्ता
॥ ७ ॥ परात्पर स्वयं खेळ ॥ शेजकेली ही सोज्वळ॥
पुष्पें सुमनें निर्मळ ॥ काय बोलूं तीच वार्ता ॥८॥
आशातृष्णापळविली ॥ क्षमाशांती दासी उभी
केली ॥ तीच तूं माउली ॥ पंढर पुरीं दयावंता॥९॥
कृपेच्या तूं सागरा ॥ क्षमेच्या तूं आगरा ॥ शयन
करी सर्वेश्वरा ॥ तूं चिस्वामिराया आतां ॥ १० ॥
स्वामिसुतेंशेजकेली ॥ निरंजनीं माउली निजली॥
चरण सेवा कराया मिळाली ॥ चरणीं ठेउनीयां
माथा ॥ ११ ॥

## काकड आरती.

ओंवाळितों कांकडारती पांडुरंगा तुजप्रती ॥ चरण दावी जगत्पती ॥ स्तवितों पंढरी तुज आदि मूर्ती ॥धु०॥ भक्तजन येवोनियां ॥ द्वारीं उभे स्वामिराया ॥ चरण तुझे पहावया ॥ तिष्ठती मी भक्त प्रीती ॥ १ ॥ पूर्ण ब्रह्मदेवाधि देव ॥ निरंजनीं तुझा ठाव ॥ भक्तां साठीं देह भाव । धरसी तूं विश्वपती ॥ २ ॥ भक्तांचा कैवारी ॥ समर्था निर्धारी ॥ हेत ठेउनी चरणावरी ॥ गातों आह्मीं तुझी स्तुती ॥ ३ ॥ देवा तूंचिकृपाघन ॥ उठुनी देईल दर्शन ॥ चरण कमल वंदोन ॥ मागतसे कृपाघन ॥ ४ ॥

## विनंती पर अभंग.

विठ्ठल आमचें जीवन ॥ आगम निगमाचें स्थान ॥ विठ्ठल सिद्धीचें साधन ॥ विठ्ठल ध्यान विसावा ॥ १ ॥ धु० ॥ विठ्ठल कुळींचे दैवत ॥ विठ्ठल वित्त गोत चित्त ॥ विठ्ठल पुण्य पुरुषार्थ ॥ आवडे मात विठ्ठलाची ॥ २ ॥ विठ्ठल विस्तारला जनीं ॥ सप्तद्वीपाताळें भरूनी ॥ विठ्ठल व्यापक त्रिभुवनीं ॥

तृप्ती सर्व जीवांजेवितां तूं आई ॥ जीवन सर्वांचें हें असे तव पायीं ॥ १ ॥ आनंदें भोजन करावें ॥ यथेच्छ जेउनी उच्छिष्ट उरतां ॥ तो प्रसाद देई आपुल्या भक्ता ॥ हेंचिमागें ठेउनीं तव चरणीं माथा ॥ २ ॥

## महाआरती.

जयदेव जयदेव जय पांडुरंगा ॥ आरती ओंवाळूं भावें जिवलगा ॥ पंढरिक्षेत्रासीं तूं अवतरलासी ॥ जगदोद्धारासाठीं राया तूं फिरसी ॥ भक्तवत्सल खरा तूं एक होसी ॥ ह्मणुनी शरण आलों तुझे चरणासी ॥ १ ॥ त्रिगुण परब्रह्म तुझा अवतार ॥ त्याची काय वर्णु लीला पामर ॥ शेषादिक शिणले न लगे त्या पार ॥ तेथें जड मूढ मी कैसाकरूं विस्तर ॥ २ ॥ देवादिदेवतूं पंढरी राया ॥ निर्जर मुनिजन ध्याती भावें तव पायां ॥ तुजसी अर्पण केली आपुली मीं काया ॥ शरणागतांतारीं तूं देवराया ॥ ३ ॥ अघटित लीला करुनी जड मूढ उद्धरिले ॥ कीर्ती ऐकुनि कानीं चरणीं मीं लोळें ॥ चरण प्रसाद मोठा

मजहें अनुभवलें ॥ तुझ्या भक्तां नलगे चरणा वेगळें ॥ ४ ॥

## नीरांजन आरती.

जयदेव जयदेव जय निरंजन सांई ॥ नीरांजन ओंवाळूं भावें तव पायीं ॥ ध्रु ॥ पंचतत्वांचे हे केले निरांजन ॥ पंचप्राणवातीबरव्या घालून ॥ मोह स्नेहें ते ची करुनि परिपूर्ण ॥ दीप ज्योती ज्ञान तेजें पाजळून ॥ १ ॥ सच्चिदानंदतूं आनंद मूर्ती ॥ तुझ्या प्रतापाची सर्व हीदीप्ती ॥ तुझिया चरणीं जडोमाझीही भक्ती ॥ विष्णुदासा नसे अन्यत्र प्रीती ॥ २ ॥

## शेजारती.

सुखेंनिद्रा करी आतां पंढरीच्या नाथा ॥ विश्वपती सुमन सेजेवरी ॥ पहुडावें आतां ॥ ॥ ध्रु ॥ भक्तकाजकरोनियां कष्टझाले प्रभुराया ॥ पायघड्या भक्तीच्या ह्या ॥ तुज शोभती ताता ॥ धरणी नंदन हें नांव ॥ निरंजनी तुझाठाव ॥ दीपज्योती ज्ञान भाव ॥ तव कृपें लाधलें भगवंता ॥ २ ॥

विठ्ठल मुनी मानसीं ॥ ३ ॥ विठ्ठल जिवाचा जि-
व्हाळा ॥ विठ्ठल कृपेचा कोंवळा ॥ विठ्ठल प्रेमाचा
पुतळा ॥ लावियेला चाळा विश्व विठ्ठलें ॥ ४ ॥
विठ्ठल बापमाय चुलता ॥ विठ्ठल भगिनी आणि
भ्राता ॥ विठ्ठलें विण चाड नाहीं गोता ॥ तुकाह्म-
णे आतां नाहीं दुसरें ॥ ५ ॥

## अभंग.

मीतव अनाथ अपराधी ॥ कर्महीन मति मंद
बुद्धी ॥ तुजम्या आठविलें नाहीं कधीं ॥ वाचेंकृपा-
निधी मायबापा ॥१॥ध्रु०॥ नाहीं ऐकिलें गाइलेंगीत
॥ धरिली लाज सांडिलें हित ॥ नावडे पुराण बैस-
ले संत ॥ केली बहुत परनिंदा ॥ २ ॥ केला करवि-
ला नाहीं उपकार ॥ नाहीं दया आली पीडितांपर
॥ करूंनये तो केला व्यापार ॥ वाहिला भारकुटुं-
बाचा ॥ ३ ॥ नाहीं केलें तीर्थाचें भ्रमण ॥ पाळि-
लापिंड करचरण ॥ नाहीं संत सेवा घडलें ज्ञान ॥
पूजावलोकन मूर्तीचें ॥ ४ ॥ असंगसंग घडलें अ-
न्याय ॥ बहुत धर्म उपाय ॥ नकळे हित करावें तें

॥ काय नये बोलूं आठवूं तें ॥ ५ ॥ आप आणी-
लिया घातकर ॥ शत्रु झालों मी दावेदार ॥ तूं तव
कृपेचा सागर ॥ उतरी पार तुका ह्मणे ॥ ६ ॥

अभंग.

अगा ए सांवळ्या सगुणा ॥ गुणनिधिनाम नारा-
यणा ॥ आमची परिसा विज्ञापना ॥ सांभाळीदीना
आपुलिया ॥ १ ॥ ध्रु० ॥ बहुया उदराचे कष्ट ॥ आह्मां-
सीं केलें कर्म भ्रष्ट ॥ तुमची चुकविली वाट ॥ क-
री वटवट या निमित्यें ॥ २ ॥ झालों पांगिला ज-
नासी ॥ संसाराची आंदणी दासी ॥ नकळें कधीं
सोडविशी ॥ दृढपाशीं बहु बांधलों ॥ २ ॥ येथें तों
नये आठव कांहीं ॥ विसावा तो क्षणएक नाहीं ॥
पडिलों आणिके प्रवाहीं ॥ हित तों कांहीं दिसेचि-
ना ॥ ३ ॥ जीवित्व वेंचिलें वियोगें ॥ हिंडतां प्र-
वास वाउगें ॥ कांहीं व्याधी पीडारोगें ॥ केलीया
भोगें ताडातोडी ॥ ४ ॥ माझा मीच झालों शत्रू ॥
कैचा पुत्रदारा कैचा मित्रू ॥ कासया घातला प-
सारू ॥ अहो जगद्गुरु तुका ह्मणे ॥ ५ ॥

## पद १ लें.

देव कांहो विटेवरी उभा उभा ॥ देव कां० ॥ ध्रु० ॥ नका पुसूं बाई ॥ वेदासीं कांहीं ॥ कळलें नाहीं ॥ तोड ॥ शेष शिणला झाल्या दोन जिभा जिभा ॥ देव० ॥ १ ॥ सखी पुसे सखयासीं ॥युगें अठ्ठाविस झालीं कीं ॥ चाल ॥ कटावरी कर ॥ भीमा तीर ॥ तोड ॥ वाळवंटीं संत सभा सभा ॥ देव० ॥ २ ॥ तेथें गोपाळ लुटती काला ॥ हरी-नामें तयांचा गलबला ॥ चाल ॥ गण नाहीं गोत ॥ मिळाले संत ॥ तोड ॥ आला तयाचीया लोभा लोभा ॥ देव० ॥ ३ ॥ हरी वैकुंठ सांडुनी ॥ आला पुंडलीका लागुनी ॥ चाल ॥ युगानुयुगीं ॥ भक्तांलागीं ॥ तोड ॥ वाळवंटीं संत शोभा शोभा ॥ देव कांहो विटेवरी उभा उभा ॥ देव० ॥ ४ ॥

## पद २ रें.

अर्जूना तूं पाहेरे ॥ ज्ञेय जें अद्वयरे ॥ नाम रूप भेदें तेंची भूतीं नांदत आहेरे ॥ ध्रु० ॥ सकळां जे मायरे ॥ सेखीं सर्वांहि खायरे ॥ चंद्र सूर्य

रूपें तेंची विश्व पाळित आहेरे ॥ १ ॥ अर्जुना तूं० ॥ नित्य जें निर्मळ रे ॥ स्वानंद निष्फळ रे ॥ भेदाभेदातीत जेथें नाहीं काळ वेळरे ॥ २॥ अर्जुना० ॥ मी तूंपणाविण रे ॥ आपणाआपण रे ॥ तेथें जीवन्मुक्तपण पुसतो कवणरे ॥ अ० ॥ ३ ॥

पद ३ रें.

पतीत पावन दीन दयाघन करुणाकर देवा ॥ श्रवण मनन निजिध्यासें निरंतर करूं सेवा ॥ ध्रु० परम प्रकाशक तेजोमय हें गुप्त तुझें स्वरूप ॥ परतुनि दृष्टीं पाहणें पाहतां निर्गुण हें अरूप ॥ परिपूर्ण परमार्थ साधनें भरलें अमूप ॥ परात्पर तूं अंतरसाक्षी हृदय भुवन दीप ॥ पतीत० ॥ १ ॥ तीन्ही संधी साधुनि घेणें सुख हें एकांतीं ॥ तीन गुण हे निरमुनि शून्यीं उगवली हे ज्योती ॥ तीक्ष्ण दृष्टी पहाणें पहातां दिवस ना राती ॥ तितुकी प्रतिती बाणलिया मग कुळ नाहीं जाती ॥ पतीत० २ ॥ तरंगती सकळही जीव हे चित्सिंधू आंत ॥ तरंग जैसे उमटत भासत नासत हे बहुत ॥ तरणोपाय

सांगती साधू मत हें सिद्धांत ॥ तरले बहुत येणें मार्गें देही देहातीत ॥ पतीत० ३ ॥ पान्हा पिउनी प्रेम कळे हरिलें संकल्पा ॥ परंपरेनें पाहतां भवभय दोरीच्या सापा ॥ पारंगत हें करुनि सकळही अहं सोहं कापा ॥ पारख करितां ताठता आली नेत्रांच्या मलपा ॥ पती० ॥ ४ ॥ वरिली शांती अंगीं झाला पूर्ण अनुभव ॥ वरद बळें सद्गुरु प्रसादें अक्षय वैभव ॥ वमिलें मायिक कवणाचाही नाहीं हा भाव ॥ वदली वाणी मौन्य पाहूतां रूप नाहीं नांव ॥ पती० ॥ ५ ॥ नम्र होउनी वृत्ति लागली अलक्ष हें लग्न ॥ नटत नटत हे कळा अंतरीं होउनियां मग्न ॥ नख नलगे जेथ देह बुद्धिचें विकासलें गगन ॥ नमुन सोहिरा ह्मणे किं अवघा अलक्ष निरंजन ॥ पतीत० ॥ ६ ॥

## पद ४ थें.

दशरथ नंदन बाळ सीते, वाल्हि तूं त्यासि माळ सीते ॥ ध्रु० ॥ मदन मनोहर रूप जयाचें, करिल तुझा प्रतिपाळ सीते० ॥ १ ॥ राम सखा हा म-

न्मथ पुतळा दिसतो, सुंदर बाळ सीते० ॥ २ ॥ काळा डोंगर अंतरीं, आंगळ रावण हा फट काळ सीते० ॥३॥ देखुनीरूप वेडवलेभूप अंतरीं घोटिति लाळ सीते० ॥ ४ ॥ मध्वमुनेश्वर स्वामी रमापति दानवकुळिंचा काळ सीते० ॥ ५ ॥

पद ५ वें.

विठोबा मी कसा विसरूं कसा विसरूं ॥ तुं माय मी लेंकरूं ॥ ध्रु० ॥ नऊ महिने गर्भी असतां ॥ कोठवरी मी धीर धरूं ॥ विठोबा० ॥ १ ॥ पांच पंचविस पाठिं लागती ॥ आतां कसा मागें सरूं॥विठोबा० ॥ २ ॥ कागद कोरा काळी शाई ॥ लेखणीस आणिलाबोरु ॥ विठो० ॥ ज्ञानदेव ह्मणे सख्या विठोबा ॥ निवृत्ती आमुचा गुरू ॥विठोबा कसा विसरूं बा कसा विसरूं ॥ तुं माय० ३ ॥

पद ६ वें.

रामकथारस पी प्राण्या ॥ रामकथा० ॥ ध्रु० ॥ रामकथारस सेविशि जरी तरी ॥ काळ ह्मणेल तुज जी जी जी ॥ प्राण्या राम० ॥१ ॥ संतती संपत्ती

जाय जिणें हें ॥ ममता धरणें छी छी छी ॥ प्राण्या रामकथारस० ॥ २ ॥ मध्वमुनीश्वर सांगतसे तुज ॥ दुष्टजनाप्रति भी भी भी, प्राण्या रामकथारस० ॥ ३ ॥

पद ७ वें.

लोभ हरीचा लटका गे बाई लोभ० ॥ ध्रु० ॥ अक्रूर आला घेउनि गेला ॥ काळजाचा कुटका गे बाई ॥ लोभ हरीचा ल० ॥१॥ उद्धव शाहाणा घेउनि आला ॥ कागदाचा कुटका गे बाई ॥ लोभ हरीचा ल० ॥ २ ॥ कुबजा दासी केली पट्टराणी ॥ कैशी होईल सुटका गे बाई लोभ हरीचा ल० ॥ ३ ॥ मध्वमुनीश्वर स्वामी रमापति ॥ तोडुनि गेला तुटका गे बाई ॥ लोभ हरीचा ल० ॥ ४ ॥

पद ८ वें.

सद्गुरु मार्तंडा मार्तंडा ॥ विवेक झळके खंडा ॥ ध्रु० ॥ औट हात जेजोरी ॥ आत्मा नांदतो मल्हारी ॥ सद्गुरु मा० ॥ १ ॥ चौदा विद्येचा भुगोल ॥ त्रिकुटी करीतसे गोंधळ ॥ सद्गुरु मा० ॥ २ ॥

नव बोधाची दिवटी ॥ तेणें चिन्मय भासे दृष्टी ॥ सद्गुरु मा० ॥ ३ ॥ ज्ञान कोठंबा करीं ॥ दे मज निज नामाची वारी ॥ सद्गुरु मा० ॥ ४ ॥ केशरीनाथ गुरु अवघा ॥ शिव दिन ह्मणे मी झालों वाघ्या ॥ सद्गुरु मा० ॥ ५ ॥

पद ९ वें.

इतुकें दे मजला दे मजला ॥ मागतसें हरि तुजला ॥ ध्रु० ॥ संत समागम जोडी ॥ माझी मीपण वाट मोडी ॥ इतुकें दे मजला० ॥ १ ॥ संत समागम अर्चा ॥ सारा सार ज्ञान चर्चा ॥ इतुकें दे मजला० ॥ २ ॥ संत घराप्रती येती ॥ भक्तीभावें पूजीन त्यांसीं ॥ इतुकें० ॥ ३ ॥ भगवद्भजनीं जागो ॥ तुझिये स्वरूपीं लक्ष लागो ॥ इतुकें० ॥ ४ ॥ हेंचि मागणें मागें ॥ भावें केशव चरणा लागें ॥ इतुकें दे मजला० ॥ ५ ॥

पद १० वें.

कायकु देह धरोरे अभागी ॥ काय० ॥ ध्रु० ॥ इस सुख ब्रह्मा इस सुख पायो ॥ निजपद क्यों

बिसरो रे ॥ अभागी काय० ॥ १ ॥ श्यामसुंदर-की सेवा चुकी ॥ उपजत क्यौं न मरो रे ॥ अभा-गी काय०॥ २ ॥ कहत कबीरा सुन भाई साधू ॥ नहीं तो नरकीं पडो रे ॥ अभागी कायकु देह ध-रो० ॥ ३ ॥

### पद ११ वें.

जडाव कोंदनका कोंदनका ॥ बनाव सत् चि-द्घनका ॥ ध्रु० ॥ लाल सफेतपर काला ॥ उसमें झमके चंदा बाला ॥ जडाव कोंद० ॥ १ ॥ निगा लगी आलखमों ॥ झगमग जोत लगी पलखमों ॥ जडाव० ॥ २ ॥ केशरिनाथबचनमो ॥ शिवदिन जडगये उस कोंदनमों ॥ जडाव कोंदनका कोंदनका०॥ ३ ॥

### पद १२ वें.

यारो पेट बड़ा बाका ॥ सबसें लगादिया ठोका ॥ ध्रु० ॥ देख संन्यासी देख फकीरा घरघर मागे टूका ॥ एक आसनपर क्या बैठेगा पीछे काळ डंका ॥ यारो पेट बडा० ॥ १ ॥ इस पेटसें चोर छिना

ला इस पेटसें पैदा ॥ ईस पेटसें ढोंग धतूरा किया पेटनें पैदा ॥ यारो पेट बडा० ॥ २ ॥ ईस पेटसें स्वार शिपाई राजा परजा मरते ॥ ईस पेटसें अमीर उमराव मुलक मुलुकपर फिरते ॥ यारो पेट बडा० ॥ ३ ॥ शिवदिन कहे मन जग बैठे नहीं पेटसें न्यारे॥गरिब फिरेपसु पछी सोई सबही पेटने घेरे ॥ यारो पेट बडा बांका॥सबसें लगा दिया ठोका ॥ ४ ॥

पद १२ वें.

शंकरजी मैं बाल तुमारो दया करो महाराजरे ॥ पतीतके तुम करुणासागर आज रखो प्रभु लाज रे ॥ ध्रु० ॥ खाना पीना सुखसें सोना धाम धूमकी आज रे ॥ इस दुनियांमें पैदा होकर येहि किया सब काज रे ॥ शंकरजी मैं० ॥ १ ॥ अपना अपना करकर आखर जनम गमाया सबही रे ॥ भजन पूजनकी बात नहीं कछु गया नमनका फेरा रे ॥ शंकरजी मैं० ॥ २ ॥ चरन कमलपर शरन आया जो दगा न देते फेरे रे ॥ श्रवण सुनी

यह बात बडोंकी घेर लियो प्रभु द्वार रे ॥ शंकर-जी मैं० ॥ ३ ॥ व्याघ्र चर्मपर जटा बढाके नंदी-पर संवार रे ॥ आनंदात्मज धून लगी है शिव शिव मूल: धार रे ॥ शंकरजी मैं बाल० ॥ ४ ॥

## सौरीसंग्रह.

### सौरी १ ली.

टाक रुका चाल रांडे कांगे केली गोवी ॥ पुसोनियां आलें ठाव ह्मणोनि देतें शिवी ॥ ध्रु० ॥ आतां येणें छंदे नाचो विनोदें ॥ नाहीं या गोविंदें माझें मजसीं केलें ॥ २ ॥ कोरडे ते बोल कांगे वेचितेसी वायां ॥ वतें करूनी दावी तुझ्या मुळीचिया ठाया ॥ ३ ॥ याजसाठीं म्यां डौर धरियेला हातीं ॥ तुका ह्मणे तुह्मा गांठी सोडायाची खंती ॥ ३ ॥

### सौरी २ री.

मोकळी गुंते रिती कुंथे नाहीं भार दावें ॥ घेड़वाडा बैसली खोडा घेतली आपुल्या भावें ॥ ध्रु० ॥ ऐका बाई लाज नाहीं आणिकां त्या गरतीची ॥ समा-

धानीं उंच स्थानीं जाणे सेवा पतीची ॥ १ ॥ न बोलतां करी चिंता न मारीतां पळे ॥ दादला सेज नावडे निजे जग झोडीचे चाळे ॥ २ ॥ देखत आंध बधिर कानीं बोल बोलतां मुकें ॥ तुका ह्मणे पतन सोयरीं ऐसीं झालीं एकें ॥ ३ ॥

सौरी ३ री.

सातें चला काजळ घाला तेल फणी करा ॥ दिवाणदारीं बैसले पारीं नाचों फेर धरा ॥ ध्रु० ॥ या साहेबाचें झालें देणें वेळोवेळां नलगे येणें ॥ आतां हाटीं काशासाठीं हिंडो पाटी दुकानें ॥ १ ॥ अवघ्याजणी मुंढा धणी नाचों एकें घाई ॥ सरसावलें सुख कैसा चाळा एकेठायीं ॥ २ ॥ तुका ह्मणे वोळगों एका तोड चिंता माया ॥ देऊं उद्गार आतां जाऊं मुळींचिया ठाया ॥ ३ ॥

सौरी ४ वी.

नीट पाट करूनी थाट । दावीतसे तोरा ॥ आपणाकडे पाहो कोणी । निघाली बाजारा ॥ १ ॥ ते सौरी नव्हे निकी । भक्तीविण फिकी ॥ ध्रु० ॥ चांग

भांग करूनी सोंग । दावी माळा मुद्री ॥ रुक्याची आस धरूनि । हालवीती फुदी ॥ २ ॥ थोरे घरीं करी फेरी । तेथें नाचे बरी ॥ जेथें निवे रुका । तेथें हालवी टिरी ॥ ३ ॥ आंत मांग बाहेर चांग । सौरी ती नव्हे तंग ॥ तुका दास नटतसे । न करी त्याचा संग ॥ ४ ॥

सौरी ५ वी.

ये सखे माय नवल बोलुं काय ॥ नवल० ॥ ध्रु० ॥ देवळावरतें देऊळ बाई देखिलें एकाएकी ॥ दे० ॥ उफराटी पाहुं जातां झालें थोर सूखी ॥ ये सखे मा० ॥ १ ॥ देवळामध्यें उभी ठेली मूर्त निराकारी ॥ मूर्त० ॥ न्याहाळीतां सईबाई झाली वारासारी ॥ ये सखे मा० ॥ २ ॥ निळी पिंवळी शुभ्रवर्ण सांवळी सकुमार ॥ सांवळी स० ॥ कस्तुरीचा टीळा भाळीं कांसे पीतांबर ॥ ये सखे० ॥ ३ ॥ चार मुख दहा डोळे आठ तीला हात ॥ आठ ती० ॥ नवखंड पोटीं तीच्या समुद्र आणि सात ॥ ये सखे मा० ॥ ४ ॥ राई एवढी डोई तीची गंगे ए-

वढी वेणी ॥ गंगे० ॥ मान बारीक सुई परी अ-
नामाची राणी ॥ ये सखे ॥ ५ ॥ सद्गुरु कृपा पां-
डुरंगीं प्रसन्न झाली आजी ॥ प्रसंन्न० ॥ अनन्य
भावें शरण जातां तीच तया राजी ॥ ये सखेमाय
नवल बोलु काय ॥ नवल० ॥ ६ ॥

सौरी ६ वी.

उभी राहे राडें शब्द चाल भांडे ॥ शब्द चाल
भांडें ॥ ध्रु० ॥ काजळ कुंकु लेउनि रांडे किती
करशिल नखरा ॥ किती० ॥ भिल्लीण होउनी रु-
द्र नेला ठकविलें त्या शंकरा ॥ उभी राहे राडें० ॥
१ ॥ साही त्रिकुट अठरा साडे तेही वेडावली ॥
तेही वे० ॥ चौघीजणी वाद केला तेही धुंडावली
॥ उभी राहे रांडे० ॥ २ ॥ दुर्वासासी गर्व केला
तेथें झालीस घोडी ॥ तेथें झा० ॥ कोठें ह्मणतां
लाज नाहीं डागवीया घोडी ॥ उभी राहे रां० ॥
३ ॥ शुकाशीं जाउनी रांडे काय उजेड केला ॥
काय उ० ॥ मारुनी ज्ञान बाण तुझा ह्मोरा फिर-
वीला ॥ उभी राहे रां० ॥४॥ रामदासें पर्णूनी तुला

लग्नीं टाकुनी दीलें ॥ लग्नीं टा० ॥ संत संगती जाणुनीयां फार फजीत केलें॥उभी राहे रांडे ॥५॥

सौरी ९वी.

एक तांब्याचें बावलें केलें ॥ पाट मांडोनी वरी बैसविलें ॥ वस्त्र अळंकार चढवीले ॥ मना आलें तें नांव ठेविलेंगा ॥ या जगाशीं लागलें वेड ॥ या ज० ॥ १ ॥ शुद्ध पाण्यानीं प्रक्षाळीलें ॥ गंध पुष्पांनी वाहीलें ॥ धुप जाळोनी दीप उजळीले ॥ आनंदवुनी चालविलें ॥ मनाआलें तें नांव ठेवीलेंगा ॥ २ ॥ करीं वेवोनी वोवांडीलें ॥ आडवेपडोनी दंडवत केलें ॥ आपपरी नाहीं देखीलें ॥ एका जनार्दनीं वोळखीलें ॥ याजगा० ॥ ३ ॥

# आरती विठ्ठलाची

फळलें भाग्य माझें ॥ धन्य झालों संसारीं ॥ सद्गुरु भेटलाहो ॥ तेणें धरियेलें करीं ॥ पश्चिमे चालवीलें ॥ आत्मस्तुती निर्धारी ॥ त्रिकुटावरी नांदे ॥ देखीयेली पंढरी ॥ १ ॥ तें सुख काय सांगूं ॥ वाचे

बोलतां न ये ॥ आरतीचेनि गुणें ॥ गेलें मीपण माये ॥ ध्रु० ॥ राउळामाजी जातां ॥ राहे देहअवस्था ॥ मन हें उन्मन झालें ॥ नसे बद्धतेची वार्ता ॥ हेतु हा मावळला॥शब्दा आली निःशब्दता ॥ तटस्थ होउनि ठेलों ॥ निजरूप पाहतां ॥ तें सुख० ॥ २ ॥ त्रिगुण गुणबाई ॥ पूर्ण जळल्यावाती ॥ नवलाव अविनाश ॥ न समाये स्वयंज्योती ॥ पाहतां लक्ष तेथें ॥ हालूं विसरलीं पातीं ॥ नातुडे माझे मन ॥ नाहीं दिवसराती ॥ तें सुख० ॥ ३ ॥ आरती विठ्ठलाची ॥ उजळली अंतरीं ॥ प्रकाश थोर झाला ॥ सांठवेना अंबरीं ॥ रविशशी मावळले ॥ तया तेजामाझारी॥वाजती दिव्य वाद्यें ॥ अनुहातें गजरीं ॥ तें सुख० ॥ ४ ॥ आनंद सागरांत ॥ प्रेमें दीधली बूडी ॥ लाधलों सौख्य मोठें ॥ नये बोलतां बोली ॥ सद्गुरूचेनिसंगें ॥ ऐसी आरती केली ॥ निवृत्तीतें आनंदाची ॥ तेथें वृत्ती निमाली ॥ तें सुख० ॥५ ॥

## भजन.

ज्ञानदेव तुकाराम ॥ ज्ञान देव तुकाराम ॥ तुकाराम, तुकाराम, तुकाराम, ॥ ॥

पुंडलीक वरदे हरि विठ्ठल-
सीताकांत स्मरण जयजयराम.
पार्वती पते हर हर महादेव.

सब संतनकी जै, तुकाराममहाराजकी जै, बालगोपालकी जै.

समाप्त.